17-03-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SKK/ 13:00

17-03-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SKK/ MAP/ SBT/ 13:00

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या संबंधात.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय मी नियम 289 अन्वये आजचा प्रश्नोत्तराचा तास आणि इतर सर्व कामकाज स्थगित करुन मुंबईच्या बाजूला असलेल्या नवी मुंबई येथील घणसोली या भागामध्ये गुरुवार दिनांक 16 मार्च 2006 रोजी घणसोलीचे ग्रामस्थ आणि लगतच असलेल्या सिम्प्लेक्स कॉम्प्लेक्समधील माथाडी कामगार यांच्यामध्ये दंगल झाली, त्या बाबत चर्चा घेण्यात यावी, असा प्रस्ताव दिलेला आहे. ही दंगल रोखण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला, त्यामध्ये तीन लोक ठार झाले. ग्रामस्थांनी जो हल्ला केला, त्यामध्ये कामगार संघटनेच्या नेत्याचा अंगरक्षक ठार झाला. दंगल आणि गोळीबारामध्ये 70 जण गंभीररित्या जखमी झालेले आहेत, अनेक लोकांची प्रकृती चिंताजनक आहे. या गोळीबारामध्ये श्री.जगदीश पाटील आणि श्री.संतोष गुप्ता या तरुणांच्या छातीमध्ये गोळ्या लागल्यामुळे ते जागीच ठार झाले. यावरुन पोलिसांनी अतिशय चुकीच्या पध्दतीने गोळीबार केलेला आहे, हे स्पष्ट होते. या राज्यामध्ये हा पहिलाच गोळीबार झालेला नाही तर गेल्या दोन महिन्यामध्ये अमरावती जिल्ह्यात, बीड जिल्ह्यात, आणि माण तालुक्यात गोळीबार झाला. आता नवी मुंबई येथे गोळीबार झाला. रंगपंचमीच्या दिवशी एका मुलीला रंग लावण्यावरुन बाचाबाची सुरु झाली. एवढ्यावर प्रकरण थांबले असते तर ठीक होते. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला असता तर हे प्रकरण चिघळले नसते. परंतु या रंग लावण्याच्या प्रकरणाला दोन गटामध्ये मारामारीचे स्वरुप आले. घणसोली गावचे ग्रामस्थ आणि सिम्प्लेक्स कॉप्लेक्समधील माथाडी कामगार यांच्यामध्ये युध्द सुरु झाले.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

हा सर्व वेळ जात असताना पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली आणि त्यामुळे हे सर्व प्रकरण पेटले. त्या ठिकाणी मोटारींची जाळपोळ झाली, दगडफेक झाली, मारहाण झाली, असे सर्व होत असताना खऱ्या अर्थाने पोलिसांनी त्या ठिकाणी जाण्यास उशीर केला. जर पोलिसांनी मध्ये हस्तक्षेप केला असता तर गोळी झाडण्याची वेळ आली नसती. त्या ठिकाणी पोलिसांनी गोळीबार केला. त्याच्या आधी त्यांनी लाठीचार्ज केला असता, अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या असत्या तर तेथील जमाव आटोक्यात आला असता. परंतु त्या ठिकाणी गोळीबार झाला. गोळीबार करताना तो कमरेखाली न करता कमरेच्यावर करण्यात आला आणि त्यामध्ये दोन माणसे त्या ठिकाणी मृत्यूमुखी पडलेली आहेत. अनेक लोक जखमी झालेले आहेत. राज्यामध्ये गोळीबाराच्या घटना सातत्याने घडत आहेत. त्यातून या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत बिघडलेली आहे अशा प्रकारचे चित्र निर्माण झालेले आहे. त्या ज्या वेळी राज्यामध्ये अशा गंभीर घटना घडतात, ज्या ठिकाणी माणसे मृत्यूमुखी पडतात त्यावेळी अशा सार्वजनिक महत्वाच्या प्रश्नावर सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारुन या ठिकाणी चर्चा केली जाते. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन घणसोली येथे झालेल्या गोळीबाराच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा घडवून आणण्याची परवानगी द्यावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याव्दारे आपल्या माध्यमातून या अत्यंत भयानक आणि गंभीर प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा मी प्रयत्न केला होता...

सभापती : काल आपण हा मुद्दा औचित्याच्या माध्यमातून मांडलेला आहे. आता मी आपल्याला परवानगी दिलेली नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यासंबंधी मला बोलावयाचे आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्यामध्ये त्यांनी आपल्याला अशी विनंती केलेली आहे की, घणसोली या ठिकाणी झालेला गोळीबार, त्या ठिकाणी झालेले मृत्यू, जखमी झालेल्या लोकांची संख्या विचारात घेऊन प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन त्यावर चर्चा घ्यावी. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. खरे म्हणजे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची मागणी करणे चुकीचे असते. प्रश्नोत्तरामध्ये बहुतांश प्रश्न विरोधी पक्षाचे असतात तरीही आम्ही अशी मागणी करतो याचे कारण एकच असते की, दोन्ही गोष्टींमध्ये जास्त गांभीर्य कोणत्या गोष्टीमध्ये आहे, कोणती गोष्ट जास्त महत्वाची आहे याचा विचार करुन हा प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे. मी यासंदर्भात अशी विनंती करतो की, आपण न्यायबुध्दीने या प्रश्नाकडे बघावे. ही चर्चा जर आजच्या संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमामध्ये कोठे बसविता येत असेल तर गोष्ट निराळी. परंतु सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन या चर्चेला प्राधान्य द्यावे अशी विनंती माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेली आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी हा विषय काल या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी हा विषय ठिकाणी मांडला. हा विषय गंभीर आहे हे निर्विवाद सत्य आहे. आज या ठिकाणी आल्यानंतर प्रथम यासंदर्भात नोटीस दिली. या विषयाला न्याय मिळावा, त्या ठिकाणी घडलेली घटना काय आहे? शासनाची भूमिका काय आहे ? हे सर्व सदनाला समजावे, जे लोक मृत्युमुखी पडले त्याची कारणे कोणती ? पोलिसांनी अतिरेक केला काय ? पोलिसांनी कशा प्रकारे गोळीबार केला हे सभागृहासमोर यावे यासाठी चर्चा होणे आवश्यक आहे. पोलिसांनी त्या ठिकाणी गोळीबार केला. माणसे मारणे हे पोलिसांचे काम नाही. माणसे वाचविणे हे पोलिसांचे काम आहे. त्या ठिकाणी निर्माण झालेल्या परिस्थितीतून मार्ग काढणे, शांतता प्रस्थापित करणे ही जबाबदारी पोलिसांची आहे. गोळीबार करुन माणसांचा जीव घेणे हा पर्याय होऊ शकत नाही. या दृष्टीकोनतून या प्रश्नाकडे पहावे आणि या प्रश्नाला न्याय मिळावा यादृष्टीकोनातून आपण चर्चेला परवानगी द्यावी आणि प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन ही चर्चा घ्यावी अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी एक गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. त्या ठिकाणी सकाळी रंग लावण्याची घटना घडली आणि रात्री दोन्ही बाजूकडील लोकांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन अशी घटना घडल्याचे सांगितले. त्याची दखल पोलिसांनी घेतली नाही. त्यामुळे रात्री दीड वाजता पुन्हा दंगल सुरु झाली. जर सकाळी झालेल्या घटनेची दखल पोलिसांनी घेऊन योग्य ती काळजी घेतली असती, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेतले असते तर असा दुर्दैवी प्रसंग घडला नसता.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

ही जी घटना घडली त्यामध्ये गृहखात्याची, पोलिसांची चूक झालेली आहे असे मला वाटते. म्हणून सभापती महोदय, या गंभीर विषयावरील चर्चेला आपण परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : मुंबईपासून जवळच असलेल्या घणसोली येथे काल गंभीर घटना घडलेली आहे. अशा प्रकारच्या दोन-तीन घटना घडलेल्या आहेत. या घडलेल्या घटनेचे गांभीर्य किती आहे याची जाणीव आपणा सर्वांना झालेली आहे. या घटनेसंबंधी शासनाने या सभागृहामध्ये निवेदन करणे आवश्यक होते. परंतु राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी दूरदर्शनवरील वाहिन्यांवरुन पोलिसांचे कसे योग्य होते यासंबंधी सांगितले. या घटनेसंबंधी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी काल संध्याकाळी या सभागृहामध्ये निवेदन करुन सरकारची भूमिका मांडली असती तर घडलेल्या घटनेतील सत्यांश सभागृहासमोर आला असता आणि त्यासंबंधी अर्धा-पाऊणतास माननीय सदस्यांना विचार मांडता आले असते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सूचना मांडताना सांगितलेले आहे की, पोलिसांनी वेळीच दखल घेतली असती तर ही घटना घडली नसती. रंग लावण्याचा प्रकार दिवसा घडला. त्यावरुन वादविवाद झाले. या प्रकाराबाबत पोलिसांनी वेळीच बोध घेऊन योग्य ती दक्षता घेतली असती तर ही गंभीर घटना घडली नसती. गावक-यांनी रात्री दीड वाजता हल्ला केला. त्यामध्ये अनेक लोक जखमी झाले. माझे म्हणणे असे आहे की, पोलिसांनी वेळीच दखल घेतली असती तर ही गंभीर घटना घडली नसती. परंतु हे सरकार आणि गृहखाते फक्त गृहराज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे यांना कसे वाचविता येईल या कामी लागले आहे. घणसोली येथे घडलेल्या घटनेच्या संदर्भात पोलिसांनी जी दक्षता घ्यायला पाहिजे होती ती घेतली नाही. त्या ठिकाणी पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये लोक मृत्यूमुखी पडले आहेत. तेव्हा सभागृहापुढील आजचे कामकाज बाजूला ठेवून या गंभीर घटनेबाबत चर्चा करण्याची परवानगी द्यावी अशी माझी विनंती आहे. राज्यामध्ये माण, अमरावती, बीड याठिकाणी देखील पोलिसांनी गोळीबार केलेला आहे. पोलिसांनी गोळीबार करण्याचे प्रकार सतत होत आहेत. तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन या गंभीर घटनेबाबत चर्चा करण्याची परवानगी द्यावी अशी मी आपणास पुनश्च विनंती करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये याठिकाणी सूचना मांडलेली आहे. प्रश्नोत्तराचा तास अतिशय महत्वाचा असतो याची विरोधी पक्षाला जाणीव आहे. तरीही घणसोली येथील घडलेल्या गंभीर घटनेबाबत या सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे हे जबाबदार विरोधी पक्ष म्हणून आग्रहाने सांगत आहे. केवळ होळीच्या दिवशी रंग लावण्यावरुन ही दंगल झाली एवढया पुरताच हा विषय मर्यादित नाही. महाराष्ट्रामध्ये 75 टक्के शहरीकरण झालेले आहे. अशा या घटनेच्या संदर्भात एक-दोन प्रश्न निर्माण होतात. पाहिला प्रश्न म्हणजे या राज्यामध्ये बाहेरुन सातत्याने लोक येत आहेत त्याचाच हा परिणाम आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, आता मतदारसंघाची पुनर्रचना होत असल्यामुळे आणि राजकीय आशाआकांक्षा वाढत चालल्या असल्यामुळे एकाच पक्षातील दोन मोठ्यां नेत्यांमधील हा संघर्ष आहे काय ? अशा या प्रश्नासंबंधी खोलवर जाऊन या सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते...(अडथळा).. सविस्तर चर्चेच्या वेळी मी माझे मुद्दे मांडीन. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे तो आपण विचारात घ्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, घणसोली येथे घडलेल्या गंभीर घटनेसंबंधी या सभागृहामध्ये चर्चा करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 289 अन्वये चर्चा उपस्थित करण्याची मागणी करीत असताना या प्रश्नाला राजकीय स्वरुप देण्याचा प्रयत्न झाला तर या सभागृहाच्या वेगळया भावना लोकांपर्यन्त जातील....

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. जितेंद्र आव्हाड : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या सूचनेला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, यामध्ये राजकारण आणू नका. शिवसेना आणि भाजपमध्ये काय भांडणे आहेत, श्री. उद्ध्व आणि राज यांच्यामध्ये काय भांडणे आहेत, माननीय विरोधी पक्षनेते आणि माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्यामध्ये काय भांडणे आहेत....

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. विनोद तावडे : माननीय सदस्यांनी हेत्वारोप केलेले आहेत. ते रेकॉर्डवरुन काढून टाकावेत.

..नंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आदरणीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे तो काल घणसोली येथे झालेल्या गंभीर प्रकरणाबद्दल मांडला आहे. हा प्रस्ताव चर्चेला घ्यावा याबाबतीत विरोधी पक्षातील सदस्य आपले मत व्यक्त करीत असताना कोणाही या विषयाला राजकीय स्वरुप दिलेले नाही वा देण्याची इच्छाही नाही. या घटनेमध्ये 3 लोकांचा मृत्यू झालेला आहे. हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. अशा परिस्थितीत आपली अनुमती घेऊन या सभागृहाचा वेळ वाया घालविणे आणि वाहयात चर्चा करणे हे थांबवावे. तसेच माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी केलेले सर्व वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे.

श्री. विनायक मेटे : अध्यक्ष महोदय, माझा हकरतीचा मुद्दा आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी हरकतीचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिलेली नाही.

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या महत्वाच्या प्रश्नावर ही चर्चा होत असताना अन्य सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी आपले विचार व्यक्त केले. त्यांना मी बोलण्यासाठी परवानगी दिली होती. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे हे बोलत असताना त्यांच्याकडून कळतनकळत घसरण सुरु झाली तसेच सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्याकडूनही तशाच प्रकारे घसरण सुरु झाली. दोन्ही सन्माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्य मी तपासून बघतो. दोन्ही सदस्यांच्या बोलण्यातून जर एखादा शब्द चुकीचा निघाला असेल तर तो सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्याचा मी निर्णय घेतो. परंतु सभागृहामध्ये बोलत असताना संबंधित विषयाला धरुन बोलले तर अशी परिस्थिती उद्भवणार नाही.

या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 खाली जो प्रस्ताव सभागृहासमोर मांडला आहे त्यावर अनेक सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. काल घणसोली भागामध्ये झालेला प्रकार अत्यंत गंभीर असून त्यामध्ये दुर्देवाने 3-4 माणसांचा मृत्यू झालेला आहे. फार मोठया प्रमाणात दंगल झालेली आहे. म्हणून याबाबतीत मी असे ठरविले आहे की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या ठरावावरील चर्चेला परवानगी द्यावयाची. तसेच प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी विनंती केली आहे ती मी स्वीकारीत नाही असेही ठरविले आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. प्रस्ताव देण्यामध्ये आमचा मूळ उद्देश हा होता की, सभागृहाचे कुठलेही इतर कामकाज होण्यापेक्षा हा विषय महत्वाचा आणि गंभीर आहे म्हणून त्यावर चर्चा व्हावी मी पुन्हा एकदा विनंती करतो की, प्रश्नोत्तराचा तास बाजूला सारुन या विषयावरील चर्चा ताबडतोब सुरु करावी.

सभापती : हरकतीच्या मुद्यावर निर्णय देत असताना मी सांगितले होते की ही चर्चा स्वीकारण्याचे मी ठरविलेले असून नियम 97 अन्वये या विषयावर अडीच तासांची चर्चा होईल. सन्माननीच विरोधी पक्षनेत्यांनी पुन्हा एकदा विनंती केली की प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन चर्चा सुरु करावी. परंतु मी पूर्वीच निर्णय दिला आहे की, आता प्रश्नोत्तराचा तास सुरु होईल. आजच ही चर्चा सुरु होईल आणि लक्षवेधी सूचना संपल्यानंतर या चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

आता प्रश्नोत्तरे सुरु करण्यात येतील.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

वेल्हे तालुक्यातील (जि.पुणे) गुंजवणी धरणाचे काम बंद असल्याबाबत

(1) * 12745 डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वेल्हे तालुक्यातील (जि.पुणे) येथील गुंजवणी धरणाचे काम बंद पडले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास,वेल्हे तालुक्यातील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी न लावल्यामुळे संतप्त धरणग्रस्तांनी गुंजवणी धरणाचे काम बंद पाडले आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, गेली सात वर्षे धरणग्रस्त पुर्नवसनाच्या प्रतिक्षेत आहेत हे खरे आहे काय,

(4) तसेच पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिनांक 30 डिसेंबर 2005 पर्यंत धरणग्रस्तांचे सर्व प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते हे खरे आहे काय,

(5) असल्यास, धरणग्रस्तांचे त्वरीत पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. सुनील देशमुख श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांच्याकरिता. : (1) होय.

(2) होय.

(3) होय.

पुनर्वसनाची कार्यवाही चालू आहे.

(4) मा.मंत्री,जलसंपदा विभाग यांनी दि.9/11/2005 रोजी प्रकल्पाचे पुनर्वसन विषयक कामाचा आढावा घेणेसाठी संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. पुनर्वसनाची कार्यवाही त्वरीत करण्याबाबत सुचना केल्या आहेत.

(5) टंचाई कार्यक्रम टप्पा 2 मध्ये गुंजवणी प्रकल्पाचा समावेश करण्यात आला असुन प्रकल्पाच्या रु. 22.00 कोटी कार्यक्रमांतर्गत भुसंपादन व पुनर्वसनासाठी रु.13.71 कोटींची तरतुद करण्यात आली असुन रु.10.37 कोटीचा निधी वितरीत करण्यात आला आहे व पर्यायी जमीन वाटपाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(6) पुनर्वसन व प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन दाखविणे तसेच त्यांचे पसंतीनुसार जमिन वाटप करणे याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या पुनर्वसनाच्या प्रश्नाच्या निमित्ताने खरे तर मघासपासूनच सभागृहात वेगवेगळया प्रकारे चर्चा चाललेली आहे. या प्रश्नाला जी उत्तरे दिलेली आहेत ती उत्तरे पाहता आमचा प्रश्न विचारण्याचा हेतू लक्षात घेतल्याचे दिसत नाही. कारण माननीय मंत्री महोदयांनी वेगाने कार्यवाही चालू असल्याचे म्हटले आहे परंतु आमचे म्हणणे असे आहे की, ही कार्यवाही "वेगाने" चालू नसून "वेमाने" म्हणजेच "वेळ मारुन नेण्यासाठी" अशी कार्यवाही चालू आहे. राज्यात आतापर्यन्त एकूणच प्रकल्पग्रस्तांची जी परिस्थिती आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12745..... डॉ. नीलम गो-हे .....

त्याबाबत असाच अनुभव आहे. या प्रकल्पग्रस्तांसाठी शासनाने 10.37 कोटीचा निधी दिला असे म्हटले आहे. हा निधी कधी वितरित केला आहे ? तसेच धाने, चपेटे, गेवंडी, बद्री आणि वागदरी या गावातील लोकांनी धरणाचे काम बंद पाडून त्याच ठिकाणी मुक्काम करण्याची तयारी दाखविली आहे. कारण अद्यापही त्या लोकांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात निर्णय झालेला नाही. या लोकांना पर्यायी जमीन दाखविण्यासाठी किती कालावधी लागणार आहे, त्यांना ती पसंत पडणार की नाही हा भाग पुढचाच आहे. परंतु या प्रक्रियेसाठी किती कालावधी लागणार आहे आणि कशा प्रकारे या लोकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे तसेच ज्यांची जमीन धरणामध्ये बुडालेली आहे त्यांना जमिनीचे वाटप कधी करण्यात येणार आहे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, गुंजवणी प्रकल्पामुळे एकूण 4 गांवे पूर्णत: आणि 5 गांवे अंशत: बाधित होत असून एकूण 1328 खातेदारांची जमीन यामध्ये जात आहे व 34 लोक पूर्णपणे भूमिहीन होत आहेत. या 1328 खातेदारांपैकी 664 खातेदारांना जमीन मिळण्यासाठी 65 टक्के रक्कम शासनाने भरलेली आहे. तसेच प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या लोकांना पर्यायी जमीन दाखविण्याचा जो कार्यक्रम आहे तो फार मोठा आहे व वाचून दाखविण्यामध्ये वेळ जाईल म्हणून मी तो कार्यक्रम सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. विलास अवचट : महोदय, गेल्या 7 वर्षांपासून या धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. यामध्ये प्रश्न विचारलेला आहे की, वेल्हे तालुक्यातील गुंजवणी धरणाबाबतचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासंबंधीचे आश्वासन दिले होते हे खरे आहे काय ? त्याला "होय" असे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले आहे. त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी दि. 9.11.2005 रोजी एक बैठक घेतली होती व पुनर्वसनाची कार्यवाही ताबडतोब करण्याच्या सूचना दिल्या होत्या. जवळजवळ तीन महिन्यांचा कालावधी लोटलेला आहे. अशा प्रकारे सात वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित राहिलेला असून एक वर्षाच्या आत या सर्व प्रकल्पबाधितांना संपूर्ण नुकसान भरपाई देऊन त्यांचे जमिनीसह पुनर्वसन शासन करणार काय ?

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12745.....

डॉ. सुनील देशमुख : महोदय, मी आताच सांगितले की, या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंबंधीचा जो कार्यक्रम शासनाने तयार केला आहे त्याची माहिती मी पटलावर ठेवतो. त्यामध्ये तारीखवाईज माहिती दिलेली आहे. तसेच एक वर्षात ही पुनर्वसनाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल, असे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : महोदय, या ठिकाणी शासनाने मान्य केले आहे. धरणग्रस्तांनी त्यांचे पुनर्वसन होत नाही म्हणून धरणाचे काम बंद पाडले आहे काय ? त्याला "होय" असे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर पुण्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार यांनी 30 डिसेंबर, 2005 रोजी आश्वासन दिले होते हे खरे आहे काय ? त्यालाही मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिले आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

असे असताना देखील सहा वर्षे गेली आहेत. माननीय मंत्र्यांच्या आश्वासनाला काही किंमत आहे की नाही ? शासनाच्या शब्दाला किंमत आहे की नाही ? आज प्रश्न सुटत नसल्यामुळे धरणग्रस्त शेतकऱ्यांना आंदोलन करावे लागत आहे. त्यांच्यावर शासन गोळीबार करीत आहे. त्याद्वारे शेतकरी मारले जात आहेत. याची शासन गांभीर्याने नोंद घेत नाही. गेल्या 8 वर्षात धरणग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. असे असले तरी लेखी उत्तरामध्ये शासन म्हणते की, "टंचाई कार्यक्रम टप्पा 2 मध्ये गुंजवणी प्रकल्पाचा समावेश करण्यात आला असून प्रकल्पाच्या रुपये 22.00 कोटी कार्यक्रमांतर्गत भूसंपादन व पुनर्वसनासाठी रुपये 13.71 कोटींची तरतूद करण्यात आली असून रुपये 10.37 कोटींचा निधी वितरीत करण्यात आला आहे व पर्यायी जमीन वाटपाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे." असे जर असेल तर मग 8-8 वर्ष प्रकल्प रखडण्याचे कारण काय आहे ? यास कोण जबाबदार आहे ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : गुंजवणी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये वेल्हे, भोर हे तालुके येतात. 1362 प्रकल्पग्रस्तांना पुरंदर तालुक्यातील पुनर्वसनाचा आराखडा मान्य नव्हता. त्यामुळे सन 1998 पासून धरणाचे काम वेळोवेळी बंद पडत गेले. पुण्याचे पालकमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी दिनांक 11 ऑक्टोबर 2005 रोजी बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये समयबद्ध कार्यक्रम आखला गेला. प्रकल्पग्रस्तांना पुरंदर लाभक्षेत्रातील जमीन मान्य नव्हती म्हणून चासकमान येथील भामासखेड लाभक्षेत्रातील संपादित जमीन दाखविण्यात आली. दौंड, शिरूर, खेड, वेल्हे येथे कार्यक्रम आखला गेला. त्यानुसार 1362 प्रकल्पग्रस्तांपैकी जवळ जवळ 500 ते 600 लोकांनी 65 टक्के रक्कम घेऊन पुनर्वसनाला मान्यता दिलेली आहे. यासाठी जवळ जवळ 4 तालुक्यांमध्ये 5-6 गावठाणांमध्ये नागरीसुविधा पूर्ण करून गावे विसावली आहेत. प्रकल्पग्रस्तांना 4 तालुक्यांची जमीन दाखविलेली आहे. प्रकल्पग्रस्त जो पर्यंत पसंती देत नाहीत तो पर्यंत त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचा ताण किंवा दबाव न टाकता त्यांच्या पसंतीनुसार पुनर्वसन करण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. अशाप्रकारे समयबद्ध कार्यक्रम आखून अंतिम टप्प्यामध्ये पोचलेले हे गणित आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दबाव न आणता शासन प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणार आहे, पण त्यासाठी काही कालमर्यादा शासनाने ठरविली आहे काय ? ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12745 ....

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : यासंबंधी माननीय पुनर्वसन मंत्र्यांसमवेत बैठक घेऊन सहा महिन्यामध्ये प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, पुनर्वसनाकरिता रुपये 13.71 कोटींची तरतूद करण्यात आली असून रुपये 10.37 कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, वितरीत करण्यात आलेली रुपये 10.37 कोटीचा निधी प्रत्यक्षात बाधित शेतकऱ्यांना दिला आहे काय ? असल्यास, उर्वरित रक्कम शेतकऱ्यांना कधी वितरीत करण्यात येणार आहे व पुनर्वसनाबाबतची 6 (1) ची प्रक्रिया शासनाने सुरू केलेली आहे काय ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, निधी हा बाधित शेतकऱ्यांनाच देण्यात आलेला आहे. विविध टप्प्यावर असलेल्या प्रश्नासंबंधी 6 (1) ची अधिसूचना काढून त्वरित उर्वरित निधी देण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, प्रकल्पग्रस्तांच्या पसंतीप्रमाणे निश्चित केलेल्या जागेवर पुनर्वसन करण्यात येईल. हा नियम राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्तांना लागू आहे काय ? नागपूर जिल्हयातील भिवापूर येथील किणी खुर्द गावातील 100 टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जातीतील लोकांची आहे. या गावातील लोकांचे पुनर्वसन करताना त्यांची पसंती लक्षात न घेता 25 कि.मी.अंतरावर पुनर्वसन करण्याचा घाट अधिकाऱ्यांनी घातला आहे या संदर्भात मंत्रिमहोदयांकडे काही उत्तर आहे काय ?

नंतर श्री.बोर्डे....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जेव्हा पुनर्वसन केले जाते तेव्हा जॉईंट इन्स्पेक्शन करुनच पुनर्वसन केले जाते. त्यामुळे एका ठिकाणी एक नियम लावला आणि दुसऱ्या ठिकाणी दुसरा नियम लावला असे म्हणणे बरोबर होणार नाही. सन्माननीय सदस्य प्रा.कवाडेसाहेबांचा प्रश्न वेगळा आहे त्यामुळे त्यांनी विचारलेल्या मुद्यांबाबत माहिती घेऊन त्यांना सांगितले जाईल.

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्री महोदयांनी पुनर्वसन करीत असताना जॉईंट इन्स्पेक्शन करुनच पुनर्वसन केले जाते असे सदनाला सांगितले आहे. संबंधित प्रकल्पग्रस्त, त्या ठिकाणचे पाटबंधारे विभाग किंवा पुनर्वसन विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत जॉईंट इन्स्पेक्शन करण्यात आले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे त्यांना, सध्या ते ज्या ठिकाणी राहत आहेत त्यापासून किती अंतरावर पर्यायी जमिनी दिल्या जाणार आहेत ? तसेच शासन त्यांना ज्या पर्यायी जमिनी देत आहे, त्या प्रकल्पग्रस्तांना पसंत का येत नाहीत ?

डॉ.सुनील देशमुख : बुडित लाभक्षेत्र हे वेगळया तालुक्यात आहेत. परंतु आम्ही चार-पाच तालुक्यांतील लाभ क्षेत्र दाखवून प्रकल्पग्रस्तांना कोणते ठिकाण फायदेशीर आहे याबाबतचा निर्णय त्यांनी घेतल्यानंतर शासनाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी पुनर्वसनाची कार्यवाही सुरु आहे असे उत्तर दिले आहे. 10 कोटी 37 लाख रुपये निधी वितरीत करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले आहे. परंतु प्रत्यक्षात पुनर्वसनाचे काम अद्याप अपूर्ण आहे हे देखील त्यांनी मान्य केलेले आहे. भू-संपादनाची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. निवी, भट्टी आणि कोंडावळे या तीन गावांचे अद्यापपर्यंत भू-संपादन झालेले नाही. ज्या चार ठिकाणी शासनाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले आहे त्या ठिकाणी कसल्याही प्रकारच्या नागरी सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच प्रकल्पग्रस्तांना निर्वाहभत्ता देखील मिळालेला नाही. जवळपास 1350 धरणग्रस्तांपैकी केवळ 200 ते 300 धरणग्रस्तांचेच पुनर्वसन झालेले आहे हे खरे आहे काय ? तसेच पुनर्वसनासाठी अजून किती निधीची आवश्यकता आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न पुनर्वसन आणि भू-संपादन झाले आहे काय ? असा विचारलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, गुंजवणी प्रकल्पासाठी 640 हेक्टर इतक्या भू-संपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. यावर 31 कोटी रुपये खर्च झाला आहे. सन्माननीय सदस्य ज्या निवी, भट्टी आणि कोंडावळे गावाचा उल्लेख करीत आहेत त्या तीन गावांच्या भू-संपादनाचा प्रस्ताव "खास बाब" म्हणून प्रस्तावित आहे. ॲवार्डमध्ये ज्या प्रकल्पग्रस्तांची घरे, जमिनी, झाडे यांचा अंतर्भाव करणे राहिले असेल त्या संबंधी लवकरात लवकर जॉईंट मेजर कररण्यासाठी 2/3 रक्कम भरुन टाकली आहे. कलम चार आणि सहा पर्यंत आल्यानंतर "अर्जन्सी क्लॉज" लावून तिन्ही गावांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न शासनामार्फत केला जाईल. परंतु यामध्ये मुख्य अडचण अशी आहे की, प्रकल्पग्रस्तांचे तीन गट आहेत. त्या तिन्हीही गटांकडून पर्यायी जमिनीच्या संदर्भात परस्पर विरोधी मागणी येत असल्यामुळे अडचण निर्माण झाली आहे. मी यासंदर्भात दोन-तीन बैठका घेतलेल्या आहेत. परंतु मी या सभागृहामध्ये नुकतेच आश्वासन दिले आहे की, माननीय पुनर्वसन मंत्र्यांच्या बरोबर बैठक घेऊन, सहा महिन्यात पुनर्वसन करण्यासाठी जास्तीत जास्त प्रकल्पग्रस्तांना कन्व्हेन्स करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच धरण सुध्दा लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत प्रयत्न करु. सप्लिमेंटरी बजेटमध्ये राज्याला पैसे मिळणार आहेत. 12 कोटी रुपये या प्रकल्पाला मिळाल्यामुळे हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आर्थिक अडचण राहणार नाही.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र. 12745 ....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, पुनर्वसनाचा प्रश्न महाराष्ट्रतील सर्वात मोठा प्रश्न आहे. आपण अशाप्रकारे बऱ्याच प्रोजेक्टची सुरुवात करता, त्यासाठी निधी ॲलॉकेशन करता आणि कामाला सुरुवात करता. परंतु त्या अगोदर आपण महत्वाच्या अशा पुनर्वसनाचा कामाला सुरुवात करत नाही. सभापती महोदय, त्यामुळे प्रोजेक्ट सुरु होऊन आठ-आठ वर्षे झाली तरी ते प्रोजेक्ट पूर्ण होत नाहीत व तेथील लोकांचे पुनर्वसन होत नाही. मला मान्य आहे की, तेथे दोन गट असतात, अमूक एका जागेस त्यांचा विरोध असतो, काही जण जागेला पाठिंबा देतात तर काहींचा त्यामध्ये स्वार्थ असतो अशा अनेक घटना घडत असतात. परंतु एखाद्या प्रोजेक्टचे काम सुरु करताना या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत नाही तर प्रोजेक्ट सुरुच करु नये. मला आठवते की, आम्ही काही प्रकल्पांना भेटी दिल्या होत्या. सन 1998 सालचे प्रोजेक्टदेखील अपूर्ण अवस्थेत पडलेले आहेत, तेथील लोकांचे पुनर्वसन झालेले नाही. तरी, महाराष्ट्र शासनाने या धोरणामध्ये परिवर्तन करुन प्रकल्प हाती घेताना प्रथम पुनर्वसनाची जागा पहावी, तेथील प्रकल्पग्रस्तांना कन्व्हिन्स करावे आणि नंतरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. एवढी प्रकरणे सुरु असताना आणखी प्रोजेक्ट उभारावयाचे का ? तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, पुनर्वसनाच्या बाबतीतील अशाप्रकारचा धोरणात्मक निर्णय घेऊन प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळेल असे काम महाराष्ट्र शासन करणार आहे का ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी या ठिकाणी धोरणाचा प्रश्न निर्माण केला आहे. त्या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रात पुनर्वसनाच्या कामांचे अनेक प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित आहेत हे सत्य आहे. तरी, याबाबतीत महाराष्ट्र शासनाने नवीन धोरण ठरविले आहे. महाराष्ट्र शासनाने पुनर्वसन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र प्राधिकरण निर्माण केलेले आहे. या प्राधिकरणामार्फत कृष्णा खोऱ्यासाठी आणि इतर सगळ्या गोष्टींसाठी निधी उपलब्ध होईल. निधीचा प्रश्न आता राहिलेला नाही. " आधी पुनर्वसन आणि नंतर धरण " हे धोरण महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेले आहे. या प्राधिकरणाला निधीची अडचण भासणार नाही. प्राधिकरणाचे 10 जी.आर. इश्यू केलेले आहेत. येत्या दहा दिवसांमध्ये प्राधिकरणाची पहिली मिटींग होईल आणि पुनर्वसनाचे हे सर्व प्रश्न मार्गी लागतील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील भुलेश्वर व धारावी येथील कारखान्यावर छापे घालून बाल कामगारांची केलेली सुटका व डोंगरी येथील बालसुधार गृहातील मुले पळून गेल्याबाबत

(२) * १४१३० श्रीमती सुधा जोशी , श्री. संजय दत्त , श्री. यशवंतराव गडाख , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दिपक सावंत , श्री. अरविंद सावंत , श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. गोविंदराव आदिक , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे , श्री. नतिकोद्दीन खतिब : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुलेश्वर व धारावी (मुंबई) या परिसरातील कारखान्यावर छापे घालून पोलिसांनी ४० बालकामगारांची सुटका केल्याचे दिनांक १९ जोनवारी,२००६ रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) मुंबईतील डोंगरी बालसुधारगृहातील काही मुले पळून गेल्याचे दिनांक १ जानेवारी,२००६ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(३) मुंबईतील डोंगरी येथील बालसुधारगृहातील अनेक मुलांना दारुचे व्यसन असुन त्यांना नियमित दारु पुरविण्यात येते व काही बालगुन्हेगारांचे अंडरवल्डशी थेट संबंध आहेत हे खरे आहे काय ?

(४) असल्यास, वरील प्रश्न (१), (२) व ३ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री. हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता: (१) होय.

दिनांक १२.१.२००६ रोजी भुलेश्वर येथून १० व धारावीतून ४० बालकामगारांची सुटका केली.

(२) होय.

दिनांक ३०.१२.२००५ रोजी डोंगरी बालसुधारगृहातून ३५ मुले पळून गेली.

(३) नाही.

(४) चौकशी करण्यात आली आहे. चौकशीनुसार मुले पळून जातांना कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने मला सदर प्रश्नाच्या उत्तरामध्ये किरकोळ सुधारणा आहे. सदर उत्तराच्या क्रमांक 1 मध्ये " धारावीतून 40 बालकामगारांची सुटका केली " असे देण्यात आले आहे, त्याऐवजी " धारावीतून 30 बालकामगारांची सुटका केली " असे वाचण्यात यावे. तसेच उत्तरामधील क्रमांक 2 मध्ये "दिनांक 30.12.2005" असा उल्लेख करण्यात आला आहे, त्याऐवजी "दिनांक 31.12.2005" असे वाचण्यात यावे.

सभापती : ठीक आहे. ..3

ता.प्र.क्र.14130....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, हा अतिशय ज्वलंत असा प्रश्न आहे. माननीय राज्यपालांनी देखील आपल्या भाषणामध्ये या प्रश्नाचा उल्लेख केलेला आहे. हे बाल कामगार हॉटेलमध्ये सर्रास "पोरे" म्हणून काम करतात. तसेच गालिचा कारखाना व जरीचा कारखाना यामध्ये देखील ही मुले काम करतात. "30 बाल कामगारांची सुटका केलेली आहे", असे आपण आपल्या उत्तरात सांगितले आहे. तरी, माननीय मंत्रीमहोदयांना मला असे विचारावयाचे आहे की, या 30 मुलांची आपण कोणती व्यवस्था केली आहे ? त्या बाल कामगारांचे काम आपण आता काढून घेतले आहे. तरी, त्या बाल कामगारांच्या पोटा-पाण्याची, शिक्षणाची, कायमस्वरुपी पुनर्वसनाची काही योजना आपणाकडे आहे का ? असल्यास, कोणती योजना आहे ? त्याचप्रमाणे आपण संबंधित मालकांवर कोणती कारवाई केली ? व केलेली कारवाई पुरेशी आहे का ? सभापती महोदय, "डोंगरी बालसुधारगृहातून 35 मुले पळून गेली " असा देखील उत्तरात उल्लेख करण्यात आला आहे. तरी, ती पळून गेलेली मुले आपणास सापडली का ? ती मुले बालसुधारगृहून पळून जाण्याची काही कारणे आहेत का ? सभापती महोदय, हे छोटे छोटे प्रश्न असून एकाच प्रश्नाचे अनेक कंगोरे आहेत.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14130.....

श्रीमती सुधा जोशी...

मी या प्रश्नांचे छोटे छोटे भाग सांगितले आहेत, ही मुले सापडली असतील तर त्यांची पळून जाण्याची कारणे काय आहेत ? या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांनी ती मुले का पळून गेली याबाबत काय स्पष्टीकरण दिलेले आहे ?

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय आपणास जेवढे प्रश्न कळले त्यांची उत्तरे द्यावीत.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती जोशी यांनी जे प्रश्न विचारले आहेत त्यातील मला जे कळले त्याची मी उत्तरे देतो. पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, 30 मुलांची बालकामगार म्हणून सुटका केलेली असून त्यांची राहण्याची, जेवणाची व शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. त्यानंतर 35 मुले जी पळून गेली होती त्यातील 11 मुले ही परत आलेली आहेत, व 24 मुलांचा अजूनही ठावठिकाणा लागलेला नाही यासंदर्भात चौकशी सुरु आहे. बालसुधार गृहामध्ये त्यांची सगळया प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय माझा प्रश्न असा आहे की, पकडण्यात आलेली ही मुले आहेत काय ? त्यापैकी किती मुले निराधार आहेत आणि दुसरा प्रश्न असा आहे की, जी मुले पकडलेली आहेत त्यामध्ये बाहेरच्या राज्यातील किती मुले आहेत ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, बाहेर राज्यातील किती मुले आहेत यासंदर्भातील माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांच्या उत्तराला हरकत आहे.

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही ?

सभापती : आपल्या प्रश्नांचे उत्तर देण्यास मी मंत्री महोदयांना सांगेन.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, बालसुधार गृहातून 35 मुले पळून गेलेली आहे. मुले पळून जाणे हा प्रश्न सगळीकडे निर्माण झालेला आहे. मी स्वत: त्या बालसुधार गृहाला भेट दिलेली आहे. या बाल सुधार गृहाचे अध्यक्ष गृहमंत्री असतात तर उपाध्यक्ष महिला व बाल कल्याण खात्याचे मंत्री असतात. या ठिकाणी किती वर्षापासून नियामक मंडळ अस्तित्वात नाही ? तसेच दुसरा प्रश्न

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14130.....

श्री. विनोद तावडे....

असा आहे की, तेथील पूर्वी जे चेअरमन होते ते सोडून गेल्यापासून हे पद कधीपासून भरलेले नाही. तसेच या बालसुधार गृहामध्ये 77 कर्मचाऱ्यांचे शेडयुल असतांना तेथील 19 जागा रिक्त आहेत. तसेच बाल कायद्याप्रमाणे जे बाल गुन्हेगार आहेत त्यांच्यासाठी वेगळी इमारत असावयास पाहिजे. व निराधार बालकांना वेगळी इमारत असावयास पाहिजे. परंतु या ठिकाणी बाल कामगार व बाल गुन्हेगार यांना एकाच इमारतीमध्ये ठेवण्यात येत आहे. त्यामुळे या मुलांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढते. बाल कायद्याप्रमाणे ज्या सोई-सुविधा देणे आवश्यक आहे ते आपण देणार आहात काय ? या संदर्भात शासनाने काही विचार केलेला आहे काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सदर ठिकाणी नवीन इमारत बांधण्याबाबत प्रस्ताव मागविलेला आहे. तो प्रस्ताव आल्यानंतर तेथे ताबडतोब इमारतीचे बांधकाम करण्यात येईल. त्यानंतर बाल गुन्हेगार व बालसुधार गृहातील मुलांना वेगवेगळे ठेवण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, इमारत कधी बांधण्यात येईल याबाबत मंत्री महोदयांनी निश्चित असा कालावधी सांगितला पाहिजे.

यानंतर श्री. सांगळे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14130 ....

श्री.धर्मरावबाबा आत्राम : नियामक मंडळाची बॉडी अजून तयार करण्यात आलेली नाही. गेल्या तीन वर्षांपासून हीच परिस्थिती आहे. नियामक मंडळाची बॉडी लवकरात लवकर तयार केली जाईल.

अनेक सन्माननीय सदस्य : माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराने आमचे समाधान झालेले नसल्याने हा प्रश्न राखून ठेवावा.

सभापती : ठीक आहे. मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील पवारपाडा येथे रो.ह.यो. रस्त्याच्या बांधकामात झालेला भ्रष्टाचार

(३) * १२७४९ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुधाकर गणगणे , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील पवारपाडा येथे रोजगार हमी योजनेखाली बांधण्यात येणाऱ्या रस्त्याच्या कामात सुमारे १७ लाख एवढ्या रकमेची खोटी मजूर उपस्थिती आणि मजूरांची बोगस नावे घालून भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास आले आहे वा आणून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दिनांक ३ फेब्रुवारी, २००६ रोजी इंडियन एक्सप्रेस या दैनिकात या भ्रष्टाचाराबाबत सविस्तर वृत्तांत मुख्य मथळ्याखाली प्रसिध्द करण्यात आला याकडे शासनाचे लक्ष वेधले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भ्रष्टाचाराबाबत दोषी अधिकाऱ्यांवर आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता: (१) व (२) होय.

(३) या रस्ताकामावरील गैरव्यवहाराबाबत तत्कालीन सहाय्यक अभियंता यांच्याविरुध्द मोखाडा पोलीस स्टेशनमध्ये दिनांक २० जानेवारी २००६ रोजी गुन्हा दाखल केला आहे, व तत्कालीन सहाय्यक अभियंता व शाखा अभियंता यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुधाकर गणगणे : ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील पाखरपाडा येथे रोजगार हमी योजनेखाली बांधण्यात येणा-या कामामध्ये १७ लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे शासनाने मान्य केलेले असल्यामुळे संबंधितांकडून १७ लाख रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील पाखरपाडा येथे रोजगार हमी योजनेखाली बांधण्यात येणा-या रस्त्याच्या कामाचे एकूण २२,४५,०००/- रुपयांचे अंदाजपत्रक होते. या रस्त्याच्या कामासाठी २२,४७,०००/- रुपयांचा खर्च झाला आहे. या रस्त्याचे काम झाले नाही अशी परिस्थिती नाही. या रस्त्याच्या झालेल्या कामाची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांकडून तांत्रिक तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या तपासणीमध्ये निलंबन निधी निश्चित केला जाईल व त्यानंतर किती रकमेचा गैरव्यवहार झालेला आहे हे निश्चित होईल. ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वसुलीची प्रक्रिया सुरु करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या ठिकाणी प्रश्न क्रमांक -१ ला "होय" असे उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तरात तफावत दिसते ही बाब बरोबर नाही.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : मी या संदर्भात सभागृहाला सांगू इच्छितो की, प्रश्न क्रमांक - १ मध्ये नमूद केलेल्या भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास आले आहे काय ? याच्या संदर्भात " होय " उत्तर देण्यात आलेले आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, आता हा सुध्दा प्रश्न राखून ठेवण्याची वेळ आली आहे. रोजगार हमी योजना ही भ्रष्टाचार हमी योजना झाली आहे. प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक - ६ हा सुध्दा अशाच प्रकारचा प्रश्न आहे. १७ लाख रुपये वसूल झालेले आहेत काय ? ही रक्कम वसूल करण्यासाठी संबंधितांना धाकदपटशहा दाखवून रक्कम करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत आहे. तसेच रोजगार हमी योजनेमध्ये सातत्याने होत असलेला भ्रष्टाचार थांबविण्यासाठी कोणती दीर्घकालीन उपाययोजना करणार आहात ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देणे आवश्यक आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : या रस्त्याच्या कामामध्ये नेमका किती रकमेचा भ्रष्टाचार झालेला आहे हे अजून निश्चित झालेले नाही. त्याबाबतची चौकशी सुरु आहे.

(गोंधळ)

श्री.राणा जगजितसिंह पाटील : कामामध्ये गैरव्यवहार होऊ नये यासाठी मजुरांचे पोस्ट ऑफिसमध्ये अकांऊट उघडून त्यांच्या अकाऊंटवर पैसे जमा करावयाचे. यासाठी त्यांना फोटो ओळखपत्र देण्याची पध्दत लवकरच सुरु करण्यात येईल.

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराला माझी हरकत आहे.

(यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12749....

श्री. विनायकराव मेटे (पुढे चालू.. : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ...

सभापती : मी आपल्याला हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी देऊ इच्छित नाही. मी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री देत असलेल्या उत्तरामुळे या सभागृहाच्या आणि आपल्याही प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण होत आहे. या ठिकाणी सभागृहाच्या पटलावर जे लेखी उत्तर आलेले आहे त्यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे हे शासनाने मान्य केलेले आहे. वर्तमानपत्रातून याबाबत सविस्तर वृत्त आले असल्याचेही शासनाने मान्य केले आहे. यामध्ये 17 लाख रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे काय असे विचारले असता त्याला 'होय' असे उत्तर दिलेले आहे. मात्र पुढे प्रश्न 3 ला दिलेल्या उत्तरात म्हटले आहे की, या रस्त्याच्या कामावरील गैरव्यवहाराबाबत तत्कालीन सहाय्यक अभियंता यांच्या विरूद्ध मोखाडा पोलीस ठाण्यामध्ये 20 जानेवारी 2006 रोजी गुन्हा दाखल केला आहे. असे सगळे असताना माननीय राज्यमंत्री या ठिकाणी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना योग्य ती माहिती देत नाहीत. त्यांच्याकडे या प्रकरणाची वस्तुनिष्ठ माहिती नसेल तर आपण हा प्रश्न राखून ठेवावा जेणे करून पुढील जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यावर आपल्याला चर्चा करता येऊ शकेल.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती होदय, जी केस दाखल करण्यात आलेली आहे ती एका वेगळ्या कामाच्या संबंधात जो भ्रष्टाचार झालेला आहे त्यासंबंधात दाखल केलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री या प्रकरणी अत्यंत लाईटली उत्तरे देत आहेत. मी आपल्या समोर सदर कामावरील हजेरी पत्रक ठेवतो. ज्या वृत्तपत्राच्या वार्ताहराने या कामावरील भ्रष्टाचार उघडकीस आणला आहे त्याने वृत्तपत्रातून याची माहिती देताना सांगितले आहे की, ज्या बाईला चालता येत नव्हते तिला दगड फोडल्याबद्दल 124 रूपये दिलेले आहेत. मृत बाईला 161 रूपये दिले आहेत. इतकेच नव्हे तर जी बाई 3 वर्षापूर्वी मरण पावली आहे तिला 1100 रूपये दिले आहेत. सभापती महोदय, या मस्टरमध्ये अशी अनेक नावे आहेत की, कोणी अपंग आहे तर कोणी सरकारी नोकरीमध्ये आहे त्या सगळ्यांना पैसे दिलले आहेत. तेव्हा या हजेरी पटावर असणाऱ्यांवर कोणतीही कारवाई नाही. केवळ उप अभियंता किंवा सहाय्यक अभियंता यांचेवर कारवाई होते. पण यामध्ये अगदी खाल पासून वर पर्यंत सगळे अधिकारी गुंतलेले आहेत.

..... के 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (पुढे चालू ...) ता.प्र.क्र. 12749 ...

सभापती महोदय, आपल्या राज्यात आपण राबवित असलेली रोजगार हमी योजना केंद्र सरकारने देखील आता स्वीकारलेली आहे. तेव्हा या बाबतीत आपण सविस्तर चर्चा करू आणि कोठे तरी यातून मार्ग काढू या. यामध्ये जे कोणी दोषी आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करावयास पाहिजे व त्यासाठी केवळ विभागीय चौकशी करून भागणार नाही तर सीआयडी चौकशी होणे आवश्यक आहे, तर या प्रकरणी सीआयडी तर्फे चौकशी आपण करणार काय ? आणि त्यासाठी आपण कृपया हा प्रश्न रोखून ठेवावा जेणे करून आपल्याला यावर अधिक चर्चा करता येईल.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करावी अशी सदनाची इच्छा असेल तर तशी चौकशी केली जाईल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, या कामावर बोगस मजुरी देण्यात आलेली आहे हे शासनाने मान्य केलेले आहे. जवळपास 17 लाख रूपयांचे बोगस वाटप झालेले आहे हेही मान्य केले आहे आणि मग त्या पैशाची वसुली आतापर्यंत का केली गेली नाही याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वी दोन वेळा उत्तर दिलेले आहे की, यामध्ये जी रक्कम आहे ती अजून निश्चित झालेली नाही आणि ती निश्चित केल्या नंतरच वसुलीची कारवाई आपल्याला करता येणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्न आपण रोखून ठेवावा अशी आमची आपणास विनंती आहे.

सभापती : या प्रकरणी सीआयडी मार्फत चौकशी करण्याचे माननीय राज्यमंत्र्यांनी आश्वासन दिलेले आहे. तेव्हा हा प्रश्न राखून ठेवण्याची मला गरज वाटत नाही.

****

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुंढारे या प्रकल्पग्रस्त आदिवासी कुटूंबियानी केलेले आमरण उपोषण.

(4) * 16081 श्री. प्रतापराव सोनवणे, श्री. मधुकर चव्हाण, श्री. श्रीकांत जोशी, श्री.सागर मेघे : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरुवार दिनांक 2 फेब्रुवारी, 2006 रोजी वा त्या सुमारास केशरबाई शिवाजी कुंढारे 70 वर्षे आपल्या कुटूंबासमवेत आमरण उपोषणाला बसल्या आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, कुंढारे या आदिवासी कुटूंबियांना धरणामुळे प्रकल्पग्रस्त म्हणून मिळालेली 22 आर जमिन पुनर्वसन अधिकाऱ्यांनी दिनांक 27 डिसेंबर, 2005 रोजी मोजून दिली हे खरे आहे काय,
(3) असल्यास, जमिनीच्या आजूबाजूच्या राहणारे बागायतदारांनी धाकधपटशा करुन सदर कुटूंबाचा प्रचंड छळ चालवल्याची तक्रार त्यांनी नेवासा पोलीस पुनर्वसन अधिकारी यांचेकडे वारंवार करुनही त्यांना न्याय न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(4) सदर प्रकरणी न्याय न मिळाल्याने या आदिवासी कुटुंबाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे वा त्याबाबतचा तपास पूर्ण झाला आहे काय,
(5) असल्यास, दोषी व्यक्तीविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. पतंगराव कदम : (1) होय.
(2) होय.
(3) श्रीमती केशरबाई शिवाजी कुंढारे रा. वरखेड, ता. नेवासा यांना मौजे माळेवाडी दुमला, ता. नेवासा येथील वाटप केलेले गट नं. 13/1ब/4अ4 क्षेत्र 1 हे 22 आर हया पर्यायी जमीनमध्ये लगतच्या खातेदाराने अतिक्रमण केले असल्याने सदरची जमीन मोजून ताब्यात मिळणेबाबत जिल्हाधिकारी अहमदनगर कार्यालयास अर्ज केल्यानुसार उक्त जमिनीची दि. 27/12/2005 रोजी मोजणी करुन मोजणीची नकाशा प्रत त्यांना दि. 18/1/2006 रोजी देण्यात आलेली आहे. मोजणी नकाशा प्रमाणे श्रीमती कुंढारे यांचे जमिनीलगतचे खातेदार यांनी 0.20 आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केलेले आहे. सदर कामी नेवासा येथील न्यायालयामध्ये रे.मु.नं.165/2005 हा दावा चालू असून त्यामध्ये निर्णय झालेला नाही.
(4), (5) व (6) श्रीमती कुंढारे यांना मिळालेल्या जमिनीलगतच्या खातेदाराने अतिक्रमण केले असल्याने जमिनीची मोजणी करुन मिळणेबाबत अर्ज केला होता त्याप्रमाणे त्यांना त्यांच्या जमिनीची मोजणी करुन देण्यात आलेली आहे. श्रीमती कुंढारे यांच्या मागणीप्रमाणे मोजणी करुन देण्यात आली असून सदर जमिनीबाबत नेवासा येथील न्यायालयात दावा चालू आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..... के 4 ...

ता.प्र.क्र.16081 ...

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, श्रीमती केशरबाई शिवाजी कुंढारे ही 70 वर्षे वयाची महिला आपल्या कुटुंबियांसमवेत अहमदनगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसली आहे. प्रकल्पग्रस्त झाल्यामुळे शासनाने त्यांना नेवासा येथे जमीन दिली पण त्या जमिनीमध्ये शेजारच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेले आहे. त्यांचेकडील 22 आर क्षेत्र अतिक्रमित आहे हे शासनाने या ठिकाणी कबूल केले आहे. या कुटुंबावरील अन्याय दूर करण्यासाठी शासनाने आतापर्यंत कोणते प्रयत्न केलेले आहेत किंवा करणार आहे ? प्रकल्पग्रस्तांना शासन जमीन देत असते. ...

(यानंतर श्री. सरफरे .... एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 16081...

श्री. प्रतापराव सोनवणे...

परंतु बऱ्याच ठिकाणी शासनाने प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या जमिनींच्या बाबतीत मूळ जमीन मालक सहकार्य करीत नाहीत. ही बाब प्रशासन गांभीर्याने घेत नसल्यामुळे प्रकल्पग्रस्तांचे हीत साध्य होत नाही. प्रकल्पग्रस्तांना खरोखर शासनाला न्याय द्यायचा असेल तर त्यांना संपूर्ण संरक्षण मिळाले पाहिजे. याकरीता शासनाने कडक कायदा केला पाहिजे. तशाप्रकारचा कायदा लवकरात लवकर शासन करणार आहे काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये शासनाने मोजणी केल्याप्रमाणे 22 आर जमिनीवर अतिक्रमण झाले आहे हे खरे आहे. हे प्रकरण सिव्हिल कोर्टामध्ये दाखल झाले असून कोर्टाने त्याला स्टे दिलेला आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, शासनाने लेखी उत्तरामध्ये श्रीमती केशरबाई शिवाजी कुंढारे, रा. वरखेड, ता. नेवासा यांना जी जमीन देण्यात आली त्यापैकी 0.20 आर क्षेत्रामध्ये शेजारच्या व्यक्तीने अतिक्रमण केल्याचे कबूल केले आहे. असे असतांना शेजारच्या व्यक्तीने त्यांना मिळालेल्या 0.20 आर क्षेत्रातील अतिक्रमित जमीन आपल्याला मिळाली पाहिजे यासाठी त्या उपोषणाला बसल्या आहेत. तेव्हा आपण त्यांच्या ताब्यात ती जमीन केव्हा देणार आहात? या पिडीत महिलेने कोर्टामध्ये केस टाकली आहे की शासनाने टाकली आहे? जर शासनाने कोर्टामध्ये केस टाकली असेल तर ती मागे घेऊन तिच्या अधिकारातील जमीन शासन तिला परत लवकर देणार काय?

डॉ. पतंगराव कदम : ही केस शासनाने किंवा त्या महिलेने टाकली नसून श्री. पांडुरंग मारुती कुंढारे याने टाकली असून तिला कोर्टाने स्टे दिला आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, धरणग्रस्तांच्या जमिनी शासनाने ताब्यात घेतल्यानंतर त्यांचे पुर्नवसन करीत असतांना दिल्या जाणाऱ्या जमिनीवर अतिक्रमण करण्याचे प्रकार होत असतात. अशावेळी प्रकल्पग्रस्त लोकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासन त्यांना पर्यायी जमीन देणार आहे काय?

डॉ. पतंगराव कदम : त्या महिलेला 22 आर इतकी जमीन देण्यात आली असून त्या प्रकरणी कोर्टाने स्टे दिलेला आहे. सदरहू स्टे उठविण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, एका 70 वर्षाच्या महिलेला जमीन देण्याची पूर्णपणे शासनाची जबाबदारी आहे. असे असतांना त्या महिलेला जमिनीसाठी उपोषण करावे लागत आहे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. प्रकरण कोर्टामध्ये आहे म्हणून आपल्याला हात झटकून टाकता येणार नाही. त्या महिलेला पर्यायी जमीन देण्याची जबाबदारी शासनाची आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी शासन काय कारवाई करणार आहे?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, त्या महिलेला देण्यात आलेल्या जमिनीवर शेजारच्या व्यक्तीने अतिक्रमण केले आहे. म्हणून शासनाने जमिनीची मोजणी केली असता ती 22 आर असल्याचे आढळून आले. हे प्रकरण कोर्टामध्ये असल्यामुळे त्या महिलेने दुसरी पर्यायी जमीन मागितली तर तिला देण्यात येईल.

सभापती : राज्यातील प्रकल्पग्रस्त लोकांची जमीन पाण्याखाली गेल्यामुळे त्यांना पर्यायी जमीन शासनाकडून दिली जाते त्यावेळी त्या जमिनींवर लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून अनेक कारणांमुळे अतिक्रमण केले जाते. आणि नंतर ते प्रकरण लिटीगेशन अडकविले जाते. हा मूलभूत प्रश्न कायम स्वरुपामध्ये सोडविण्यासाठी शासनाने त्यामध्ये लक्ष घालून एखादा कायदा केला तर राज्यातील सर्व प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लागतील.

डॉ. पतंगराव कदम : या संदर्भात जे प्राधिकरण निर्माण करण्यात आले आहे त्यांच्यासमोर हा विषय ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील नागरी व जिल्हा सहकारी बँकांमध्ये

ओ.टी.एस योजना सुरु करण्याबाबत

(५) * १२७५६ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री. जगदिश गुप्ता :

सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भुविकास बँक,जिल्हा सहकारी बँक, नागरी सहकारी बँक व सहकारी सोसायटी इ.बँकांमध्ये राष्ट्रीयकृत बँकांप्रमाणे ओ.टी.एस.धोरण लागू करण्याबाबत विचाराधीन असलेल्या बाबींवर शासनाने निर्णय घेतलेला आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहु निर्णयाची अंमलबजावणी प्रत्यक्षात कधीपासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

डॉ. पंतगराव कदम : (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) राष्ट्रीयकृत बँकांच्या धर्तीवर सहकारी बँकांना ओ.टी.एस. धोरण लागू करण्याबाबत रिझर्व्ह बँकेच्या सूचना नाहीत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 12756 (पुढे सुरु..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय मी मूळ प्रश्न विचारलेला होता की,"राज्यातील भुविकास बँक, जिल्हा सहकारी बँक, नागरी सहकारी बँक व सहकारी सोसायटी इ. बँकांमध्ये राष्ट्रीयकृत बँकांप्रमाणे ओ.टी.एस. धोरण लागू करण्याबाबत विचाराधीन असलेल्या बाबींवर शासनाने निर्णय घेतलेला आहे काय ? या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या दृष्टीने हा प्रश्न महत्वाचा आहे. सभापती महोदय, आपण गेल्यावर्षी आम्हाला आश्वासन दिलेले होते की, माझ्या चेंबरमध्ये संबंधित खात्याच्या मंत्र्यांना बोलावून सर्वांची बैठक घेऊन याबाबत त्वरित निर्णय करण्यास भाग पाडण्यात येईल. आजही राज्यामध्ये अनेक बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांकडून 10 हजार, 80 हजाराची रोख रक्कमेची वसुली करण्यासाठी त्यांच्या जमिनींचा लिलाव केला जात आहे. भू विकास बँकेमध्ये ओटीएस ची योजना लागू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, तो विचार केव्हा पूर्ण होणार आहे ? त्यासंबंधाने शासन केव्हा निर्णय घेणार आहे ?

डॉ.पतंगराव कदम : विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या संबंधाने रिझर्व्ह बँकचे जे नियम आहेत, त्या संबंधाने जे सर्क्युलर आहे, त्यामध्ये 10 कोटी रुपयांच्या कर्जाच्या संबंधाने आहेत, त्यांचे काही नियम हे ऑबनॉर्मल आहेत. ओटीएसची स्कीम ही पत संस्थांना लागू केलेली नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : विचाराधीन असलेल्या बाबीवर शासनाने निर्णय धेतलेला आहे काय ? या प्रश्नाला "नाही"असे उत्तर दिलेले आहे. या संबंधाने शासनाने जी.आर. काढलेला आहे. नागरी सहकारी बँकांना 30 सप्टेंबर 2006 सालापर्यन्त मुदत वाढवून देण्यात येते. सदर मुदतवाढ महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी बँकाना दिलेली आहे. असे असतांना, या संबंधातील निर्णय घेतलेला नाही असे सांगता, दुसऱ्या बाजूला नागरी सहकारी बँकांच्या बाबतीमध्ये निकष सैल करता. माझा प्रश्न असा आहे की, राष्ट्रीकृत बँकांप्रमाणे इतर बँकांनाही हा निकष केव्हा लागू करणार आहात ?

डॉ.पतंगराव कदम : मी सांगितले की, राष्ट्रीयकृत बँकांचे निकष हे आपण स्वीकारलेले नाहीत. कारण त्याची 10 कोटी रुपयाची मर्यादा आहे. काही बाबतीत त्या ठिकाणच्या चेअरमनना अधिकार आहेत. सहकारी बँकांच्या बाबतीत आदेश काढून 31-12-2006 पर्यन्त मुदत वाढविलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 12756 (पुढे सुरु..

डॉ.पतंगराव कदम (पुढे सुरु....

आहे. नागरी बँकांना आणि इतर बँकांना हे आदेश लागू केलेले आहेत. राष्ट्रीयकृत बँकांचे नॉर्म्स आपण स्वीकारलेले नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये आश्वासन दिलेले होते, त्याप्रमाणे दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची कमिटी मंत्री महोदयांनी जाहीर केली. त्या कमिटीमध्ये मी सदस्य आहे. गेल्या आठवडयामध्ये दोन वेळा या समितीच्या बैठका झाल्या. त्यावेळेला मंत्री महोदयांनी सांगितले की, राष्ट्रीयकृत बँकांना वन टाईम सेटलमेंटचा अधिकार आहे, तसा अधिकार शासन इतर बँकांना देईल. या संदर्भाने हा अधिकार आम्हाला कायद्याने द्यावा, अशाप्रकारची मागणी केलेली आहे तेव्हा तसा अधिकारी रिझर्व्ह बँकेच्या अधीन राहून ओटीएसला परवानगी देणार आहात काय ?

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्य हे गल्लत करतात.

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य हे सरळ प्रश्न विचारत आहेत.

डॉ.पतंगराव कदम : जी विधिमंडळ सदस्यांची समिती नेमलेली आह, त्यामध्ये शेतकऱ्यांचा व्याजाचा दर कसा असावा या संबंधात या समितीच्या बैठका घेतल्या. महाराष्ट्र शासनाने सर्व शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज देण्याचे धोरण घेतलेले आहे. केंद्राने 7 टक्के दराने 3 लाखापर्यन्त कर्जाची मर्यादा केलेली आहे. त्यासंबंधातील डिटेल्स त्यांच्याकडून धेत आहोत. परंतु येत्या खरीप हंगामापासून शेतकऱ्यांना 6 टक्के दराने 3 लाखापर्यन्त कर्ज देण्याचा निर्णय केलेला आहे. आपण राष्ट्रीयकृत बँकांचे धोरण स्वीकारलेले नाही. त्यांना 10 कोटीपर्यन्तच्या कर्जाच्या मर्यादेचा अधिकार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : शेतकरी 10 कोटी रुपयापर्यन्त कर्ज घेणार आहेत काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतकरी कोठे 10 कोटी रुपयांपर्यंत कर्ज काढतात ?

डॉ. पतंगराव कदम : प्रश्न असा आहे की, राष्ट्रीयकृत बॅकांच्या बाबतीत धोरण स्वीकारलेले आहे काय ? वन टाईम सेटलमेंटचे धोरण आम्ही स्वीकारलेले आहे आणि तसे आदेश काढलेले आहेत. 31.12.2006 पर्यंत त्याची मुदतही वाढविलेली आहे.

प्रा. शरद पाटील : माननीय मंत्रिमहोदयांनी सुरुवातीला उत्तरामध्ये सांगितल्याप्रमाणे खरोखरच ओ.टी.एस.ची सवलत नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था यांना लागू केलेली आहे हे खरे आहे काय ? दुसरा प्रश्न असा की, माननीय मंत्रिमहोदय वारंवार सांगत आहेत की, 30 सप्टेंबर, 2006 पर्यंत...

श्री. पांडुरंग फुंडकर : 30 सप्टेंबरचा जी.आर. आहे.

प्रा. शरद पाटील : माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 30 सप्टेंबर, 2006 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितलेले आहे.

डॉ. पतंगराव कदम : मी 31.12.2006 पर्यंत सांगितले आहे.

प्रा. शरद पाटील : याचा अर्थ 31 डिसेंबर, 2006 पर्यंत जी खाती एन.पी.ए.मध्ये आहेत आणि डाऊटफूल होणार आहेत अशा खात्यांसाठी ही सवलत लागू आहे की, शासनाच्या पूर्वीच्या निर्णयाप्रमाणे 31 मार्च 2001 पर्यंतच्या एन.पी.ए.झालेल्या खात्यांना ही सवलत लागू आहे ?

डॉ. पतंगराव कदम : ही सवलत एन.पी.ए. झालेल्या खात्यांना लागू आहे.

प्रा. शरद पाटील : माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. शासनाच्या आताच्या निर्णयानुसार 31 मार्च, 2001 पर्यंत एन.पी.ए. झालेल्या खात्यांना ओ.टी.एस.ची जी सवलत लागू आहे तीच यापुढेही चालू राहील की त्याला मुदतवाढ दिली जाणार आहे ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, एन.पी.ए. झालेल्या खात्यांच्या बाबतीत 31 मार्च, 2000 चा जो निर्णय घेतलेला आहे त्याची मुदत सुरुवातीला 31 मार्च 2001 पर्यंत वाढविलेली होती. आता 31.1.2006 पर्यंत मुदत वाढविलेली आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, ज्या नागरी बँकेमध्ये महाराष्ट्र सरकारची एक पैशाचीही गुंतवणूक नाही त्या नागरी बँकांकडील छोटे मोठे उद्योग आजारी पडलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

ता. प्र. क्र. 12756 ..... श्री. श्रीकांत जोशी .....

सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील सांगत आहेत की, आपली काहीही गुंतवणूक नसेल तर रिझर्व बँकेप्रमाणे त्यांना ओ.टी.एस. करण्याची परवानगी देण्यास आपली काय अडचण आहे ? तो निर्णय आपण 2005 पासून ताबडतोब रिझर्व बँकेप्रमाणे का लागू करीत नाही ?

डॉ. पतंगराव कदम : राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे मी सांगितले की, प्रथमदर्शनी त्यांचे नियम वेगळे आहेत आणि अर्बन बँकांना या पध्दतीची ओ.टी.एस. करावयास गेले तर सगळ्या बँका बंद पडतील.

श्री. श्रीकांत जोशी : ज्या बँकां नफ्यामध्ये आहेत त्या ठिकाणी ते करण्याचा अधिकार आहे. नाही तर ते उद्योग चालणार नाहीत. ते उद्योग बंद पडतील.

डॉ. पतंगराव कदम : या धोरणापेक्षा खास कोणत्या अर्बन बँकेला परवानगी द्यावयाची असेल तर त्यांनी शासनाकडे परवानगी मागावी. त्याचा विचार करु.

श्री. सागर मेघे : माननीय मंत्रिमहोदयांनी जी मुदत सांगितली ती अर्ज करण्याची आहे की, त्या तारखेपर्यंत जे एन.पी.ए. होतील त्यांना आपण ओ.टी.एस.ची परवानगी देणार ? जी.आर.असे म्हणतो की, अर्ज केलेला आहे.....

डॉ. पतंगराव कदम : अर्ज करण्याच्या बाबतीत नव्हे तर त्या तारखेपर्यंत आम्ही मुदतवढ दिलेली आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला आणि सांगितले की, राज्य सरकारने एक समिती गठीत केली होती आणि त्या समितीमध्ये ते सदस्य आहेत. त्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, शेतकऱ्यांना या हंगामापासून शेतीसाठी 3 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज 6 टक्के व्याजाने उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु या 6 टक्के व्याजामध्ये जिल्हा बँक आणि विविध सहकारी बँक यांचे कोणत्याही प्रकारचे कमिशन राहणार नाही काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, यासाठी राज्य बँकेने 20 पैसे घ्यावयाचे, त्यानंतर जिल्हा बँकेने 1 रुपया आणि सोसायटीने 2 रुपये घ्यावयाचे असे आम्ही ठरविलेले होते.

(काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अडथळा) त्यानंतर केन्द्र शासनाचे अर्थमंत्री श्री. पी. चिदंबरम यांनी 3 लाखपर्यन्त 7 टक्क्याची घोषणा केली. 7 टक्क्याचे वाटप कसे होईल यासंबंधी माहिती अद्याप मिळालेली नाही. ती मिळेपर्यन्त पूर्वी प्रमाणेच वाटप राहील. याबाबतीत पुनर्विचार होईल. परंतु 6 टक्क्यावर सरकार फर्म आहे.

सभापती : राज्यातील शेतक-यांच्या दृष्टीने हा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा प्रश्न आहे. शेतक-यांची पिळवणूक थांबविण्यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. माझी सदनाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या मार्फत अशी सूचना आहे की, या मूलभूत प्रश्नाकरिता माननीय सहकार मंत्र्यांनी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी केन्द्रीय अर्थ विभाग आणि अर्थमंत्री तसेच केन्द्रीय कृषी मंत्री यांच्याशी महाराष्ट्राच्या कृषी धोरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील शेतकरी वाचविण्याकरिता वन टाईम सेटलमेंटचे मूलभूत निकष निश्चित करण्यासंबंधी चर्चा करावी.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे केन्द्रीय अर्थेमंत्र्यांशी आम्ही चर्चा करु.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती : माननीय सदस्य जर मला दालनात भेटले असते तर मी त्यांना परवानगी दिली असती. औचित्याचा मुद्दा मांडण्याबाबत मी माननीय सदस्यांना उद्या परवानगी देईन.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई महानगरपालिका प्रशासनाने एक परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकामुळे मुंबई शहरातील जीर्ण इमारतींच्या दुरुस्तीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मुंबई शहरातील जीर्ण झालेल्या इमारती घर दुरुस्ती मंडळ दुरुस्त करते. परंतु पालिका आयुक्तांनी एक परिपत्रक काढून जुन्या इमारती दुरुस्त करण्याला प्रतिबंध केलेला आहे. या परिपत्रकामध्ये असे म्हटलेले आहे की, "The existing Circular No.ChE/142/DPBC dated 15-5-96, on the basis of which plans are normally approved for repairs/repairs amounting to reconstruction of existing buildings is withdrawn and cancelled with immediate effect. In case repair permissions are required to be considered keeping in view the protection of human life and avoiding loss of property, the department should approach Urban Development Department/Government of Maharasthra...

सभापती महोदय, गेली अनेक वर्षे घर दुरुस्ती मंडळाच्या माध्यमातून मुंबई शहरातील जीर्ण इमारती दुरुसत होत होत्या. परंतु महापालिकेने अशा प्रकारचे परिपत्रक काढल्यामुळे हे दुरुस्तीचे काम ठप्प झालेले आहे. घर दुरुस्ती मंडळा मार्फत जुन्या इमारतींचे सर्वेक्षण सुरु आहे. जीर्ण इमारती या पावसाळयामध्ये पडू नयेत म्हणून त्या दुरुस्त करण्याचे काम होत असताना महापालिका प्रशासनाने काढलेल्या परिपत्रकामुळे अडचण निर्माण झालेली आहे. हे परिपत्रक काढण्याचे कारण देताना असे म्हटलेले आहे की, "Proposed changes in administrative, procedural and prevailing policies of Development Plan/Building Proposal Section on account of systemic failures that have come to light in the matter of "Sara-Sahara".

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, सारा-सहारा बाबत निर्माण झालेल्या प्रश्नामुळे संपूर्ण मुंबई शहराला वेठीस धरण्याचा हा प्रकार आहे काय ? तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नामध्ये लक्ष घालून हे परिपत्रक ताबडतोबीने मागे घेण्याच्या सूचना पालिका प्रशासनाला द्याव्यात अशी माझी त्यांना विनंती आहे. परिपत्रक मागे घेतले नाही तर जीर्ण इमारतींच्या दुरुस्तीचे काम ठप्प होईल.

सभापती : माननीय सदस्यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी तसेच माननीय नगरविकास मंत्र्यांनी या प्रश्नामध्ये लक्ष घालावे.

श्री. नारायण राणे : या प्रश्नामध्ये लक्ष घालण्यात येईल.

--

...नंतर श्री.कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबईमध्ये गेल्या काही दिवसांपासून गॅस्ट्रोची साथ सुरु झाल्यामुळे रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढच होत आहे. कालपर्यंत 140 रुग्ण हॉस्पीटलमध्ये दाखल झाले होते. हा आकडा 190-200 पर्यंत जाण्याचा संभव आहे. सेंटजॉर्ज,जी.टी.,कस्तुरबा इ. रुग्णालयांमधून रुग्णांना दाखल करुन घेण्यासाठी जागा शिल्लक नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. महानगरपालिका आणि राज्य शासनाचा वैद्यकीय शिक्षण विभाग आतापर्यंत नेमकी कशाची साथ सुरु आहे याचे डायग्नोसिस् करु शकलेले नाहीत. कॉलरा आहे किंवा दुसऱ्या कोणत्या जंतुसंसर्गातून ही साथ सुरु झाली आहे याचा निष्कर्ष निघालेला नाही. दूषित पाण्यामुळे ही साथ सुरु आहे असे वाटते. मुंबईमध्ये ठिकठिकाणी जे खोदकाम सुरु झाले आहे त्यामधून जलवाहिन्या जात असल्यामुळे जंतूसंसर्गातून ही साथ सुरु झाली आहे असे प्रथमदर्शनी वाटते. शासनाने अजूनपर्यंत याबाबतीत कोणत्याही प्रकारचे निवेदन सभागृहामध्ये केलेले नाही. या साथीमध्ये आतापर्यंत दोन रुग्णांचा मृत्यूही झालेला आहे. माझी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला अशी विनंती आहे की, सर्वप्रथम मुंबई शहरामध्ये येणाऱ्या नागरिकांवर बंधन घालणे आवश्यक आहे. शहरामध्ये एन्ट्री रिस्ट्रीक्टेड करणे अतिशय आवश्यक आहे.तसेच येथील नागरिकांना सध्या असलेल्या जलवाहिन्यांमधील पाणीपुरवठा खंडित करुन दुसऱ्या पध्दतीने शुध्द पाण्याचा पुरवठा कसा करता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे. या रोगाला कसा आळा घालता येईल याकडे शासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच शासनाने याबाबतीत तातडीने निवेदन करावे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो. तसेच यासंबंधात जे परिपत्रक काढण्यात आले आहे ते अतिशय अपुरे आहे आणि त्यात अनेक प्रकारच्या त्रुटी आहेत त्यामध्ये सुधारणा करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती : शासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घ्यावी.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, "ठीक आहे".

....2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ज्येष्ठ प्रतिभावंत साहित्यिक विंदा करंदीकर यांना "ज्ञानपीठ" पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव.

मु.शी. : ज्येष्ठ प्रतिभावंत साहित्यिक विंदा करंदीकर यांना "ज्ञानपीठ" पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव.

सभापती : माननीय सदस्यांच्या माहितीकरिता मी सांगू इच्छितो की माननीय मुख्यमंत्री,विरोधीपक्षनेते तसेच सर्व पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करुन सर्वांच्या संमतीने हा अभिनंदनपर प्रस्ताव मांडला जात आहे.

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी पुढीलप्रमाणे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो.

"ज्येष्ठ प्रतिभावंत साहित्यिक श्री. विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल हे सभागृह त्यांचे एकमुखाने अभिनंदन करीत आहे."

सभापती महोदय, मराठी साहित्य सृष्टीवरच संपन्नतेचे लेणे चढविणारे ज्येष्ठ प्रतिभावंत साहित्यिक, जाणीवनिष्ठ कवी, भाषांतरकार, समीक्षक आणि प्राध्यापक अशी बहुरंगी ओळख असेलेले गोविंद विनायक करंदीकर ऊर्फ विंदा करंदीकर यांना भारतीय स्तरावरील साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचा मानला जाणारा 2003 सालचा ज्ञानपीठ हा शिखर सन्मान यावर्षी प्राप्त झालेला आहे.

सभापती महोदय, सर्वसामान्य माणूस हाच विंदांचा साहित्य निर्मितीचा एक केन्द्रबिन्दू आहे आणि त्या निर्मितीचा अभिप्रेत वाचक आहे. सामान्य माणूस आणि त्याचा जीवनकलह आणि त्याची स्वप्ने व स्वप्नभंग आणि या सर्वातून महत्वाचे म्हणजे त्याची जगण्याची विलक्षण चिवट इच्छाशक्ती हे त्यांच्या प्रतिभेचे मुख्य लक्षण असल्याची अनुभूति त्यांच्या साहित्यातून आपल्याला आलेली आहे. त्यांच्या अभिजात साहित्य निर्मितीला प्राप्त झालेला "ज्ञानपीठ" पुरस्कार म्हणजे संपूर्ण मराठी साहित्याचा आणि मराठी काव्य प्रतिभेचा व मराठी भाषेचा उचित असा राष्ट्रीय गौरव झालेला आहे. सा-या महाराष्ट्राला या घटनेमुळे अतिशय आनंद झाला आणि म्हणून सभागृहाने या आनंददायी घटनेची नोंद घेवूनच अभिनंदनाचा प्रस्ताव मी या ठिकाणी मांडलेला आहे. अध्यक्ष महाराज, मी जो अभिनंदनाचा प्रस्ताव येथे मांडलेला आहे, त्यावर आता चर्चा व्हावी ही विनंती.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहामध्ये राज्याचे महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी महाराष्ट्रातील थोर साहित्यिक कवी श्री. विंदा करंदीकर यांना भारतीय ज्ञानपीठ निवड मंडळाने जो ज्ञानपीठ पुरस्कार दिला आणि त्यांचा गौरव केला आणि हे करीत असताना महाराष्ट्राची शान वाढविली त्याबद्दल मांडलेल्या अभिनंदन प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. हा पुरस्कार यापूर्वी महाराष्ट्रातील दोन साहित्यिक कै. कुसुमाग्रज आणि कै. वि.स.खांडेकर यांना सुमारे 20 वर्षापूर्वी मिळाला होता.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

आणि त्यानंतर आता विंदांना हा पुरस्कार मिळालेला आहे. विंदांना जो पुरस्कार मिळाला आहे तो खऱ्या अर्थाने त्यांचा गौरव आहे. ते जसे साहित्यिक आहेत तसेच अत्यंत चांगले कवि देखील आहेत. मुळचे शिक्षकी आणि प्राध्यापकी पेशाचे असतांना त्यांनी व स्व. वसंत बापट आणि श्री. मंगेश पाडगांवकर या तिघांनी मिळून त्यांच्या कविता वाचणाऱ्या समग्र महाराष्ट्राला त्या काळात मंत्रमुग्ध केले होते. कविता ही चिरेबंदी राजवाडयापुरती मर्यादित न ठेवता तिला फुटपाथपर्यंतच्या माणसाच्या आयुष्यापर्यंत नेण्याचे ध्येय त्यांनी स्वीकारले होते अशा मोठया व्यक्तीचा मोठया मनाने जो गौरव ज्ञानपीठ पुरस्कार निवड मंडळाने केला तो केवळ विंदांचाच गौरव नाही तर संपूर्ण महाराष्ट्राच्या साहित्याचा गौरव होऊ शकतो. डाव्या आणि श्रमिक वर्गाच्या परंपरा व संस्कृतीचा तो गौरव आहे. कारण सर्वसामान्य माणूस आणि गोरगरीब माणूस तसेच श्रमिक वर्ग यांना विंदांनी केंद्रबिंदू मानले व सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील वस्तुस्थिती आपल्या कवितांच्या माध्यमातून त्यांनी उतरविली. तसेच त्यांची नाळ या मातीशी व परंपरांशी घट्टपणे जुळली. आपल्याला जे योग्य वाटते तेच करायचे हा विंदांच्या व्यक्तिमत्वाचा एक पैलू होता. विशेष म्हणजे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक असतांना त्यांनी मराठी साहित्यसृष्टीत स्वत:चे एक अद्वितीय असे स्थान निर्माण केले म्हणून त्यांचा गौरव हा साहित्यसृष्टीचा व महाराष्ट्राचाच गौरव आहे असे मी समजतो व विरोधी पक्षाच्या वतीने या प्रस्तावाला समर्थन देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्याचे माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी ज्येष्ठ साहित्यिक, प्रतिभावंत साहित्यिक श्री. विंदा यांना जो ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे त्याबद्दल अभिनंदन करणारा प्रस्ताव सदनामध्ये मांडलेला आहे, त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, खरे म्हणजे हा प्रस्ताव अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी येणे आवश्यक होते. शासनाने पुढाकार घेऊन अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी हा प्रस्ताव मांडला असता तर इतर प्रस्तावांच्या अगोदरच या प्रस्तावावर चर्चा झाली असती. श्रेष्ठ साहित्यिक आपले आणि संपूर्ण जीवन ज्यांनी शिक्षण क्षेत्रात व्यतित केलेले आहे त्या विंदांना मी यापूर्वी देखील भेटलेलो आहे परंतु ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांचे अभिनंदन करण्यासाठी ज्यावेळी मी त्यांच्या घरी गेलो त्यावेळी चार माळे चढून त्यांच्या घरी जावे लागले. त्यांच्या इमारतीला लिफ्टची सोय नाही. अशा परिस्थितीत दिवसातून दोन तीन वेळा ते जिना उतरुन व चढून येत असतात. त्यांचे वय आज जवळपास 88 पर्यंत आहे व अशा परिस्थितीत त्यांना चार जिने चढून जावे लागते. राज्याचे अनेक मंत्री महोदय देखील त्यांच्या घरी गेले असतील, त्याचप्रमाणे मुंबईतील, राज्यातील व देशातील अनेक लोक त्यांच्या घरी येऊन त्यांचे अभिनंदन करुन गेले. कारण हा एक अद्वितीय असा सन्मान असून तो जवळपास 20 वर्षानंतर विंदांना मिळाला आहे. यापूर्वी स्व. वि.स.खांडेकरांना हा पुरस्कार मिळाला व कवि कै. कुसुमाग्रजांना देखील मिळालेला आहे. हा सन्मान खरे म्हणजे शारदादेवीचा सन्मान आहे आणि त्यादृष्टीने राज्यातील व देशातील सर्वांनीच त्यांचे कौतुक करावे असा हा प्रसंग आहे. हा पुरस्कार काहींना मरणोत्तर देखील देण्यात येतो परंतु सुदैवाने विंदा हे आज हयात आहेत व जिवंतपणी त्यांना हा पुरस्कार मिळालेला आहे. याचा अर्थ ज्ञानपीठ पुरस्कार निवड मंडळाची जी समितीने आहे त्या समितीने देशातील थोर साहित्यिकांच्या कार्याचा वेळेवर अभ्यास करुन त्यांचे साहित्य विचारात घेऊन हा निर्णय घेण्याची आवश्यकता असते, त्याप्रमाणे हा निर्णय झालेला आहे. विंदांनी कुठलीही गोष्ट मागितलेली नाही परंतु शासनाने त्यांच्या इमारतीला लिफ्टची व्यवस्था नाही त्याबाबत विचार करावा व त्यांना न विचारता त्यांच्या इमारतीला लिफ्टची सोय करुन द्यावी. यासाठी त्यांच्या इमारतीतील लोक तयार होतील असे नाही.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

फक्त त्यांच्यासाठी लिफ्टची सोय करुन दिली तर बरे होईल. त्यांची पत्नी देखील वृद्ध झालेली आहे. आज विंदांचे वय 88 वर्ष इतके आहे. विंदा आपल्याकडे लिफ्टची मागणी करणार नाहीत. तरी सुध्दा या प्रश्नाचा शासनाने सहानुभूतीने विचार करावा अशी माझी विनंती आहे. शासनाकडे काही मागण्याचा विंदांचा स्वभाव नाही. आयुष्यभर ते साधेपणाने त्यागमय जीवन जगलेले आहेत. काव्याची निर्मिती करताना त्यांना जास्त आनंद होतो. हे काव्य जनसामान्यांपर्यंत, श्रमिकांपर्यंत कसे पोहचेल याचा त्यांनी सदैव विचार केलेला आहे. विंदा हे आमच्या कोकण भूमीतील आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयातील ते आहेत. कोकणातील मातीत त्यांचा जन्म झालेला आहे. कोकणातील बुध्दीमत्ता व विद्वत्ता त्यांच्या पाठीशी आहे. मला विदांनी न सांगितलेली जी अडचण दिसत आहे, ती शासनाने दूर करावी. विंदांचे म्हणणे आहे की, मी जर वर-खाली उतरत राहिलो तर माझी तब्येत चांगली राहील. पण यापुढे त्यांना चढ-उतार करणे दिवसेंदिवस कठीण जाणार आहे. म्हणून मी लिफ्ट बसविण्याची जी सूचना केली आहे त्याचा विचार शासनाने करावा. सन्माननीय महसूल मंत्र्यांनी अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला आहे, त्याला मी पाठिंबा देतो आणि भविष्यकाळामध्ये असेच ज्ञानपीठ पुरस्कार महाराष्ट्रातील विद्वान साहित्यिकांना लाभो अशी ईश चरणी प्रार्थना करतो.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, ज्ञानपीठ पुरस्काराने कोकणच्या एका सुपुत्राचा गौरव झालेला आहे. त्या निमित्ताने या सुपुत्राचे अभिनंदन करण्याचा प्रस्ताव हा योगायोगाने कोकणातील दुसऱ्या एका सुपुत्राने मांडलेला आहे. महाराष्ट्रातील साहित्यिक जीवनामध्ये विंदांना आज आगळेवेगळे स्थान आहे. यामुळेच आज संबंध महाराष्ट्रातील साहित्य सृष्टिचा गौरव झालेला आहे. हा ज्ञानपीठ पुरस्कार एका जैन कुटुंबियाने मोठी देणगी देऊन सुरू केलेला आहे. पण या पुरस्कार समितीमध्ये जैन कुटुंबियांचा कोणीही सदस्य नसतो. फार मोठी माणसे या पुरस्कार समितीमध्ये असतात. पुरस्कार दिल्यामुळे अनेक वेळा एखाद्याचा गौरव वाढतो. पुरस्कार ज्या व्यक्तीला दिला जातो त्यामुळे देखील पुरस्कारचा गौरव वाढतो. ज्ञानपीठ पुरस्कार हा असा आहे की, ज्यामुळे दोघांचाही गौरव वाढतो. महाराष्ट्रामध्ये हा पुरस्कार आतापर्यंत कुसुमाग्रज आणि वि.स.खांडेकरांना मिळालेला आहे. आज तोच पुरस्कार विंदा करंदीकर यांना मिळालेला आहे. मला मनापासून आनंद होतो की, हे तीनही लोक व्यवसायाने सरस्वतीचे उपासक तर होतेच पण शिक्षक देखील होते. ही साधना करण्यामध्ये फार महत्त्वाचा व्यवसाय म्हणून या व्यवसायाला गणले गेले आहे. मला याची जाणीव आहे की, सर्व व्यवसायामध्ये कमीजास्त लोक असतात. आज काही शिक्षकांमुळे माननीय शिक्षणमंत्र्यांवर देखील वेगळी पाळी आली आहे, ते दुसरे टोक आहे. आज सर्व ठिकाणी सर्वप्रकारचे मेटेरियल असते. विंदांना आज ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यामुळे मला आज खरोखर मनापासून आंनद होतो आहे. आयुष्याची अनेक वर्षे त्यांनी प्राध्यापक म्हणून, शिक्षक म्हणून काम केलेले आहे. शब्द टिकाऊ केव्हा होतात ? मानवी जीवनाला हात घालणारा विषय घेऊन ज्यावेळेला शब्द समोर येतात, त्यावेळेला त्या शब्दातून समोर आलेले शिल्प आणि शिल्पकार हे अमर होतात. मनुष्य जीवंत आहे तो पर्यंत मान-अपमानाची भावना ही शिल्लक राहतेच. म्हणून मग आपण कै.खाडिलकरांचा उल्लेख करतो. त्यांनी मानापमान नाटक त्यावेळी लिहिलेले आहे. पण तेवढयाच अवीट गोडीने लोक आज ते पहात आहेत. शृंगार हा प्रकार जो पर्यंत मनुष्य जीवंत आहे, तो पर्यंत राहणार आहे. 100 वर्ष झाली तरी आज सौभद्र नाटकाची गोडी कमी होत नाही. फाल्गुनरावाच्या पात्रामुळे मराठी नाटकाला संशयकल्लोळ असे नाव देण्यात आले. जो पर्यंत मनुष्य आहे तो पर्यंत संशय अमर आहे. म्हणून संशयकल्लोळ नाटकसुध्दा अमर आहे. याच उंचीला जाणारे कवित्त्व विंदांनी केले. त्यामुळे अनेक वर्ष त्यांचे शब्द आपल्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मनाला साथ देत राहतील. त्यांनी तरूण आणि तरुणीच्या शृंगाराचे वर्णन केले आहे. उपकार करणारा आणि घेणारा याचे देखील त्यांनी वर्णन केले आहे. म्हणजे जो पर्यंत मनुष्य आहे, तो पर्यंत त्यांनी ज्या चार गोष्टींचे वर्णन केले आहे, त्या गोष्टी जीवंत राहणार आहेत. देणारा देखील जीवंत राहणार आहे आणि घेणारा देखील जीवंत राहणार आहे. त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून असे म्हटले आहे की,

यानंतर श्री.बोर्डे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"देणाऱ्याने देत जावे,
घेणाऱ्याने घेत जावे,
घेता घेता एक दिवस,
देणाऱ्याचे हात घ्यावेत "

परंतु मनुष्याची जमात जोपर्यंत आहे तोपर्यंत "देणारा" आणि "घेणारा" हे दोन्हीही वर्ग अस्तित्वात आहेत आणि ते दोघेही अमर आहेत. विंदा यांची ही जी शब्दरचना आहे तिला खरोखरच तोड नाही. यासंदर्भात अनेक दाखले देता येतील. वास्तविक पाहता या अभिनंदन प्रस्तावाचा स्कोप पाहिला तर मला मनापासून आनंद व्यक्त करणे आवश्यक वाटते. भारताच्या साहित्य सृष्टीमध्ये तब्बल तिसऱ्यांदा हा पुरस्कार महाराष्ट्राला मिळालेला आहे. हा पुरस्कार मिळत असताना विंदांनी जे नेतृत्व केले त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी विंदा करंदीकर यांना "ज्ञानपीठ" पुरस्कार मिळाल्याबद्दल जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे समर्थन करुन, त्याबाबत माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

खरे म्हणजे हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. केवळ सभागृहाच्याच नव्हेतर राज्याच्या दृष्टीने सुध्दा हा आनंदाचा क्षण आहे. दुनियेमध्ये ज्या, ज्या ठिकाणी मराठी माणूस आहे त्या सर्वांना विंदा करंदीकरांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद झालेला आहे. राज्याच्या सर्वोच्च सभागृहाच्या माध्यमातून, राज्याच्या वतीने भावना व्यक्त करताना जो प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आला आहे त्याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार व प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे विंदा केवळ साहित्यिक, विचारवंत, श्रेष्ठ कवी नसून, त्यांचे जे लिखाण आहे, जे काव्य आहे ते असामान्य आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, श्रमजीवी, शेवटच्या माणसाच्या वेदना मांडण्याचे काम विंदा यांनी आपल्या आयुष्यात केले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्या वेळच्या अनेक नेत्यांनी, कवींनी, शाहिरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. त्यामध्ये विंदा हे सुध्दा मागे नव्हते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये 105 हुतात्म्यांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. त्यानंतर मराठी भाषिकांचे राज्य निर्माण झाले. या संबंधी विंदांनी भावना व्यक्त केल्या आहेत. अनेक वर्षांपासून कर्नाटक-महाराष्ट्र सीमा प्रश्न प्रलंबित आहे. ज्या 105 हुतात्म्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी आपले प्राण गमावले आहेत त्या हुतात्म्यांच्या आत्म्याला आज काय वाटत असेल ही भावना विंदा करंदीकर यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून व्यक्त केली आहे. हा सीमा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे असा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आलेला आहे. विंदा यांची भावना संयुक्त महाराष्ट्र परिपूर्ण व्हावा अशा प्रकारची आहे. विंदा हे इंग्रजीचे प्राध्यापक होते, समीक्षक होते, विचारवंत होते. ते अतिशय लोकप्रिय होते. वसंत बापट, मंगेश पाडगांवकर व त्यापूर्वी बा.भ. बोरकर, यशवंत यांची जी काव्य गायनाची परंपरा होती त्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

काव्य गायनाच्या अनेक मैफली या तिघांनी जिंकल्या होत्या. हजारो श्रोत्यांनी त्यांच्या कवितांना दाद दिल्याचे अख्ख्या महाराष्ट्राने पाहिले आहे.

वास्तविक पाहता आजचा दिवस हा संत तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठगमनाचा दिवस आहे. माननीय उपमुख्यमंत्री, माननीय दिलीप वळसे पाटील व मी देहू येथे जाऊन त्यांचे दर्शन घेऊन आलो आहे. विंदा यांनी तुकाराम महाराजांचे तत्वज्ञान सांगत असताना शेक्सपिअर आणि तुकाराम यांचा संवाद आपल्या कवितेच्या माध्यमातून मांडला आहे. त्यांनी काव्यामध्ये केलेल्या वर्णनाच्या माध्यमातून जगाला दाखवून दिले आहे की, टॉलस्टॉय असतील किंवा शेक्सपिअर असतील या सगळयांच्या तुलनेपेक्षा, तुकोबांचे विचार, तुकोबांनी सांगितलेले अभंग, तुकोबांनी सांगितलेले तत्वज्ञान हे केवळ त्यांच्या तुलनेने बरोबरीचे नव्हेतर त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

असे काव्य त्यांनी लिहिले आणि ते काव्य वाचन त्यांच्या मुखातून मला या ठिकाणी ऐकायला मिळाले. आज जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या या वैकुंठगमनाच्या दिवशी मला हा मुद्दा जरुर मांडला पाहिजे. मराठी सारस्वतामध्ये अनेक थोर साहित्यिक होऊन गेले. परंतु हा ज्ञानपीठ पुरस्कार आपल्याला 20 वर्षांनी मिळत आहे. कुसुमाग्रज व भाऊसाहेब खांडेकरांच्यानंतर आज विंदा करंदीकरांना हा ज्ञानपीठ पुरस्कार मिळत आहे. त्यामुळे मला या ठिकाणी हेही अतिशय अभिमानाने आणि आनंदाने सांगितले पाहिजे की, महाराष्ट्रातील सर्व लोकांना विंदांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल आनंद झाला आहे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री त्या दिवशी दिल्लीमध्ये होते, ते मुंबईच्या विमानतळावर उतरल्याबरोबर प्रथम विंदा करंदीकरांच्या घरी गेले आणि शासनाच्या वतीने तसेच महाराष्ट्राच्या दहा कोटी जनतेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. सभापती महोदय, हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. मला आठवते की, भाऊसाहेब खांडेकरांचा सत्कार स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या हस्ते कोल्हापूरच्या खासबाग मैदानात झाला होता आणि त्या ठिकाणी 50 हजारांपेक्षा जास्त लोक उपस्थित होते. त्यावेळी स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांचे भाषण एवढे सुंदर झाले होते की, " सत्काराला उत्तर देताना भाऊसाहेब खांडेकर म्हणाले की, माझ्या कथा-कादंबऱ्यांना आणि माझ्या साहित्याला उत्तम समीक्षक आणि रसग्रहण करणारा हा नेता जर मला अगोदर मिळाला असता तर माझ्याकडून याहीपेक्षा उत्तम लिखाण झाले असते. " कुसुमाग्रजांच्या पुरस्काराबद्दलचा सत्कार कै. नरसिंह राव पंतप्रधान असताना माननीय केंद्रीय मंत्री वसंत साठे यांनी त्यांच्या घरी दिल्लीला घडवून आणला. त्यावेळी दिल्लीच्या सर्व खासदारांना, मराठी लोकांना तसेच इतर भाषिकांना देखील बोलाविण्यात आले होते. शासनातर्फे हा अभिनंदनाचा प्रस्ताव या ठिकाणी आला ही अतिशय योग्य अशी गोष्ट आहे. संपूर्ण महाराष्ट्राला या गोष्टीचा आनंद झालेला आहे. मी शासनाला या निमित्ताने एक विनंती करेन की, जसा भाऊसाहेब खांडेकराचा जाहीर सन्मान केला, कुसुमाग्रजांचा जाहीर सत्कार केला तसा शासनाच्या वतीने कवी विंदा करंदीकर यांचा देखील शिवाजी पार्क किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी जाहीर सत्कार करावा. ही गोष्ट अतिशय आनंदाची व संयुक्तिक आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेलाही या सत्काराच्या समारंभात सहभागी होता येईल. पुन्हा एकदा या अभिनंदनाच्या प्रस्तावाचे समर्थन करुन विंदाचे हार्दिक अभिनंदन करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज या ठिकाणी कविवर्य श्री. विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल नामदार माननीय श्री. नारायण राणे यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. आता अनेक वक्त्यांनी या ठिकाणी असे सांगितले आहे की, केंद्र स्तरावर महाराष्ट्राला हा तिसरा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे. पूर्वी वि.स.खांडेकर यांना मिळाला होता, त्यानंतर कुसुमाग्रज यांना मिळाला आणि आता विंदा करंदीकर यांना हा पुरस्कार मिळाला आहे. खरे तर 50 वर्षांच्या काव्य प्रवासासाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. हा काव्य प्रवास कसा ? तर, ध्येयाने भारलेला. फक्त कविता करायच्या म्हणून कल्पनेच्या हिंदोळ्यावर त्यांनी कविता केलेल्या नाहीत तर त्या कवितांना वास्तवाची किनार दिलेली आहे. केवळ प्रतिभेच्या जोरावर नाही तर त्याला विद्वत्तेचीही जोड दिली आहे. चिपळूणकरांनी असे म्हटले होते की, साहित्यात विद्वत्ता आणि प्रतिभा एकत्र आनंदाने नांदणे थोडे अशक्य आहे. परंतु तरी सुध्दा प्रतिभा आणि विद्वत्तेला एकत्र आणण्याचे काम विंदानी आपल्या कवितेतून करुन दाखविले आहे. ट्रॅजेडी म्हणजे काय ? खरे तर ट्रॅजेडीकडेही बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन काय असावा ? याचा खरा अर्थ विंदांनी आपल्या कवितेमध्ये अनेक उदाहरणे देऊन सर्व महाराष्ट्राला सांगितलेला आहे. किंग लेअरचे त्यांनी भाषांतर केलेले आहे आणि त्यांनी त्या भाषांतराला जी विस्तृत प्रस्तावना दिली आहे, ती प्रस्तावना वाचली तर ते भाषांतर वाचण्याचीही गरज भासत नाही, इतकी सुंदर अशी ही प्रस्तावना आहे. प्रस्तावनेतील शब्द आपल्याला भारावून टाकतात. त्यामुळे आपल्याला असे वाटते किंग लेअर पुन्हा एकदा आपण वाचलेच पाहिजे. त्याचबरोबर प्राचीन ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र देखील त्यांनी भाषांतरीत केले आहे आणि त्याला देखील त्यांनी विस्तृत प्रस्तावना दिलेली आहे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे.....

खरं म्हणजे करंदीकर यांनी संपूर्ण सौदर्यशास्त्रच यामधून आपल्याला समजावून सांगितले आहे. करंदीकर हे ॲन्टी रोमॅन्टिक काव्य करणारे कवी आहेत, असे म्हटले जाते. पण खरं म्हणजे त्यांनी स्त्री विरुपिकाच जास्त लिहिल्या आहेत. स्त्रीच्या स्त्रीत्वाची खरी ओळख त्यांनीच आपल्या कवितेमधून करुन दिलेली आहे. त्यांची 'धुम्मस' नावाची एक कविता आहे. त्यामध्ये त्यांनी एका स्त्रीचे चित्र रेखाटलेले आहे. " धुम धुम धुम्मस " अशा प्रकारच्या शब्द प्रयोजनामध्ये स्त्री एका जागेवर बसलेली असते, परंतु जरी ती एका जागेवर बसली असली तरी ती धावत असते, सदैव चालत असते, तिच्या मनातील आंदोलने, आक्रंदने यांचा कदमताल, जरी ती एका जागेवर बसलेली असली तरी मनात चालूच असतो. या कवितेतून अतिशय कलात्मकदृष्टया स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. स्त्रीची विविध रुपे व त्यांची ओळख त्यांनी आपल्या कवितेतून करुन दिली आहेत. त्यामुळे स्त्री पूजेच्या विरुध्द करंदीकर आहेत असे नाही, तर तिचे अंतर्मन आपण ओळखले पाहिजे, हेच जणुकाही त्यांनी सांगितले आहे. म्हणजे स्त्री चिडल्यानंतर कसं टोक गाठू शकते याचे उदाहरण म्हणून माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जेव्हा आणीबाणी आणली, त्यानंतर त्यांनी एक कविता केलेली आहे. त्या कवितेमध्ये असे म्हटले आहे की, 'तिचा पदर ओढला, तेंव्हा तिने तिची साडी फेडली' पुढील संपूर्ण कविता मी या ठिकाणी सांगणार नाही, परंतु स्त्री चिडल्यानंतर कसं शेवटचं टोक गाठू शकते, हे त्या कवितेतून त्यांनी दाखवून दिलेलं आहे. " माझ या मना बन दगड , आहे दु:ख तेच फार, माझ्या मना विचार कर, कर विचार, हस रगड, माझ्या मना बन दगड " इतकं सुंदर रेखाटन त्यांनी आपल्या कवितेतून केलेलं आहे. बदलत्या काळाच्या ओघात नवीनता स्वीकारणे खरं म्हणजे हे अनिवार्य आहे. काही जणांना ते जमते, काही जणांना ते जमत नाही. परंतु, आधुनिकीकरण किंवा नवीनता म्हणजे पाश्चिमात्य देशांचं अनुकरण नव्हे हे त्यांनी आपल्या समिक्षणात्मक लेखनामधून, लघुनिबंधांमधून दाखवून दिले आहे. तत्वज्ञानाची प्रतिभा

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे.....

असलेले कवि असं खरं म्हणजे त्यांना म्हणावयास पाहिजे. अनुभवाचे विरुप शोधणारे कवि असेही त्यांना म्हणावयास हरकत नाही. त्यामुळे अभिव्यक्तिचे सर्व पैलू आपल्याला त्यांच्या सर्व साहित्यातून अनुभवास येतात. आधुनिकतेशी परंपरेचा धागा अतूट ठेवण्याचे काम त्यांनी केले आहे. आधुनिकता म्हणजेच नवीनता आणि त्याची खरी व्याख्या त्यांनी आपल्या अनेक कवितांमधून करुन दाखविली आहे. स्वत:चा शोध घेणारा कवी असं म्हटलं तर त्यात काही वावगं ठरणार नाही. त्यांच्या एका कवितेच्या दोन ओळीत त्यांनी असं म्हटलं आहे की, " स्वत:च्या घरी दूरचा पाहुणा मी, असा मी, तसा मी, कसा मी ? कळेना." 'चिंधी' हा छोटा विषय. पण त्याला सुध्दा ब्रम्हांडात गुंडाळण्याचे काम त्यांनी केले आहे. 'चिंधी' ही त्यांची कविता, त्यात त्यांनी असं म्हटलं आहे की, " चिंधी होती कृष्णाआधी, चिंधी उरली कृष्णानंतर, काळोखाची टिचभर चिंधी, ब्रम्हांडाचे लपवी अवडंबर, या चिंधीशी जपून बोला, सृजनापासून सरणापावत, चिंधीचा मिचमिचतो डोळा." म्हणजे विचार करा की, त्या छोटया विषयावर सुध्दा त्यांनी या चिंधिला ब्रम्हांडात गुंडाळलेलं आहे. अशा या विंदा करंदीकरांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला हे आपल्या सगळयांचे भाग्य आहे. म्हणून या प्रस्तावाला मी समर्थन तर देतेच आणि व्यक्तिश: त्यांचे अभिनंदन देखील करते. धन्यवाद.

..3.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्राला सन्मानीत करणा-या विंदा करंदीकर यांना मिळालेल्या ज्ञानपीठ पुरस्कारबद्दल माननीय महसूल मंत्री यांनी जो अभिंनदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे त्याच्या समर्थनार्थ मी या ठिकाणी उभा आहे. महाराष्ट्राची साहित्य परंपरा फार मोठी आहे. जगद्गुरु तुकाराम असोत, वृक्षवल्ली आम्हा सोयरी म्हणणारे ज्ञानेश्वर असोत, चोखोबा असोत, त्या काळापासून आजपर्यन्त महाराष्ट्राचे जे संस्कारक्षम मन आहे हे निव्वळ यांच्या सानिध्यात वाढले आहे आणि म्हणूनच महाराष्ट्र सुदृढ दिसतो, असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही. 50 वर्षाच्या काव्यप्रवासाच्या कामगिरीबद्दल विंदांना हे पारितोषिक मिळालेलं आहे. कुसुमाग्रज व वि.स.खांडेकर यांच्यानंतर विंदांना हे पारितोषिक मिळत आहे.

यानंतर श्री. सांगळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड ....

एक ज्येष्ठ प्राध्यापक म्हणून आपण त्यांना ओळखतो. किंबहूना आज सुध्दा त्यांचे विद्यार्थी असे म्हणतात की, विंदा सरांनी शिकविण्यासाठी सुरुवात केली की, आजुबाजूच्या कॉलेजेसमधील विद्यार्थी देखील आपले वर्ग सोडून विंदा सरांच्या वर्गात बसण्यासाठी येत असत. त्याच काळातील प्राध्यापक असे सांगतात की, विद्यार्थी आमच्या वर्गात बसण्यासाठी कंटाळा करीत. परंतु अतिशय अवघड विषय असून सुध्दा विंदा करदींकर अतिशय सोप्या पध्दतीने शिकवत असत. विद्यार्थ्यांना हाताळण्याची त्यांच्याकडे असलेली किमया पाहिल्यानंतर त्यांचा 60-70 विद्यार्थ्यांचा असलेला वर्ग तिपटीने भरायचा. आजच्या काळामध्ये कॉलेजच्या वर्गांमध्ये विद्यार्थी वर्गात सापडणे कठीण असते. परंतु दुस-या बाजूला विंदाच्या वर्गात जाण्यासाठी रुईया कॉलेज असो, पोद्दार कॉलेज असो अशाप्रकारे वेगवेगळया कॉलेजेस्मधील विद्यार्थी त्यांच्या वर्गामध्ये येत असत. अशाप्रकारे त्यांची विषयावर असलेली ॲथारिटी स्पष्ट होते. थोडया वेळापूर्वी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे हे सर्व अजरामर असल्याचे सांगितले आहे. शेवटी कवीच्या लेखणीतून शब्द बाहेर पडून जेव्हा हृदयालाच हात घालतात तेव्हाच ते अजरामर ठरतात. शेवटी हिंसा आणि हृदयाची जेथे नाळ जमते, ज्यावेळी हृदयात कवितेचे शब्द जाऊन रुततात व एका वेगळया प्रकारचे स्थान निर्माण करतात तेव्हाच ख-या अर्थाने कविचे महात्म्य सिध्द होते. त्यामुळे कुसुमाग्रज असो किंवा विंदा करंदीकर असो ज्या परंपरतील आहेत, मग ते बा.भ. बोरकर असोत बा.सि. मर्ढेकर असोत, या सर्वांच्या कविता मराठी माणसाच्या हृदयाला हात घालणा-या ठरल्या आहेत. म्हणूनच हे सर्व अजरामर ठरले आहे. मला असे वाटते की, आज या चांगल्या सुखाच्या दिवशी आपण विंदा करंदीकरांना अभिवादन करीत आहोत. या निमित्ताने माननीय महसूल मंत्र्यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे त्याचे पुन्हा एकदा समर्थन करतो. सहयाद्रीला हा मान मिळवून देणा-या विंदा करंदीकरांना मानाचा मुजरा करतो व माझे दोन शब्द संपवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय श्री.नारायण राणे साहेबांनी विंदा करंदीकर यांना "ज्ञानपीठ" पुरस्कार मिळाल्याबद्दल मांडलेल्या अभिनंदनाच्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. साहित्यिकांची एक मालिकाच तयार झाली. त्यामध्ये वि.स. खांडेकरांनी "उल्का", "दोन धृव", "अमृतवेल", "ययाती" या सारख्या ध्येयप्रेरित कादंब-या लिहिल्या. त्यावेळेला ना.सि. फडके यांनी "दौलत" कांदबरी ते भोगवादी वाङःमय लिहिले. त्याचप्रमाणे प्र.के. अत्रेंनी मराठा वर्तमानपत्रातून अनेक प्रकारचे साहित्य लिहिले. "बाई तिथे बुवा" आणि समाजाला जागृत करणारी "लग्नाची बेडी", तसेच "तो मी नव्हेच", इत्यादी नाटके लिहून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला भारावून टाकले होते. यानंतर शिवाजी सावंत यांनी लिहिलेले "मृत्यूंजय", "लोकनायक" यांची निर्मिती केली तर "चंद्रमुखी" ही तमाशा, लावण्या गाणा-या बाईच्या जीवनावर कादंबरी लिहिली. त्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर "युगंधर" कादंबरी लिहिली होती. महाराष्ट्रात विंदा करंदीकरांनी काव्याची निर्मिती करुन तुकोबाचे तत्वज्ञान लिहिले, 105 हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी, गोरगरिबांचे अश्रू पुसण्यासाठी कविता लिहिल्या. सभापती महोदय, मला असे वाटते की, वाळूचा किल्ला कितीही शोभिवंत असला तरी त्या किल्ल्यात रहाता येत नाही. हत्तीचे दात कितीही लांब असले तरी त्या दाताने तो खात नाही. मेलेल्या प्रेताला श्रृंगारण्याने शोभा येत नाही. विंदा करंदीकरांनी फार मोठे साहित्यिक आहेत. त्यांनी तुकोबाच्या जीवनावर कविता लिहिल्या. शेवटी मी सांगू इच्छितो की, शालिनतेचा शालू, कष्टाचा देव्हारा आणि पावित्र्याची गंगा विंदा करंदीकर साहेबांच्या मनात आहे त्यामुळेच त्यांना "ज्ञानपीठ" पुरस्कार मिळाला व त्यांचा या सदनामध्ये सन्मान करण्यात आलेला आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो.

(यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ साहित्यिक श्री. विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव या ठिकाणी माननीय महसूल मंत्र्यांनी मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, साहित्याच्या प्रचारासाठी आणि प्रसारासाठी भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार ही संस्था 1963 साली दिल्ली येथे स्थापन झाली आणि 1965 साली पहिला ज्ञानपीठ पुरस्कार देण्यास सुरूवात झाली. महाराष्ट्रातील ही तिसरी व्यक्ती आहे की जी हा पुरस्कार घेण्यास पात्र ठरलेली आहे. यापूर्वी सन्माननीय श्री.वि.स.खांडेकर, कवि कुसुमाग्रज यांना या पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे आणि या वर्षी कविवर्य श्री.विंदा करंदीकर यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसे पाहिले तर विंदा करंदीकर हे कोकणचे सुपुत्र. पण शिक्षणासाठी प्रथम कोल्हापूर आणि नंतर मुंबई येथे वास्तव्य केलेले विंदा आज इंग्रजीचे प्राध्यापक म्हणूनही ओळखले जातात. विंदा हे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक पण मराठी साहित्य विश्वात अत्युच्च शिखरस्थानी आज विराजमान होतात आणि मराठी बद्दल प्रेम दाखवितात. विंदांनी कविता, बालकविता, समीक्षक, अनुवाद, अमृतानुभव असे भरीव लेखन केले असले तरी आज सारा महाराष्ट्र त्यांना कवि म्हणूनच प्रामुख्याने ओळखतो. त्यांच्या कविता आणि लेखन यातून सुशिक्षित पिढीला जगण्यासाठी प्रेरणा मिळते. थेट काळजाला भिडणारे, विचार करायला लावणारे विंदा अजूनही जनतेच्या, रसिकांच्या स्मृतिपटलावर कविता वाचनाने ताजे आहेत. स्वेदगंध पासून विरूपिके पर्यंत आणि ॲरिस्टॉटल व अमृतानुभव पासून अष्टदर्शन पर्यंत आपल्या लेखणीतून मराठी साहित्यावर संपन्नतेचे लेणे चढविणारे कवि विंदा करंदीकर यांचे वागणे अत्यंत नम्रपणाचे आहे. ही मोठी माणसे मोठ्या मनाची आणि दातृत्त्वाची देखील आहेत. या पुरस्कारातून मिळालेली 7 लाख रूपयांची रक्कम त्यांनी पुण्याच्या झोपडपट्टीतील संतती नियमनाचे काम करणाऱ्या 'जागृती' संस्थेला, वेश्यांचे पुनर्वसन करणाऱ्या श्रीमती विजया लोटे यांच्या 'मानिनी' या संस्थेला आणि कसबे-वाडाच्या बालशिक्षण केंद्राला आणि नागपूरच्या 'निनाद' या संस्थेला दिलेले आहे. यातून त्यांचे समाजविषयक प्रेम दिसून येत आहे. विंदांना हा पुरस्कार मिळाला पण तो त्यांच्या वयाच्या 88 व्या वर्षी मिळाला आहे, तो याहून थोडा लवकर मिळाला असता तर विंदांकडून साहित्य सेवा अधिक घडली असती. सभापती महोदय, विंदांना दीर्घायुष्य लाभो अशी मी या निमित्ताने प्रार्थना करतो आणि पुनश्च त्यांचे अभिनंदन करतो.

*** .... डब्ल्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नानासाहेब बोरस्ते (नासिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी कविवर्य श्री.विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, ज्ञानपीठ पुरस्कार हा अत्युच्च पुरस्कार मिळाल्याने मराठी मनाची मान आणि शान वाढलेली आहे. कविता वाचनाने विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर आणि वसंत बापट यांनी साऱ्या मराठी मनाला वेड लावले आहे. विंदांच्या काव्य संग्रहातून श्रमजीवी आणि कष्टकऱ्यांचे ते प्रतिनिधीत्व करताना आढळतात. स्वेदगंध हा त्यांचा काव्यसंग्रह अतिशय गाजला. त्यातील ज्या कविता आहेत त्या आजही चिरतरूण दिसतात. विंदांची 'सब घोडे बारा टक्के' ही स्वेदगंधा या काव्य संग्रहातील कविता तर कधीही वृद्ध न होणारी अशीच आहे आणि राज्यकर्त्यांनी ती खास करून वाचावी अशी माझी या निमित्ताने सर्वांना आग्रहाची विनंती आहे. तेव्हा मराठी साहित्यामध्ये मोलाची भर घालणारे विंदा करंदीकर, त्यांना हा जो ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे त्याबद्दल आपणा सर्वांनाच आनंद झालेला आहे. शब्दांचे सामर्थ्य ज्यांच्या ठायी असते तेच अशा कलाकृती निर्माण करू शकतात. संत तुकारामांनी देखील म्हटलेले आहे की,

" आम्हा घरी धन शब्द हेचि रत्ने, शब्दांचीच आम्ही शस्त्र करू .."

तेव्हा शब्दांच्या सामर्थ्याने मराठीची शान वाढविणाऱ्या विंदा करंदीकरांना मिळालेल्या ज्ञानपीठ पुरस्काराबद्दल मी आनंद व्यक्त करतो. धन्यवाद.

***

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी कविवर्य विंदा करंदीकर यांना जो ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठींबा देताना, हा प्रस्ताव आपल्या सभागृहाच्या कार्यक्रम पत्रिकेवर खास घेतला आहे जेणे करून खऱ्या अर्थाने विंदांचा सन्मान झाला पाहिजे त्या पद्धतीने आपण हा प्रस्ताव येथे घेतला आहे त्याबद्दल आपणा सर्वांचेच मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री.राणे साहेबांना माहिती असेलच की, विंदा करंदीकरांचे गाव हे माझ्या मूळ गावापासून 4 कि.मी.वर आहे. अशा प्रकारे ते आमच्या कोकणातील असल्यामुळे, जरी ते कोकणातील असले तरी ते साऱ्या मराठी राज्याचे आहेत त्यामुळे त्यांना पुरस्कार मिळाल्याने साऱ्या मराठीचाच सन्मान झालेला आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी म्हटले ते खरे आहे की, ...

(यानंतर श्री. सरफरे .... एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

विंदाना हा पुरस्कार यापूर्वीच मिळायला हवा होता. जेणेकरुन यापुढे देखील अनेक मराठी साहित्यिक असे आहेत की ज्यांना अशाप्रकारचा पुरस्कार मिळू शकतो. ज्ञानपीठ पुरस्काराच्या समितीमध्ये महाराष्ट्रामधून मराठी साहित्याची नावे सुचविण्याची जी प्रक्रिया आहे त्यासंबंधीची चर्चा वेगवेगळया साहित्य क्षेत्रामध्ये आपण ऐकत असतो. परंतु या पुरस्कारामुळे मराठी साहित्याचा जो सन्मान झाला आहे, जो आनंद झाला आहे तो आनंद मराठी साहित्याचा विजय झाल्याबद्दल या ठिकाणी व्यक्त करणे मी माझे प्रथम कर्तव्य समजतो. विंदा हे कोकणातील असल्याचे त्यांच्या लघू निबंधातून सहजपणे सर्वांच्या लक्षात येते. त्यामधील "राखणदार" ही कोकणातील टिपिकल अमूर्त कल्पना मूर्त स्वरुपामध्ये त्यांनी आणली आहे. किंवा आंबा कसा खावा, याबाबत त्यांनी सहजपणे लिहितांना "आंबा हाताने खावा, तो झेलला तरी चेंडू नव्हे, तोलला तरी माल नव्हे, सोलली तरी साल नव्हे, कच्चा म्हणून कैरी नव्हे, खाल्ला म्हणून वैरी नव्हे". आणि त्याही पुढे "आंबा डोळयांनी खावा, तो कसा डोळयांनी पहावा, नाकाने खावा त्याचा गंध कसा घ्यावा" अशाप्रकारे विंदा हे कोकणातील असल्यामुळे त्यांनी इतक्या सहजपणे वर्णन केले आहे. मुळात आंबा खातांना व आंब्याची साल काढतांना आंब्यालाही कळू नये इतक्या गोष्टी सहजपणे त्यांच्या लघू निबंधामध्ये डोकावितात. त्यांनी नव्या यांत्रिक युगाच्या विषयावर गझल लिहिली.माननीय सदस्या श्रीमती कांताताई नलावडे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे सौदर्य या विषयावर सुध्दा त्यांचे लिखाण झाले आहे. एका विशिष्ट अंगाने लिखाण न करता सर्व बाजूंनी त्यांनी लिखाण केले आहे. विशेषत: त्यांना हा पुरस्कार मिळाल्यानंतर यशवंतराव चव्हाण नाटयगृहामध्ये त्यांच्या सत्काराचा जाहीर कार्यक्रम कवी सत्यदेव दुबे यांच्या हस्ते करण्यात आला. त्या प्रयोगानंतर शेक्सपियरच्या जवळ जाणारी भाषा मला या ठिकाणी ऐकायला मिळाली अशाप्रकारचे वर्णन सत्यदेव दुबे यांनी केले. या मागील महती विंदांच्या साहित्याची आहे. विंदा हे मराठी साहित्य संमेलनाचे कधीच अध्यक्ष नव्हते, कारण त्याठिकाणी निवडणूक असते. परंतु कोकण मराठी साहित्य संमलेनाचे ते अध्यक्ष झाले, कारण त्याठिकाणी नेमणूक होत असते. अशाप्रकारे साहित्य संमेलनाचा अध्यक्ष नसलेल्या व्यक्तीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळतो. जे महान साहित्यिक आहेत ज्यांना निवडणुकीच्या माध्यमातून अध्यक्षपद नको असते अशा साहित्यिकांच्या बाबतीत सुध्दा विचार करावयास लावणारी ही घटना आहे. माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सूचना केल्याप्रमाणे ज्ञानपीठ पुरस्काराचा सत्कार समारंभ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

हा शिवतीर्थावर आयोजित केला पाहिजे. त्या कार्यक्रमाला लाख-दीड लाख मराठी साहित्य प्रेमी आले तर ज्ञानपीठ पुरस्कार समितीला सुध्दा त्या मधील दरारा पहाता येईल. आणि म्हणून माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांना विनंती करतो की, शासन म्हणून या कार्यक्रमाची संपूर्ण तयारी आम्ही करु आपण या शिवतीर्थावर पुरस्कार देण्यासाठी या, अशाप्रकारे आपण ज्ञानपीठ पुरस्कार समितीकडे यासंबंधी आग्रह धरावा. सभापती महोदय, विंदांचे व्यक्तिगत जीवन अतिशय साधे असून त्यांच्या घरातील टेबल सुध्दा त्यांनी स्वत:च्या हाताने तयार केले आहे. ते आजही घराबाहेर पडतांना हातामध्ये पिशवी घेऊन बाहेर पडतात. अशाप्रकारे दै. महानगरमध्ये छापून आलेले त्यांचे वर्णन मी वाचले आहे. त्यांच्या साहित्य सहवास संकुलामध्ये एकदा एक भिकारी गाणे गात आला त्यावेळी त्याचे गाणे इतके त्यांना आवडले की, त्यांनी आपल्याकडील गाण्याची पेटी त्याला देवून टाकली. या सर्व गोष्टी आजच्या तरुण पिढीमध्ये येऊ शकतील. व ही प्राप्त झालेली संधी राज्य सरकारने गमावू नये असे मला वाटते. आपण सर्वांनी या संधीचा उपयोग करुन मराठी साहित्याचा जो सन्मान झाला आहे त्याचा नक्की उपयोग करुन घ्यावा असे मला वाटते. शेवटी विंदा करंदीकरांच्या अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठींबा देवून माझे भाषण संपवितो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभागृहाचे ज्येष्ठ मंत्री श्री.नारायणराव राणे यांनी जो विंदा करंदीकरांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे, त्यास मी अनुमोदन देतो. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या साहित्याचे पैलू या ठिकाणी मांडले. मुळामध्ये जगातील पहिले साहित्य हे करुणेतून निर्माण झाले. "ययाती"कार, वि.स.खांडेकर यांच्या "क्रौचवध " या कादंबरीमध्ये याचा उल्लेख आहे. त्याच्यातून या साहित्याची प्रेरणा निर्माण झाली.महाकवि वाल्मिकी यांच्या तोंडून करुणेतून बाहेर पडलेले शब्द असे होते की,

" मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम: शाश्वती: समा:
यत्क्रौंच मिथुनादेकमवधी: काममोहितम् //

केवळ करुणेतून साहित्य निर्माण करणारे अनेक साहित्यिक आपल्याकडे झाले.परंतु विंदांनी जीवनातील सर्व रसांना स्पर्श केलेला आहे. शोक, दु:ख, अंधश्रध्दा या सगळयांना स्पर्श केलेला आहे. जीवन हे केवळ एका सिध्दांतावर आधारित नसते. जीवनामध्ये विविधता असते. म्हणून जीवनातील सर्व रसांमध्ये लेखणी बुडवून त्यांनी साहित्य निर्माण केलेले आहे. विंदा म्हणजे सामाजिक जाणीवांची अभिव्यक्ती करणारे साहित्यिक आहेत. त्यांच्या कवितेतील एका ओळीचा मी येथे उल्लेख करु इच्छितो. त्यांनी एका गृहिणीचे वर्णन केलेले आहे. माणसाच्या जीवनाचे त्यांनी किती बारीक निरिक्षण केलेले आहे ते या त्यांच्या कवितेतून दिसते.

'कर कर करा,मर मर मरा, दळ दळ दळा,
मळ मळ मळा, तळ तळ तळा,
तळा आणि जळा,
चीडचीड चिडा, झीज झीज झिजा,
शिजवा आणि शिजा.

त्यांनी एका संसारातील स्त्रीच्या जीवनाचे वर्णन सरळ, सोप्या शब्दामध्ये केलेले आहे. मला वाटते की, साहित्यिकाचे मन हे ब्लॉटिंग पेपरसारखे असावे लागते. पूर्वी शाई ब्लॉटिंग पेपरने पटकन टिपली जात असे. तशी जीवनातील सगळी सुख-दु:खे या माणसाने सहज टिपलेली आपल्याला दिसून येतात. म्हणजे मानवी जीवन एखाद्या सिध्दांताच्या चिमट्यावर पकडून त्याच्यावर आधारित विविधस्पर्शी जीवन त्यांनी रेखाटलेले आहे. त्यांच्या कवितेतील दोन ओळींचा उल्लेख करुन माझे भाषण संपविणार आहे. त्यांनी प्रेमिकेबद्दल सुरुवातीला चार ओळी लिहिलेल्या होत्या.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्वस्व तुजला वाहुनी,
माझ्या घरी मी पाहुणी
सांगू कसे सारे तुला
सांगू कसे रे याहुनी.

त्यांनी या चार ओळीमध्ये सहज प्रेम व्यक्त केलेले आहे. प्रेमातील, शृंगारातील देखील सात्विकपणा त्यांनी व्यक्त केलेला आहे. कवितेमध्ये त्यांनी कधीही हिडीसपणा आणला नाही. त्यांनी कवितेमध्ये घरातील स्त्रीचे वर्णन केलेले आहे की,

स्वागतासाठी 'सुहासिनी' असतेस,
वाढताना 'यक्षिणी' असतेस,

यातून त्यांनी शब्दांची रचना किती सहजपणे केलेली आहे,चपखल केलेली आहे, भावपूर्ण केलेली आहे हे दिसून येते...

भरवताना 'पक्षिणी' असतेस,

त्यांनी कोणत्या तरी घरट्यामधील पक्षी आपल्या बाळाला दाणे आणून चोचीने भरवताना पाहिलेले आहे. तसे वर्णन घरातील स्त्रीचे केलेले आहे.

भरवताना 'पक्षिणी' असतेस,
साठवताना 'संहिता' असतेस,
भविष्याकरिता "स्वप्नसती" असतेस...
संसाराच्या दहा फुटी खोलीत
दिवसाच्या चोवीस
मात्रा बसवण्याची
तुझी किमया मला
अजूनही समजली नाही.

शेवटी "माझ्या मना बन दगड " या कवितेतून त्यांनी जीवनाचा संदेश दिलेला आहे.

"मेरे सुंदर सपने बीत गये. अशाप्रकारचा निराशाजनक त्यांनी संदेश दिलेला नाही. त्यांनी असे म्हटलेले आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझ्या मना कर विचार,
कर विचार , हस रगड,
माझ्या मना बन दगड,
हा रस्ता अटळ आहे
अटळ आहे घाण सारी,

पुढे ते जीवनाचा अमृतमय संदेश देतात.

अटळ आहे ही शिसारी.
एक वेळ अशी येईल
घाणीचेच खत होईल.

म्हणजे घाणीतूनसुध्दा तू जग निर्माण करु शकतोस,अशाप्रकारे सामर्थ्य देणारे शब्द त्या कवितेमध्ये आहेत. शेवटी ते असे म्हणतात की,

अन्यायाची सारी शिते
उठतिल पुन्हा, होतील भुते.
या सोन्याचे बनतील सूळ
सुळी जाईल सारे कूळ
ऐका टापा, ऐका आवाज
लाल धूळ उडते आज,
याच्यामागून येईल स्वार,
या दगडावर लावील धार,

त्यांनी मनाला धीर दिलेला आहे, हा ओबडधोबड दगड नाही. तुझे जे मन दगड बनलेले आहे, त्याला एक दिवशी धार येईल.

इतके यश तुला रगड,
माझ्या मना बन दगड.

शेवटी त्यांनी "तेच ते" या कवितेतून संदेश दिलेला आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सकाळपासून रात्रीपर्यन्त
तेच ते, तेच ते.
माकडछाप दंतमंजन,
तोच चहा, तेच रंजन,
तीच गाणी, तेच तराणे,
तेच मूर्ख,तेच शहाणे,
सकाळपासून रात्रीपर्यन्त
तेच ते, तेच ते.

पुढे त्यांनी सुंदर वर्णन केलेले आहे की,

खानावळीही बदलून पाहल्या,

कंसात लिहितात "(जीभ बदलणे शक्य नव्हते.)", त्यांनी कवी कल्पना केलेली नाही. त्यांनी मनोरंजनासाठी हे लिहिलेले नाही तर जीवनातील सत्य सांगितलेले आहे. मी खानावळ बदलू शकतो, पदार्थाची चव बदलू शकतो, पण चव घेणारी जीभ बदलू शकत नाही. म्हणून जिभेला सुध्दा जीवनातील सुखदु:ख सहन करण्याचे सामर्थ्य आहे, हे ते आपल्या कवितेतून सांगतात.

पुन्हा पुन्हा तेच भोग,
आसक्तीचा तोच रोग,
तेच 'मंदिर', तीच 'मुर्ती,'
तीच 'फुले',तीच 'स्फूर्ती'
तेच ओठ,तेच डोळे,
तोच पलंग', तीच नारी',
सतार नव्हे,एकतारी.

शृंगारामध्ये त्यांनी किती सात्विकता आणलेली आहे, हे यावरुन दिसून येते.

या नंतर श्री.बरवड....

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

शेवटी ते असे म्हणतात की,

"करीन म्हटले आत्महत्या,
रोमिओची आत्महत्या,
दधिचीची आत्महत्या,
आत्महत्याही तीच ती,
आत्माही तोच तो,
हत्याही तीच ती
कारण जीवनही तेच ते
आणि मरणही तेच ते."

या सगळ्या काव्यातून ते माणसाला जीवन जगण्याची दिशा देतात. कोठेही निराशा नाही. अशा तऱ्हेने जीवनाच्या सर्व अंगाला अमृताचा स्पर्श करुन सगळ्या रसांमध्ये आपली लेखणी बुडवून त्यांनी साहित्य निर्माण केले. त्या साहित्यिकाला ईश्वर उदंड आयुष्य देवो आणि महाराष्ट्रामध्ये अशा तऱ्हेचे साहित्यिक निर्माण होवोत. या ठिकाणी दोन्ही सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्याबाबत सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेबांनी मनावर घ्यावे. शिवाजीपार्कवर त्या ठिकाणी वेगवेगळे राजकीय रंग उधळण्यासाठी आणि एकमेकांचे हेवेदावे काढण्यासाठी, मराठी मने उद्ध्वस्त होऊन आपण कधी तरी एकत्र येतो. पण साहित्यामध्ये अशा तऱ्हेने सन्मानाने यश प्राप्त करणाऱ्या या महाकवीचा सत्कार राजकारणातील सगळे दुरावे बाजूला ठेऊन, पक्षविरहितपणे बाजूला राहून आपण सगळ्यांनी एक मोठा सत्कार करु या आणि सगळ्या महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला दाखवून देऊ या की, जगात साहित्य क्षेत्रामध्ये आदर्श अशा तऱ्हेचा महाराष्ट्र प्रांत आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, शासनाच्या वतीने माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे यांनी श्री. विंदा करंदीकर यांच्या अभिनंदनाचा जो ठराव मांडलेला आहे त्याचे अनुमोदन करण्यासाठी मी उभी आहे. गेले काही तास आपण एका वेगळ्याच वातावरणामध्ये आहोत आणि खरे तर राजकारणाच्या प्रांतामध्ये एवढी संवेदनशील भाषणे या सभागृहामध्ये होत आहेत आणि त्यामध्ये मलाही विचार मांडता येत आहेत हे मी माझे भाग्य समजते. श्री. विंदा करंदीकर यांच्याशी माझे नाते हे एका वाचकाचे, रसिकाचे तर आहेच पण याचबरोबर ते माझे सासरे देखील आहेत आणि 30 वर्षापूर्वी श्री. करंदीकरांच्या घरामध्ये माझा प्रवेश झाल्यानंतर एक कलंदर व्यक्तिमत्व आणि त्याचबरोबर काटेकोरपणे शिक्षणाचा आग्रह असणारे व्यक्तिमत्व असलेले श्री. विंदा करंदीकर आणि माझ्या सासूबाई श्रीमती सुमाताई करंदीकर यांचा आणि माझा ऋणानुबंध आला आहे. आजही अनेक सुखदु:खाच्या प्रसंगानंतरही फार चांगल्या प्रकारे अनेक गोष्टी त्यांच्याकडून मला शिकता आलेल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या सगळ्या कवितांचा जो गाभा आहे तो समाजाच्या संघर्षाशी जोडला गेला आहे. गरीबांचा, सामान्य माणसांचा त्याचबरोबर अतिशय कलात्मकरित्या माणसाच्या हृदयाचा आणि अंतर्मनाचा ठाव घेणारे साहित्य त्यांनी तयार केलेले आहे. त्याना ज्ञानपीठ हा पुरस्कार जाहीर झाला. यापूर्वीही अनेक पुरस्कार श्री. विंदा करंदीकर यांना मिळालेले आहेत. परंतु गेल्या दहा वर्षाच्याही आधीपासून त्यांनी स्वत:चे सर्जनशील लिखाण थांबविलेले आहे. हे लिखाण थांबविण्याच्या अगोदर त्यांचे जे साहित्य प्रकाशित झाले, त्यांनी जे साहित्य लिहिले त्या साहित्यामध्ये त्यांनी जीवनाचा अर्थ वेगवेगळ्या प्रकाराने अतिशय संवेदनशीलरित्या मांडलेला आहे. आज सकाळी मी माझ्या सासूबाईंना फोन केला आणि त्यांना विचारले की, आज विधान परिषदेमध्ये श्री. विंदा करंदीकर यांच्याबद्दल अभिनंदनाचा ठराव येणार आहे आणि त्याबाबत शासनाने तुम्हाला कल्पना दिलेली आहे काय ? शासनाने कल्पना दिली नसेल तर ती कल्पना देण्याचे माझे काम आहे म्हणून मी त्यांना फोन करुन विचारले. शासनाने त्यांना कल्पना दिली असती तर चांगले झाले असते. परंतु त्यांना काहीही पूर्वकल्पना दिली गेली नाही. त्यांनी मला असे सांगितले की, आम्हालाही वर्तमानपत्रातून असे कळलेले आहे. तेव्हा मी असे म्हटले की, काही हरकत नाही. आमच्या दोन्ही सभागृहांना अतिशय आनंद झालेला आहे. या ठिकाणी हा अभिनंदनाचा ठराव करीत असताना अनेक वेगवेगळ्या सूचना आलेल्या आहेत. हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सभागृह सार्वभौम आहे. परंतु श्री. विंदा करंदीकर यांचा स्वभाव मला माहीत आहे. ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांनी अनेक वेगवेगळया कार्यक्रमांना त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे जाण्याचे टाळलेले आहे. पण तरीही असा एक मोठा सत्कार होत असेल तर ती आनंदाची गोष्ट आहे. परंतु वेगवेगळे सत्कार, पुरस्कार किंवा रांग लावून वेगवेगळे लोक अर्ज देतात अशा गोष्टींमध्ये सुदैवाने श्री. विंदा करंदीकर, त्यांचा मुलगा आनंद, माझे पती आणि माझा दीर श्री. उदय हे कोणीही त्यामध्ये नाहीत ही आनंदाची गोष्ट आहे. म्हणून ज्या अस्मितेने आणि ज्या स्वाभिमानाने त्यांच्या साहित्याचा ठेवा जपलेला आहे त्याबाबत वेगळया प्रकारे उतराई होणे हे मला तरी किल्मिष आल्यासारखे वाटते. श्री. विंदा करंदीकर यांची परवानगी घेऊन कोणताही कार्यक्रम जरुर आखावा. शेवटी मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, अनेकांनी त्यांच्या वेगवेगळया साहित्य विषयांचा उल्लेख केलेला आहे. परंतु एका गोष्टीचा उल्लेख करावयास पाहिजे आणि ती गोष्ट म्हणजे त्यांच्या बालकविता आणि ए टू लोकांचा देश. त्यांच्या अनेक बालकविता ज्या प्रसिध्द आहेत त्यातील एक छोटीशी घटना मला सांगितली पाहिजे. आनंद म्हणजे ए वन आणि उदय म्हणजे ए टू आणि म्हणून ए टू साठी लिहिलेल्या कविता म्हणजे ए टू लोकांचा देश. अशा त्यांनी बाल कविता लिहिल्या.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

आपण सभागृहामध्ये साहित्यिकांचा गौरव करतो. साहित्य हे सर्जनशील क्षेत्र आहे. एका गोष्टीचा मी याठिकाणी उल्लेख करु इच्छिते की, भाऊंचा पहिला कवितासंग्रह प्रकाशित करीत असताना सासुबाईंनी स्वत:चे दागिने विकले होते. त्यामुळे विंदांच्या यशामध्ये त्यांच्या पत्नी सुमाताई यांचाही मोठा वाटा आहे. विंदांचे अभिनंदन करण्याच्या प्रस्तावाला समर्थन देत असताना विधानपरिषदेतील अनेक माननीय सदस्यांनी अतिशय सुंदरपणे त्यांच्या भावी विश्वाचा वेध घेतलेला आहे, त्याबद्दल त्यांचे कौतुक करावेसे वाटते. माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी जो अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे त्याचे मी समर्थन करते आणि माझे दोन शब्द संपविते.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शासनाच्यावतीने माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणेसाहेबांनी विंदा करंदीकर यांच्या अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

पहिल्यांदाच मी सांगू इच्छितो की, विंदा करंदीकर यांचे पहिले नाव विंदा नसून गोविंद असे आहे. गोविंदाचे विंदा कसे झाले ही देखील एक मजेशीर गोष्ट आहे. त्यांचे लग्न येसू या त्यांचा बाल मैत्रिणीबरोबर झाले. ती येसू त्यांना विंदा अशी हाक मारायची. कालांतराने त्यांचे नाव विंदा झ ाले. दुर्दैवाने त्यांचे निधन झाले. त्यांनतर त्यांनी सुमाताईंशी लग्न केले. त्यातही त्यांचे वेगळेपण दिसून येते. केवळ शब्दरुपाने वेगळे विचार मांडणारे हे कवी नाहीत तर प्रत्यक्षात आचरण करणारे असे कवी आहेत. सुमाताई या विधवा होत्या आणि हे विधूर होते. विधुराने एका विधवेशी लग्न केले. ही सुध्दा क्रांती त्यांनी त्या काळी करुन दाखवली. विंदांचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे जेव्हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा लढा सुरु होता तेव्हा एक आचार्य अत्रे सोडले तर दोनच साहित्यिक त्या लढ्यामध्ये पुढाकाराने भाग घेत होते त्यापैकी एक विंदा करंदीकर होते आणि दुसरे श्री. अनंत काणेकर होते. या सगळया प्रवासातील त्यांची वाटचाल पाहता, त्यांच्या कविता पाहता, त्यांच्या बद्दल इथे भाषण करताना मला स्वत:चा गौरव झाल्यासारखे वाटते. त्यांच्या बद्दल बोलावे इतका मी मोठा नाही. एकदा श्री. नरसिंह राव एका पारितोषिक वितरणाच्या समारंभाला गेले होते. एका संस्थेतर्फे उपराष्ट्रपतींना पारितोषिक देण्यात येणार होते. तेव्हा श्री. नरसिंह राव पटकन म्हणाले की, "काय, कुठलीही संस्था, कोणीही पारितोषिक देते आणि आपण तिथे उपस्थित राहायचे काय ?" मग अशा वेळी वाटते की, या संस्थेकडून असे पारितोषिक स्वीकारणारी ही माणसे किती थोर आहेत. विंदा हे हिमालयासारखे आहेत. आपण जेव्हा हिमालयाची वाखाणणी करतो त्यावेळी त्या हिमालयाच्या पायथ्याशी देखील उभे राहाण्याची आपली ताकद नसते. तरीही जेव्हा त्याच्याबद्दल बोलण्याची एक अनुभूती मिळते त्यावेळी त्याच्यापेक्षा दुसरा मोठा आनंद असू शकत नाही. ते इंग्रजीचे प्राध्यापक होते आणि त्यांचे प्राध्यापक माधव ज्युलियन हे होते. हेही आणखीन एक वैशिष्टय. माधव ज्युलियन यांच्याकडे ते जात असत. ते कोकणातले. आमच्या कोकणातल्या शेतीच्या मेरेवर - इकडच्या भाषेत त्याला बांध म्हणत असतील - तर त्या मेरेवर बसून त्यांनी दोन ओळी लिहिल्या आणि आपल्या आईला ऐकवल्या. त्यावेळी त्यांच्या आईच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. तेव्हा आपल्या ओळीमध्ये काही तरी सामर्थ्य आहे,त्या अश्रूंमध्ये

. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

काही तरी अर्थ आहे हे त्यांना कळले आणि त्यानंतर त्यांनी कविता लिहायला सुरुवात केली. त्यांनी बाल कविता लिहिल्या. त्यांच्या अे-टू कवितासंग्रहातील कविता ह्या त्यांनी त्यांचा मुलासाठी लिहिण्यास सुरुवात केली. तो बाथरुममध्ये जायला घाबरायचा. बाथरुममध्ये जाताना त्याला रोज एक कविता ऐकवायला लागायची. अशा त-हेने त्यांनी अे-टू हा कवितासंग्रह लिहिला. त्यानंतर त्यांनी स्वेदगंगा पासून विरुपिका पर्यन्त कवितासंग्रह लिहिले. विरुपिका हा त्यांचा शेवटचा कवितासंग्रह असेल आणि त्यापुढे मी लिहिणार नाही असे त्यांनी सांगितले होते. पण नंतर त्यांनी अष्टांगप्रदर्शन हा शेवटचा कवितासंग्रह लिहिला. असे हे कवी, समीक्षक. त्यांनी शेक्सपियरलासुध्दा हात घातला, लियरचे भाषांतर केले. त्यांचे सगळयात मोठे वैशिष्ट्य कुठले असेल तर ज्ञानेश्वरीच्या संदर्भातील त्यांनी जे भाषांतर केले ती अतिशय वाखाणण्यासारखी गोष्ट आहे. त्यांनी ज्ञानेश्वरीच्या अमृतानुभवाचे अर्वाचीन भाषेमध्ये अनुभवामृत असे भाषांतर केले. ते भाषांतर इतके भन्नाट आहे की, आजही ते वाचताना रोमांच उभे राहातात.

सभापती महोदय, आणखीन दोन गोष्टींचा मी या ठिकाणी उल्लेख करणार आहे. आघात कसे कसे होतात आणि त्यातून माणूस कसा कसा घडत जातो ही देखील लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. त्यांच्या काकांना महारोग झाला होता. महारोग झाल्यामुळे ते गावाच्या बाहेर एका छोट्या घरात राहात होते.

..नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. अरविंद सावंत ...

त्यांना विंदा हे स्वत: जाऊन जेवण देत असत. काकांच्या शरीरावर प्रचंड जखमा होत्या. या अवस्थेत जगण्याचा मला वीट आला आहे असे ते म्हणत. त्यानंतर त्यांचे काका असे म्हणाले की,मी होडीत बसतो तू होडीला दोरी बांध आणि ती होडी समुद्रात सोडून दे. स्वत:च्या छातीवर दगड ठेऊन काका त्या होडीत बसले आणि होडीला बांधलेला दोरखंड जो झाडाला बांधून ठेवण्यात आला होता तो सोडून दिला. ती होडी समोर जाताना विंदांनी पाहिली. आपला काका आता मृत पावणार हा आघात त्यांच्या मनावर केवढा प्रचंड होता याची आपल्याला कल्पना येईल आणि त्या अनुभूतीतून वेगवेगळया कविता विंदांच्या लेखणीतून बाहेर पडू लागल्या. म्हणून कवितेच्या संदर्भातील मूल्ये सुध्दा त्यांना वेगळी वाटत असत. आता एक सन्माननीय सदस्य म्हणाले की विंदा काव्यगायन करीत होते. हे काव्यगायन त्यांच्या पूर्वीच्या काळात होते. त्यानंतर बापट,पाडगांवकर यांनी नवीन कार्यक्रम सुरु केला तो काव्यवाचनाचा होता. मग ती काव्यवाचनाची अभिरुची नव्या पिढीला लागली. मंगेश पाडगांवकर आणि वसंत बापट व विंदा या तिघांचे काव्यवाचन हे भन्नाट होते आणि त्या काव्यवाचनातून नवीन कवि कसे झाले हे सांगताना "कवि थोडे आणि कवडे फार. खानावळी बदलून पाहिल्या, खवचट चटणी आंबट सार,सुख थोडे दु:ख फार". नव्या कविंबद्दलची ही त्यांची अनुभूती होती. विंदा यांचे वैशिष्टय म्हणजे जाणीवसापेक्ष लिहिणे. मला आठवते की, विंदांकडे काही मंडळी आली होती. मंडळी म्हणाली, आमच्याकडे तुमचे काव्यवाचन ठेवणार आहोत तर त्यासाठी तुम्ही आमच्याकडे या. त्यातील एक जण जादा होता तो पटकन त्यांना म्हणाला की तुमचे नांव वाचून मला ते एखाद्या स्त्रीचे नांव आहे असे वाटते. ज्यांना हे कळत नाही की ज्या कविला आपण बोलावितो तो स्त्री आहे किंवा पुरुष आहे? विंदांनी त्यांना झटकन हाकलून दिले. नंतर अशीच काही मंडळी काव्यवाचनाचे निमंत्रण देण्यासाठी आली. त्यांच्याकडून त्यांनी केवळ एक रुपया काव्यवाचनासाठी घेतला. फुकटचे कुठलेही द्यायचे नाही. कवितेचे मोल त्याशिवाय लोकांना समजणार नाही. याबाबतीत ते फार कटाक्षाने वागत असत. विंदा यांचे वास्तव भान हे विस्तवासारखे आणि त्याचबरोबर नग्न तलवारीसारखे धारदार आहे. त्यांच्यातील कवि हा जाणीव सापेक्ष पण ही जाणीव पारंपारिक,स्थूल, ढोबळ आणि एकसाची मुळीच नाही. जाता जाता मनापासून त्यांचे अभिनंदन करताना आणि अभिवादन करताना तसेच त्यांच्या चरणी लीन होताना मी त्यांच्या दोन कविता वाचून माझे भाषण पूर्ण करणार आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

"बरगडयांच्या तुरुंगातून मी हृदयाला मुक्त केले,
जिथे जिथे धमनी आहे तिथे माझे रक्त गेले".
"सगळे मिळून सगळयांसाठी मरण्यातही मौज आहे,
सगळे मिळून सगळयांसाठी जगण्यातही मौज आहे"

म्हणूनच जगण्याला सुध्दा अभिरुपदेणारे हे कवि, स्वत:बद्दल त्यांचे असे म्हणणे होते की,

"कधी येत असे क्षुद्रता कस्पटाची,
कधी वाढता वाढे व्योमव्यापी."
कधी दैन्यवाणा निराधार होई,
कधी गूढ गंभीर आत्मप्रकाशी,
कधी गर्जतो सागराच्या बळाने,
कधी कापतो बोलता आपणांशी,
असा मी तसा मी,कसा मी कळेना,
स्वत:च्या घरी दूरचा पाहुणा मी."

स्वत:च्या घरात सुध्दा वेगळेपणाने पाहणारे हे कवि अशा या थोर कविला ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले त्याचे वैशिष्टय आणखी होते. सुरुवातीच्या काळात ज्ञानपीठ पारितोषिक देणारी ही दिल्लीची संस्था एका साहित्याला देत असे म्हणजे वि.स.खांडेकरांना जेव्हा ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले ते त्यांच्या "ययाती" या कादंबरीला मिळाले. विंदा करंदीकरांना जे पारितोषिक मिळाले ते त्यांच्या संपूर्ण साहित्य आविष्काराला मिळाले. या साहित्य सम्राटाला मी मनापासून अभिवादन करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे एक थोर कवी, साहित्यिक, विचारवंत, लेखक विंदा करंदीकरजी यांना देशाच्या साहित्य क्षेत्रातील "ज्ञानपीठ" हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी राज्याचे माननीय महसूल मंत्री श्री. राणे साहेब यांनी जो प्रस्ताव सभागृहात मांडला आहे त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मला या अभिनंदनोत्सवामध्ये सामील होण्याची संधी दिली त्याबद्दल मी प्रथमत: आपला आभारी आहे. तब्बल 20 वर्षाच्या काळानंतर या राज्याला विंदांच्या रुपाने देशातील सर्वश्रेष्ठ साहित्यिकाचा पुरस्कार प्राप्त झाला ही आमच्या राज्याकरिता अत्यंत अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे. विंदांच्या रुपाने राज्याच्या या साहित्य सूर्याने देशाच्या साहित्य गगनाला प्रकाशमान केले आणि महाराष्ट्राचा गौरव वाढविला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाही. त्यांचे अभिजात साहित्य, त्यांची संवेदनशीलता ही खरोखरच अभिनंदनीय अशीच आहे. माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत जो प्रवास असतो त्याला आपण जीवन म्हणतो आणि या जीवनाचे जे अनेक प्रकारचे रस आहेत ते आपल्या कथा, कादंबऱ्या, काव्यातून आणि साहित्यातून व्यक्त करण्याचे आणि जनसामान्यांच्या व्यथा-वेदनांना शब्दबध्द करण्याचे काम आपल्या कवितेतून त्यांनी केले. आमच्या अनेक मंत्र्यांनी सांगितले की, आज तुकाराम बीज आहे. तुकाराम महाराजांना एकटयालाच वैकुंठाला जाण्याचा मान मिळाला होता, तो ज्ञानेश्वरांना किंवा रामदासांना का मिळाला नव्हता हे कळत नाही. पण या संत श्रेष्ठ तुकारामांच्या अभंगांचे तत्वज्ञान विंदा करंदीकरांनी मराठी मनाला सांगण्याचे जे काम केले ते अविस्मरणीय आहे असे मला सांगावेसे वाटते. तत्वज्ञानी, विचारवंत, समीक्षक, लेखक असे हे करंदीकर ज्यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळेस आचार्य अत्रे, अनंत काणेकरांच्या सोबत रस्त्यावर उतरुन केलेले महाकाव्य, त्यांनी केलेली अभिव्यक्ती आणि अशा या करंदीकरांचा आज गौरव करतांना या सभागृहातील भांडकुदळ मंडळी एका साहित्यिकासारखी बोलायला लागली हे पाहून हा विंदांच्या व्यक्तिमत्वाचाच चमत्कार आहे असे मला वाटते. या राज्यातील श्रमजीवी, कष्टकरी, पीडित, वंचित असा जो समाज आहे, अत्याचाराच्या दलदलीमध्ये सापडलेला जो समाज आहे त्यांना आपल्या शब्दातून न्याय मिळवून देण्यासाठी गरज पडली तर अश्रूंची दगडफेक आणि शब्दांचा गोळीबार करण्यास देखील मागेपुढे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

पाहिले नाही, असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे म्हणून त्यांचा जेवढा गौरव करावा तेवढा कमीच ठरेल व त्यांच्या साहित्यरुपी सूर्याला दिवा दाखविण्याचाच प्रकार ठरेल. कारण आम्ही साहित्यिक नाही. टेनिस क्षेत्रात सानिया मिर्झाने एखादी चांगली कामगिरी केली तर तिचा गौरव आपल्या राज्याने केला, तिच्यासाठी लक्षावधी रुपयाचे अनुदान दिले, तिला पुरस्कार दिला, घर दिले तसेच अनेक गोष्टी दिल्या. क्रिकेटच्या क्षेत्रात अझरुद्दीनने चमत्कार दाखविला तर आंध्र प्रदेशच्या सरकारने त्याचा गौरव केला, अनेक सवलती दिल्या. सचिन तेंडुलकराने क्रिकेटमध्ये चमत्कार दाखविला तर त्याला कोटयावधी रुपयाची विदेशी गाडी आपल्या सरकारने दिली. म्हणून माझी सूचना आहे की, या प्रसंगी देखील आपल्या सरकारने आपला खत्रुडपणा सोडावा आणि साहित्याच्या क्षेत्रात ज्यांनी संपूर्ण देशाला हेवा वाटेल असे काम केले त्यांच्या बाबतीत देखील विचार करावा अशी या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. तसेच विंदांना उदंड आयुष्य लाभो अशी प्रार्थना करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद. जय भीम.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकरण संस्था) : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय नामदार श्री.नारायण राणे यांनी ज्येष्ठ प्रतिभावंत साहित्यिक श्री.गोविंद विनायक ऊर्फ विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

नोबेल पुरस्कार मिळावा असे प्रत्येक भारतीयाला वाटत असते आणि तो मिळाल्यानंतर प्रत्येकाचे मन भरून येते. तसेच ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर प्रत्येक साहित्यिकाचे मन भरून येते. तोच प्रकार महाराष्ट्रामध्ये माय मराठीची सेवा करणारे श्री.विंदा करंदीकर यांच्याबाबतीत घडला आहे. श्री.विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर करण्यात आल्यामुळे सर्वांना फार मोठा आनंद झाला आहे. कै.वि.स.खांडेकर आणि कुसुमाग्रज यांच्यानंतर श्री.विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे. भारतामध्ये अनेक भाषा आहेत. त्यात मराठी भाषा समृद्ध आहे. पण काही वर्षाच्या अंतराने मराठी भाषेसाठी ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे. हा पुरस्कार म्हणजे मराठी भाषेचा गौरव आहे. श्री.विंदा करंदीकरांनी आपल्या उमेदीच्या काळात मराठी भाषेला संपूर्ण भारतामध्ये मानमरातब मिळावा म्हणून कवि वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर यांच्या समवेत अनेक कार्यक्रम केले. माणूस मोठा केव्हा होतो ? ज्यावेळी खूप मोठे झाल्यानंतर छोटया माणसाचे मन समजते तेव्हा. बाल गीत व बडबड गीते देखील श्री.विंदा करंदीकरांनी लिहिली आहेत. त्यामुळेच त्यांना मराठी माणसाचे मन निश्चितपणे समजले आहे. त्यांनी सगळयांना सांगितले आहे,

देणाऱ्याने देत जावे,
घेणाऱ्याने घेत जावे,
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे.

अजून त्यांना पुरस्कार प्रदान करावयाचा आहे. त्यांना पुरस्कार जाहीर झालेला आहे. त्यामुळेच हे सभागृह अत्यंत मोठया मनाने त्यांचे अभिनंदन करीत आहे. माय मराठीची सेवा अशीच त्यांच्याकडून अनेक वर्षे होत राहील अशी सदिच्छा मी व्यक्त करतो. 78 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे निमंत्रण देण्यासाठी आम्ही गेलो होतो. त्यावेळी त्यांची तब्येत बरी

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार...

नसल्यामुळे त्यांना येता आले नाही. त्याची आम्हाला रुखरुख लागली. ते साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जरी झाले नसले तरी त्यांना साहित्य क्षेत्रातील ज्ञानपीठ हा सर्वोत्तम पुरस्कार मिळालेला आहे हे, खरोखर आनंदायी आहे. मी स्वत: या प्रस्तावाला मन:पूर्वक पाठिंबा देतो व श्री.विंदा करंदीकर यांना भरपूर आयुष्य लाभो व त्यांच्याकडून माय-मराठीची सेवा होत राहो अशी सदिच्छा व्यक्त करतो.

.....

यानंतर श्री.बोर्डे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : महाराष्ट्राचे महसूल मंत्री माननीय श्री.नारायण राणे यांनी सदनामध्ये ज्येष्ठ प्रतिभावंत साहित्यिक विंदा करंदीकर यांना "ज्ञानपीठ" पुरस्कार मिळाल्याबद्दल जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

मी विधानपरिषद आणि विधानसभा या दोन्हीही सदनामध्ये अनेक वर्षे वावरलेला लोकप्रतिनिधी आहे. परंतु आज या सदनामध्ये ज्या पध्दतीचे दृश्य पाहिले ते खरोखरच निराळया स्वरुपाचे होते. आज या सदनामध्ये दोन्हीही बाजूंच्या लोकप्रतिनिधींनी विंदा करंदीकर यांच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचा आगळा-वेगळा प्रसंग मी यापूर्वी पाहिला असेल असे मला वाटत नाही. विंदा यांच्या बाबतीत हेच म्हणावे लागेल की, सर्वसामान्यांच्या वेदना, दु:ख यांची सातत्याने जाण असणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. आपल्या कविता आणि साहित्याच्या माध्यमातून तळपते शस्त्र त्यांनी महाराष्ट्रामध्ये वापरण्याचा प्रयत्न केला आणि त्या अनुषंगाने महाराष्ट्राची सतत 50 वर्षे सेवा केली. ही सेवा करीत असताना महाराष्ट्रातील राष्ट्रीय पातळीवरील व्यक्तिमत्त्व या अनुषंगाने त्यांच्या सेवेचा "ज्ञानपीठ" पुरस्काराने जो सन्मान झालेला आहे तो खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील आम जनतेचा आणि मराठी भाषिकांचा सन्मान आहे. या सन्मानाच्या अनुषंगाने ज्या वेळेला आपण त्यांचे अभिनंदन करण्यासाठी एकत्रित आलो त्याच वेळेला सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी जे विचार मांडले ते खऱ्या अर्थाने महत्वाचे विचार आहेत. वास्तविक पाहता विंदा करंदीकर यांचे व्यक्तिमत्त्व आगळे-वेगळे आहे. साहित्याच्या अनेक क्षेत्रांमध्ये लौकिकाला साजेल अशा प्रकारचे त्यांनी काम केले आहे. त्यांनी समाज जीवनातील अनेक पैलूंना स्पर्श केला आणि त्याच बरोबर मराठी भाषिक जनतेला जागृत करण्याचा सुध्दा प्रयत्न केला. ज्यावेळी महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता, अस्मितेचा प्रश्न होता त्यावेळी सुध्दा विंदांनी महाराष्ट्राची जबरदस्त सेवा केली. अशा या साहित्यिकाचा सत्कार, मुंबईमध्ये महाराष्ट्राच्या वतीने होणे गरजेचे आहे. सन्माननीय राणेसाहेबांना मी सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री महोदयांना आपण सदनाच्या भावना जरुर कळवाव्यात. विंदा करंदीकर यांचा भव्य-दिव्य पध्दतीचा सत्कार महाराष्ट्राच्या आणि आपणा सर्वांच्या वतीने एकत्रितरित्या करणे आवश्यक आहे आणि त्यांचा सत्कार करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. म्हणून या संदर्भात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

शासनाने उचित निर्णय घ्यावा अशी भावना मी या ठिकाणी व्यक्त करतो. या ठिकाणी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे त्याला मी व्यक्तिगत पाठिंबा देतो. विंदा करंदीकर यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव या सभागृहाने एकमताने संमत केल्याबद्दल अभिनंदनाच्या प्रस्तावाची प्रत ज्येष्ठ प्रतिभावंत साहित्यिक विंदा करंदीकर यांच्याकडे पाठविण्यात येईल. ही प्रत दोन्ही बाजूंच्या पाच-सहा सन्माननीय सदस्यांना समवेत घेऊन मी स्वत: त्यांच्याकडे जाईन आणि अत्यंत आदरपूर्वक हा ठराव त्यांच्याकडे अर्पण करेन, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

प्रस्ताव सर्वानुमते संमत झाला.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 3.35 ते दुपारी 4.00 पर्यंत मध्यंतर)

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यतरानंतर)

(सभापती स्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

उप सभापती : सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 2 मार्च 2006 रोजी अमरावती विभागामध्ये झालेली अतिवृष्टी व गारपीट व त्यामुळे झालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत लक्षवेधी सूचना स्वीकृत आहे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "राज्यातील वन विभागामध्ये गेल्या दहा ते वीस वर्षापासून वन कामगार रोजंदारीवर काम करीत असणे, दिनांक 16/3/2006 रोजी कामगारांनी मुख्य वन संरक्षक, नागपूर यांच्या कार्यालयात आत्मदहन करण्याची दिलेली नोटीस " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत शासनाने लक्ष घालावे.

यानंतर श्री. जयंत पाटील, श्रीमती नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी " दिनांक 14 मार्च 2006 रोजी धुलिवंदनाच्या दिवशी वैनगंगा नदीच्या काठावर वसलेल्या गडचिरोली जिल्हयातील मुधोली येथे कोंबड बाजार खेळण्यासाठी गेलेल्या 27 जणांपैकी 11 जण नाव उलटल्यामुळे मृत्यूमुखी पडणे" " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत शासनाने तातडीने लक्ष घालावे.

यानंतर सर्वश्री दिवाकर रावते, कन्हैयालाल गिडवाणी, विनोद तावडे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधूकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 16 मार्च 2006 रोजी नवी मुंबईतील घणसोली येथे माथाडी कामकारांच्या वसाहतीत होळीवरुन झालेले क्षुल्लक भांडण, सुमारे 200 ते 250 जणांच्या जमावाने रात्रीच्या वेळी गावात जाऊन केलेली दगडफेक, पोलिसांनी जमावावर केलेला गोळीबार, त्यात तीन जण ठार होणे व अनेकजण गंभीर जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती....

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 10 मार्च 2006 रोजी कोऱ्हाळाबाजार, जिल्हा बुलढाणा येथे चक्री वादळाचा बसलेला तडाखा व त्यात 400 जणांचे झालेले नुकसान " " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 31/3/2005 रोजी तलाव निंबा, तालुका बाळापूर, जिल्हा अकोला येथील सर्व्हे क्रमांक 5/1 व सर्व्हे क्रमांक 5/3 मधील जमिनीवर हा तलाव पूर्ण झाल्याचे दाखवून सुमारे 21 लाख रुपयांची लूट करण्यात येणे " " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्रीमती निलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी " भामठाणा तालुका श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर येथील खाजगी सावकार आण्णा नारायण भोसले यांनी श्री. किशोर शामराव बनसोडे यांना केलेली बेदम मारहाण, दिनांक 14/3/2006 रोजी वा त्या सुमारास सावकाराच्या कुटुंबियांनी पोलिसांवर केलेली तुफान दगडफेक " " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत शासनाने लक्ष घालावे.

यानंतर श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी " मुंबईतील पूर परिस्थितीनंतर पावसाळयात पाण्याचा निचरा व्हावा यासाठी पर्जन्यजल पंपिंग स्टेशन उभारण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी 200 कोटी रुपये कामांच्या निविदा अवघ्या दोन दिवसात काढणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत शासनाने तातडीने लक्ष घालावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे प्रकरण अत्यंत गंभीर असे आहे शासनास यावर निवेदन करण्यास सांगावे अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे, यावर शासनाने निवेदन करावे.

.....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती....

यानंतर श्री. मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी " मुंबईतील जे.जे.रुग्णालयातील विविध विभागातील उपकरणे नादुरुस्त असल्यामुळे बहुतेक वेळा विविध चाचण्यांसाठी रुग्णांना खाजगी रुग्णालयात अथवा चाचणी केंद्रात जावे लागल्यामुळे गरीब रुग्णांचे हाल होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाबाबत शासनाने तातडीने लक्ष घालावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, यामध्ये गरीब लोकांचे हाल होत आहेत, हा विषय गंभीर आहे शासनास आपण निवेदन करावयास सांगावे अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे, शासनाने या संदर्भात निवदेन करावे.

.....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नवापूर येथे बर्ड फ्लूची झालेली लागण.

मु.शी.: नवापूर येथे बर्ड फ्लूची झालेली लागण, यासंबंधी माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे निवेदन.

श्री. अनिस अहमद (पशुसंवर्धन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन वाचून दाखवितो.

(प्रेस : सोबतचे निवेदन येथे छापावे)

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: रायगड जिल्हयातील पेण तालुक्यात इस्पात कंपनीने शेतक-यांच्या जमिनींमध्ये अनधिकृतपणे टाकलेला भराव

मु.शी.: रायगड जिल्हयातील पेण तालुक्यात इस्पात कंपनीने शेतक-यांच्या जमिनींमध्ये अनधिकृतपणे टाकलेला भराव. या विषयावर श्री.जयंत पाटील व प्रा.शरद पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" रायगड जिल्हयातील पेण तालुक्यातील डोलवी येथील इस्पात या पोलाद कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देता शेतक-यांच्या सुपीक जमिनींमध्ये अनधिकृतपणे भराव टाकण्याचे काम सुरु करुन जमिनीची केलेली नासधूस, याबाबत स्वत: पालकमंत्र्यांनी हस्तक्षेप करुन नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश देऊन सुध्दा सदर आदेशांची करण्यात आलेली पायमल्ली, या विरोधात शेतक-यांनी सुरु केलेले आमरण उपोषण व त्यामध्ये एका महिला उपोषणकर्तीची तब्येत खालावल्यामुळे तिला दवाखान्यात भरती करण्याची आलेली पाळी, यात प्रशासनाने केलेले दुर्लक्ष, सदर कंपनीच्या व्यवस्थापकीय अधिका-यांची पैशाच्या जोरावर सुरु असलेल्या दंडेलशाहीमुळे स्थानिक भुमीपूत्र शेतक-यांची होत असलेली पिळवणूक, सदर कंपनीची अरेरावी थांबविण्याची व शेतक-यांना न्याय मिळवून देण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली अथवा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(निवेदन)

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील : रायगड जिल्हयातील पेण तालुक्यात इस्पात कंपनीने बेकायदेशीरपणे बिगर शेतीच्या जमिनीचा वापर केलेला असल्यामुळे याबाबत शासनाने कंपनीविरुध्द कोणती दंडात्मक कारवाई केली आहे ? नसल्यास ही कारवाई करणार आहे काय ? 28 शेतक-यांपैकी 14 शेतक-यांच्या दिवाणी न्यायालयात केसेस सुरु आहेत उर्वरित शेतक-यांनी कोर्टात केसेस दाखल केलेल्या नाहीत. त्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासन कार्यवाही करणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमधील प्रश्न हा पेण तालुक्यातील 29 शेतक-यांच्या संबंधित आहे. 29 शेतक-यांच्या जवळपास 21.37 हेक्टर्स जमिनीवर इस्पात कंपनीने भराव टाकल्यामुळे शेतक-यांचे नुकसान झाले. यानंतर त्या शेतक-यांनी आंदोलने केली. त्यावेळी शेतक-यांचा इस्पात कंपनीसमवेत समझोता झाला. या समझोत्यामध्ये कंपनीने शेतक-यांना प्रति हेक्टरी 25,000 रुपये मदत देण्याचे ठरवण्यात आले होते. परंतु शेतक-यांची अशी मागणी होती की, सन 1993-94 पासून आतापर्यंत प्रत्येक वर्षी झालेल्या नुकसानीबाबत कृषि विभागाने जी रक्कम काढली असेल त्याप्रमाणे नुकसान भरपाईची मागणी केली. अशाप्रकारे हा प्रश्न इस्पात कंपनी आणि शेतकरी यांच्या संबंधातील आहे. या प्रकरणामध्ये शासनाचा काहीही संबंध नाही. परंतु शेतक-यांच्या जमिनीवर भराव टाकल्यामुळे शेतक-यांचे नुकसान झाले म्हणून त्या शेतक-यांनी उपोषण केल्यामुळे या प्रकरणी शासनाचा संबंध आला आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, बिगर शेतीच्या वापरासाठी शासनाच्या परवानगीची आवश्यकता असते. मध्यतंरीच्या काळात इस्पात कंपनीने 500 एकर जमीन शेतक-यांकडून विकत घेतली व या जमिनीचा वापर बिगर शेती म्हणून करीत आहे. या जमिनीचा बिगर शेती म्हणून वापर करण्यासाठी शासनाची परवानगी घेतली आहे काय ? सभापती महोदय, इस्पात कंपनीच्या नावावर जमीन नसताना कंपनीला अशी परवानगी कशी मिळाली ? अशाप्रकारे बेकायदेशीरपणे बिगरशेतीचा वापर केला जात आहे. या प्रकरणी शासन दंडात्मक कारवाई करणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या ठिकाणी बिगर शेतीचा प्रश्नच निर्माण होत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी, कंपनीने विकत घेतलेली जमीन बिगर शेती केली आहे

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ....

काय ? असा मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, उद्योग विभागाची परवानगी घेऊन इंडस्ट्रीसाठी वापरण्यात येणा-या जमिनीबाबत बिगर शेतीची अट काढून टाकण्यात आली आहे. याबाबत कायद्यात तरतूद केलेली आहे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेमध्ये बिगर शेतीचा प्रश्नच येत नाही. तसेच 29 शेतक-यांपैकी 14 शेतकरी दिवाणी कोर्टात गेले होते. त्यापैकी एका शेतक-याने रु 5400/- एवढया रकमेची नुकसान भरपाई सुध्दा घेतली आहे.

(यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ....

राहिले 14 शेतकरी. म्हणजे यामध्ये शेतकरी आणि इस्पात कंपनी यांच्यामध्ये वाद आहे. त्यामध्ये सरकार कोठेही येत नाही. तरीही या व्यवहारामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून ती जमीन इस्पात कंपनी विकत घेईल काय ? त्यासाठी अधिक रक्कम देईल काय हे आपण पाहत आहोत. या बाबतीत कंपनीचे म्हणणे आहे की, आम्ही रेडी रेकनरनुसार किंमत देण्यास तयार आहोत पण शेतकऱ्यांची मागणी अधिक रकमेची आहे. इतकाच त्यात वाद आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. एका बाजूला शेतकरी जमीन देत नाहीत म्हणून त्यांच्या जमिनींवर अनधिकृतपणे भरणी करायची आणि मग ती जमीन मातीमोल भावाने कंपनीने घ्यावी असा प्रयत्न होत आहे. या निवेदनामध्ये म्हटले आहे की,'बाधित शेतकऱ्यांनी तुर्तास प्रति हेक्टरी 25 हजार रूपये नुकसान भरपाई देण्यात येऊन जमिनीचे व्यवहार पूर्ण केल्यानंतर उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम अदा करावी...' सभापती महोदय, जे शेतकरी आपली जमीन देण्यास तयार नाहीत त्यांच्या जमिनीमध्ये भाताचे पिक येत असताना भरणी केल्याबद्दल कंपनीवर सरकारने कोणत्या प्रकारची कारवाई केलेली आहे ? हा माझा पहिला प्रश्न आहे. यामध्ये एक तर शेतकऱ्यांना दंड करायला पाहिजे होता. त्यांनी ही जमीन एन.ए. केलेली आहे. पण मातीचा भरणा हा इस्पात कंपनीने केलेला आहे त्यामुळे कंपनीवर देखील कारवाई करण्याची गरज होती, पण ती करण्यात आलेली नाही. सभापती महोदय, या निवेदनात असेही म्हटलेले आहे की, 'सर्व शेतकऱ्यांच्या जमिनीत कंपनीमार्फत 1993-94 मध्ये भराव करण्यात आला असून त्यासाठी गौण खनिजाऐवजी कंपनीने कच्चा व टाकाऊ माल म्हणजे भुकटी वगैरे पदार्थांचा साठा केलेला आहे.' तर मग आपण याबाबतीत सर्व्हे केलेला आहे का ? तेथे मातीचा भराव केलेला आहे, भुकटीचा वगैरे जो उल्लेख केलेला आहे तो चुकीचा आहे. तेव्हा पुन्हा एकदा याबाबत चौकशी करून 21 हेक्टरवर इस्पात कंपनीने जो अनधिकृतपणे भराव केलेला आहे त्याबद्दल त्या कंपनीवर कारवाई करणार आहात काय ? यामध्ये शेतकरी आणि कंपनी या दोघांमध्ये वाद असला तरी या भरणीमुळे शेतकऱ्यांची जमीन नापिक झालेली आहे. त्याबद्दल कंपनीवर आपण काय कारवाई करणार आहात ? तसेच 21 हेक्टरवर जी भरणी टाकली आहे त्याबद्दल रॉयल्टी घेतली पाहिजे होती. परंतु तेथे भुकटी-कच्चा माल वगैरेचा उल्लेख केलेला आहे. म्हणून तेथे जो भराव केलेला आहे त्यामुळे शेतजमीन नापिक झाली आहे, ते आपण दूर करणार काय ?

..... आयआय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना दोन तीन वेगवेगळे प्रश्न विचारले आहेत. मुळात यामध्ये वस्तुस्थिती अशी आहे की, इस्पात कंपनी आणि शेतकरी या दोघांमध्ये वाद आहे. कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतामध्ये भराव केला ही वस्तुस्थिती आहे आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे हेही खरे आहे. त्यामुळेच कंपनीकडे शेतकऱ्यांची मागणी आहे की, आम्हाला हैक्टरी अमुक इतकी रक्कम द्यावी, किंवा आमची जमीन कंपनीने विकत घ्यावी. त्यावर कंपनीचे म्हणणे असे आहे की, आम्ही ही जमीन रेडी रेकनरप्रमाणे दर देऊन विकत घेण्यास तयार आहोत. पण शेतकऱ्यांची मागणी अधिक रकमेची आहे. म्हणजे रेडी रेकनर प्रमाणे अडीच लाख होत असतील तर शेतकऱ्यांची त्या ठिकाणी 4 लाखाची मागणी आहे. दुसरे असे की, त्या जमिनींमध्ये भराव टाकल्यामुळे जे नुकसान झालेले आहे त्याबद्दलची भरपाई देण्याची जी गोष्ट आहे त्यासाठी कंपनी 25 हजार रूपये द्यायला तयार आहे मात्र कृषी विभागाने झालेल्या नुकसानीचा अंदाज काढावा आणि 1993 पासून ही भरपाई द्यावी असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्याबद्दल काही शेतकरी दिवाणी कोर्टामध्ये गेलेले आहेत आणि तेथे जो काही निकाल लागेल त्यावर हे सारे अवलंबून आहे. थोडक्यात, यामध्ये कंपनीकडून अधिक रक्कम मिळावी यासाठी शेतकरी उपोषणाला बसले आहेत आणि सरकार यामध्ये केवळ शेतकऱ्यांना मदत व्हावी म्हणून पुढे आले आहे. या वादामध्ये समझोता करून देऊन जास्तीत जास्त रक्कम शेतकऱ्यांना मिळावी असाच सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी आजही कंपनीचे मालक, मॅनेजमेंट आणि संबंधित शेतकरी की जे कोर्टामध्ये गेले आहेत ते आणि राहिलेले 14 शेतकरी या सगळ्यांना एकत्रित बोलावून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची अपेक्षित रक्कम देण्यासाठी सरकार प्रयत्न करील एवढेच मी सांगू इच्छितो.

****

(यानंतर श्री. सरफरे .....जेजे 1 ..

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी पुकारलेले आंदोलन.

मु.शी.: राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी पुकारलेले आंदोलन यासंबंधी स□मा□□ीय सदस्य सर्वश्री.धनाजी साठे, संजय दत्त, रमेश निकोसे, गोविंदराव आदिक, प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

श्री. धनाजी साठे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ ि□यम 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वजनि□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय महिला व बालविकास मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी ि□वेद□ा □रावे, अशी वि□ती □रतो.

"राज्यातील अंगणवाडी सेवेअंतर्गत कार्यरत असलेल्या स्त्री कर्मचाऱ्यांच्या निर्धारीत वेतन व तद्नुषंगिक देय लाभांचे प्रदान न करणे, सेवेत सेवाकाल बजावलेल्या अंशकालीन स्त्री कर्मचाऱ्यांना पदावरील पदोन्नती न देणे, मानधन व प्रोत्साहन भत्ता तसेच सेवा निवृत्तीचे लाभ न देणे, या व इतर न्याय मागण्यासाठी दिनांक 13 मार्च 2006 पासून अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी पुकारलेले आंदोलन, सदर अंशकालीन स्त्री कर्मचाऱ्यांच्या न्याय व प्रलंबित मागण्याची यशस्वी सोडवणूक करुन त्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने निर्णय घेण्याची निर्माण झालेली आवश्यकता आणि शासनाची भुमिका."

श्री. धर्मराव बाबा आत्राम (महिला व बालविकास राज्यमंत्री) : अध्य□ महाराज, ल□वेधी सूच□संबंधीच्या ि□वेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते ि□वेद□ आपल्या अ□ुमती□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

ि□वेद□
(प्रेस : येथे सोबतचे ि□वेद□ छापावे.)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या सेविकांचे अनेक प्रश्न आहेत. त्यांच्यावर असलेल्या अनेक जबाबदाऱ्या पहाता त्यांना दर महिन्याला 1400 रुपये मानधन दिले जाते. लहान मुलांना शिकविणे, गर्भवती महिलांची देखभाल करणे इत्यादी कामे त्यांच्याकडून करुन घेतली जातात. शासकीय यंत्रणेमार्फत जी कामे केली जातात ती कामे करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली जाते. त्यांना निवृत्ती वेतन देण्याबाबत त्यांची मागणी असून शासन त्यांच्या मागणीचा विचार करीत नाही. त्यांच्या या मागणीचा शासन विचार करणार आहे काय? शासनाने कल्याणकारी निधी स्थापन केला आहे. आज रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणाऱ्या महिलांना जास्त पगार दिला जातो. असे असतांना त्यांना निवृत्ती वेतन देण्याकरीता त्यांच्या 1400 रुपयांच्या मानधनातून आपण स्वेच्छा निधीची रक्कम कापून घेतल्यानंतर त्यांना मिळणारी रक्कम पुरेशी असणार आहे काय? त्याकरीता शासन स्वत:च्या तिजोरीतून ही रक्कम देणार आहे काय?

श्री. धर्मराव बाबा आत्राम : सभापती महोदय, नुकतीच अंगणवाडी सेविकांच्या संघटनेबरोबर माननीय मुख्यमंत्र्याची बोलणी झाली. त्यामध्ये निवृत्ती वेतन योजना सुरु करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून त्याबाबत शासन विचार करीत आहे.

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, अंगणवाडी सेविकांना गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता व बालकांचे पोषण करणे इत्यादी कामे दिली जातात. त्याचप्रमाणे शासनाने हागणदारी मुक्त गाव योजना हातामध्ये घेतली असून त्या क्लिष्ट कामाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली आहे. ही कामे संबंधित यंत्रणेमार्फत करणे आवश्यक असतांना ती करण्यासाठी या महिलांना भाग पाडले जात आहे. तसेच, त्यांच्याकडून काम झाले नाहीतर अधिकाऱ्यांकडून त्यांना नाहक त्रास दिला जातो. तेव्हा याबाबत शासन विचार करणार आहे काय?

श्री. धर्मराव बाबा आत्राम : शासनाच्या वेगवेगळया योजनांचा लाभ समाजाला मिळवून देण्याच्या दृष्टीने त्यांची मदत घेण्यात येते. याबाबत त्यांना अधिकाऱ्यांकडून त्रास दिला जाणार नाही याची शासन दक्षता घेईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अंगणवाडी सेविकांच्या प्रश्नांबाबत या सदनामध्ये अनेक मार्गांनी प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जातात त्यांची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर टाकण्यात येते. त्यांना त्याबाबत दिले जाणारे मानधन असून तो पगार नाही. प्रश्न असा आहे की, वेगवेगळया योजनांचा वेगवेगळा निधी राज्य

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

सरकारकडे येतो. त्या निधीमधून त्या योजनेच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते. ज्यावेळी या अंगणवाडी सेविकांवर त्या वेगवेगळया योजनांची अंमलबजावणीची जबाबदारी टाकण्यात येते त्यावेळी शासनाकडून त्या योजनेचे नियोजन करतांना अंगणवाडी सेविकांना त्या योजनेच्या निधीमधून जास्त पैसे कसे देता येतील याचा विचार केला पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे आज अंगणवाडी सेविकांकडून 27 योजना राबविल्या जात आहेत. जर कुपोषण झाले तर त्याबाबत अंगणवाडी सेविकांना जबाबदार धरण्यात येते. याबाबत अंगणवाडी सेविकांसाठी अपघात विमा योजना लागू केली पाहिजे व त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे. तेव्हा आपण ज्याप्रमाणे वैद्यकीय उपचार घेणाऱ्या स्त्रियांसाठी अपघात विमा योजना केली आहे त्याप्रमाणे अंगणवाडी सेविकांसाठी विम्याचे संरक्षण देणार आहात काय?

श्री. धर्मराव बाबा आत्राम : माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये "संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेण्यात येऊन आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचेकडून सुधारीत प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे व सदर प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे" असे म्हटले आहे. हा प्रस्ताव आपण केव्हा मागविला आहे? त्यासाठी आपण मुदत घातली आहे काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही,यू. डायगव्हाणे (पुढे सुरु....

त्यांच्याकडून एक महिन्यामध्ये प्रस्ताव मागवून घेऊन आपण एक महिन्यामध्ये निर्णय करणार आहात काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : त्यांच्या युनियन सोबत बसून यासंबंधीचा जी.आर काढलेला आहे. त्यांच्या ज्या काही मागण्या आहेत त्या संदर्भात मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात आली. त्यांची मागणी पेन्शन योजना लागू करण्याबाबतची आहे त्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तांकडून मागविलेला आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव आल्यानंतर तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवून त्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.व्ही.यू. डायगव्हाणे : त्यांना प्रस्ताव पाठविण्याबाबत मुदत घालून दिलेली आह काय ? त्यांनी त्याबाबतचा प्रस्ताव एक महिन्यामध्ये पाठविण्याबाबत निर्देश दिले जातील काय ? त्यांच्याकडून एक महिन्यामध्ये प्रस्ताव आभ्ल्यानंतर त्याच्या पुढच्या एक महिन्यामध्ये म्हणजे एकूण दोन महिन्यामध्ये मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवला जाईल काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, 20-25 दिवसापूर्वीच बैठक झालेली आहे. याबाबतीत सरकारचे पॉझिटिव्ह मत आहे त्या दृष्टीने पॉझिटिव्ह निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती संजीवनी रायकर : अंगणवाडी सेविका या उपेक्षित महिला आहेत. काही तरी सरकारकडून मिळेल या आशेने दर वर्षी अंगणवाडी सेविका उपोषणास बसतात. त्यांना सुरुवातीला ही योजना केंद्र सरकारची आहे राज्य शासन त्यामध्ये काय करणार ? अशाप्रकारची भूमिका घेण्यात आलेली होती. 400 रुपये भाऊबीज दिलेली आहे, ती भाऊबीजही शिमग्याला केव्हा तरी मिळते. त्यांनीच स्वेच्छा निधी जमवायचा असे सांगण्यात आलेले आहे. ही तर क्रूर चेष्टा आहे. शासन त्यांना काय देणार आहे ? त्यांनी दिवसभर राबायचे काय, त्यांनी खिचडी बनवायची, त्यांनी घराघरामये जाऊन प्रबोधन करायचे अशी कामे दिलेली आहेत. त्यांना मानधन वाढवून दिले पाहिजे. या महिलांना स्केल देऊन त्यांच्या मानधनामध्ये वाढ केली दिली पाहिजे अशाप्रकारची मागणी आहे. पेन्शन योजना लागू करतांना त्यांच्या स्केलचा विचार करणार आहात काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : आयुक्तांकडून प्रस्ताव मागविलेला आहे. तो प्रस्ताव आल्यानंतर त्याबाबतचा मंत्रिमंडळासमोर जाऊन योग्य निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती संजीवनी रायकर : त्यांना स्केल देणार आहात काय ?
श्री.धर्मरावबाबा आत्राम : त्यांना स्केल देता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : 12 वीच्या परीक्षेत मराठीच्या प्रश्नपत्रिकेत संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांबद्दल एकेरी, विपर्यस्त आणि आक्षेपार्ह मजकूर छापणे.

मु. शी : 12 वीच्या परीक्षेत मराठीच्या प्रश्नपत्रिकेत संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांबद्दल एकेरी, विपर्यस्त आणि आक्षेपार्ह मजकूर छापणे यासंबंधी सर्वश्री पांडरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, शांताराम करमळकर,मधुकर चव्हाण,श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे, डॉ.नीलम गोऱ्हे,सर्वश्री सागर मेघे, संजय दत्त, रमेश निकोसे, जितेंद्र आव्हाड,जगन्नाथ शेवाळे,लक्ष्मण जगताप, प्रा.जोगेंद्र कवाडे, प्रा.फौजिया खान,श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री सदाशिवराव पोळ, राजेंद्र जैन, वसंत चव्हाण, व्ही.यू.डायगव्हाणे,प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे, दिवाकर रावते,मधुकर सरपोतदार, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 11 फेब्रुवारी 2006 रोजी बारावीच्या परीक्षेत मराठीच्या प्रश्नपत्रिकेत संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांबद्दल एकेरी आणि विपर्यस्त छापण्यात येणे, आक्षेपार्ह मजकूर छापल्यामुळे राज्यातील आम जनता व विशेषत: वारकरी संप्रदायात तीव्र संताप व्यक्त होणे, राज्यातील सर्व स्तरातून निषेध व्यक्त होताच या प्रकरणी चौकशी करण्यासाठी दादा गोरे यांची समिती नेमण्यात येणे, या समितीने प्रश्न क्र. 10 मधील चुकीमुळे विद्यार्थ्यांना 4 पैकी 4 गुण देण्याचा निर्णय घेणे, त्यामुळे मराठीचा पेपर 100 ऐवजी 104 गुणांचा होणे, 104 गुणांनी पेपर तपासण्याचा या निर्णयाला प्राध्यापकांनी विरोधी करणे, प्राध्यापकांनी विरोध करताच मराठीची प्रश्नपत्रिका पुन्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु....

100 गुणांची करणे, मुंबई शिक्षण मंडळाकडून अशा एक ना अनेक चुका घडत गेल्यामुळे मंडळाची विश्वसनीयताच संपुष्टात येणे, या गोंधळाच्या परिस्थितीस जबाबदार असलेल्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका"

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

4.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदयांना निवेदनामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदातील पाचव्या ओळीमध्ये 'कळवळ' या शब्दाऐवजी कळकळ' अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री.दिवाकर रावते : आणखी काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : नाही.

श्री.दिवाकर रावते : तुकाराम महाराजांचया अवमानाच्या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये वाचनात आले की मंत्री महोदयांनी खालच्या सदनामध्ये निवेदन केले. त्याचा उल्लेख निवेदनामध्ये करावा असा भाग नाही. पण या सदनामध्ये ते निवेदन येणे आवश्यक होते. आता नंतर तुम्ही कार्यवाही काय केली, ती सांगणार आहात. या निवेदनाच्या शेवटच्यापरिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांबद्दल जनसामान्यांप्रमाणेच शासनाच्या मनात नितांत आदर असून झ ालेल्याप्रकाराबद्दल मंडळास व शासनास मनापासून खेद वाटतो. शासन या झाल्या प्रकाराबद्दल मनापासून दिलगिरी व्यक्त करीत आहे. संत तुकाराम महाराजांसारख्या विश्वाकार वृत्ती झालेल्या महान विभुतीबाबत राज्य शासनास सदैव आदर असून जनकल्याणाची संत तुकाराम महाराजांची असीम कळकळ राज्य शासनासाठी सतत प्रेरणादायी आहे." मला आता जी माहिती मिळालेली आहे त्याप्रमाणे जो काही खालच्या सभागृहामध्ये निर्णय दिला, त्याचा उल्लेख या ठिकाणी आलेला नाही. म्हणून मी वारंवार या निवेदनामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय असे विचारत होतो.

प्रा.वसंत पुरके : संत तुकाराम महाराजांच्या संदर्भात 10 कोटी जनतेच्या भावना आहेत. खरे तर तो एक गुन्हाच म्हणावा लागेल. कारण शिक्षण खात्यामध्ये असा जो काही प्रकार घडलेला आहे तो न भरुन निघणारा आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती', अशाप्रकारचे संत तुकाराम महाराज आहेत...

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ....

त्याचा असा अनादर होणे महाराष्ट्राला भूषणावह नाही म्हणून मी विधानसभेमध्ये माफी मागितलेली आहे. दुसरी गोष्ट अशी की, माझ्या शिक्षक बांधवांकडून जी चूक झालेली आहे ती अक्षम्य आहे. इयत्ता पाचवी, इयत्ता सातवीसाठी असलेले एखादे गाईड, रद्दीमध्ये सापडलेले गाईड, मराठीमध्ये एम.ए. झालेल्या एका माणसाने रद्दीमध्ये ते शोधावे आणि पाच लोकांची जबाबदार समिती असताना ते जसेच्या तसे आंधळेपणाने समाविष्ट करुन अशा प्रकारे प्रश्नपत्रिका समोर यावी ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. विधानसभेमध्ये मी हे मान्य केले आणि शासनाच्यावतीने मी माफी मागितली तसेच त्या चारही लोकांवर आम्ही कारवाई केलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, योगायोगाने आज तुकारामबीजेचा दिवस आहे. जगद्गुरु संत तुकोबाराय ज्या दिवशी वैकुंठाला गेले त्याच दिवशी योगायोगाने ही लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये आलेली आहे. सभापती महोदय, हे प्रकरण जितके समजले जाते तितके सोपे नाही. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. पहिल्यांदा उत्तर देत असताना शासनाने जगद्गुरु तुकाराम महाराजांची तोंडभरुन स्तुती केली. तुकाराम महाराजांबद्दल नितांत आदर आहे असे सांगितले. याच शासनाच्या मंडळाने इयत्ता बारावीच्या परीक्षेत संत तुकाराम महाराजांसबंधी जो उतारा दिला त्यामध्ये संत तुकाराम महाराजांचा जो अवमान झाला तो कधीही भरुन निघण्यासारखा नाही. त्या प्रश्नपत्रिकेमध्ये नुसता उताराच दिला असे नाही तर त्या उताराच्या संदर्भात जे प्रश्न दिले त्यामध्ये सुध्दा संत तुकाराम महाराजांबद्दल एकेरी शब्दांचा वापर झालेला आहे. एवढे सगळे घडल्यानंतर शासनाने दिलगिरी व्यक्त केली. आधी लाथा मारावयाच्या आणि नंतर हात जोडावयाचे अशी ही पध्दत आहे. आधी शिव्या द्यावयाच्या आणि नंतर क्षमा मागावयाची असा हा प्रकार आहे. या ठिकाणी उत्तर देत असताना असे सांगण्यात आले की, प्रश्नपत्रिका संपादनास जबाबदार असलेल्या 5 प्राश्निकांपैकी सेवानिवृत्त 1 प्राश्निक वगळता अन्य 4 प्राश्निकांना निलंबित करण्यात आले आहे. हे शिक्षक आहेत. खरे म्हणजे शासनाने आपले पाप या शिक्षकांवर टाकलेले आहे. यामध्ये शिक्षक दोषी आहेत आणि शिक्षकांना निलंबित करण्यामध्ये आपण फर तत्परता दाखविली परंतु या मंडळाचे जे संचालक आहेत, प्रश्नपत्रिका सेट झाल्यानंतर शेवटचे जे चेकींग संचालकांच्या माध्यमातून होते त्या संचालकांवर शासनाने काय कारवाई केली ? या निवेदनामध्ये पुढे असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

म्हटले आहे की, या प्रकरणाशी संबंधित जे जे जबाबदार असतील त्यांच्याविरुध्द शासन कठोर कारवाई करणार आहे. माझा मुलभूत प्रश्न असा आहे की, नुसते शिक्षकांना वेठीला धरुन किंवा शिक्षकांना जबाबदार धरुन त्यांना निलंबित करुन टाकले परंतु शिक्षण मंडळाचे जे वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांच्या बाबतीत काहीही केलेले नाही. गोपनियता काय असते ? पेपर सेट झाल्यानंतर ते सिल करतात आणि नंतर ते मुद्रणालयाकडे पाठविले जाते. छापखान्याकडे पेपर गेल्यानंतर त्यामध्ये गोपनियता राहता नाही. त्या ठिकाणी छापखान्याचे मॅनेजर असतात, इतर कर्मचारी असतात, नोकर असतात. त्या ठिकाणी गोपनियता नसते. आपण असे सांगता की, ते पेपर सेट झाल्यानंतर, सिल केल्यानंतर ते उघडले जात नाहीत. ते पेपर्स मुद्रणलयाकडे जाईपर्यंत उघडले जात नाहीत. एकदा ते प्रेसमध्ये गेले की, गोपनियता राहात नाही. पेपर सेट झाल्यानंतर संचालकांच्या माध्यमातून शेवटची तपासणी होते. त्या संचालकांवर कारवाई करण्यासबंधीचा निर्णय शासन घेणार काय ? त्या संचालकांवर कारवाई करणार काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, 1982 च्या कायद्यानुसार असा कोणताही वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष प्रश्नपत्रिका पहात नसतो. परंतु आपल्या भावना आणि घडलेला प्रसंग लक्षात घेता माझे असे म्हणणे आहे की, विशेषत: मराठी, हिंदी, इतिहास या विषयासारखे पेपर हे कोणत्या ना कोणत्या ॲथॉरिटीने पाहिल्यानंतरच प्रिंटींगला जावेत. वास्तविक गोपनियतेचा भंग होऊ नये, कायद्याचे उल्लंघन होऊ नये हे पहावे लागेल. परंतु असे प्रसंग घडल्यामुळे महाराष्ट्र असंतुष्ट होत असेल, या ठिकाणी रोष निर्माण होत असेल ...

डॉ. दीपक सावंत : महाराष्ट्र असंतुष्ट होत असेल म्हणजे काय ?

प्रा. वसंत पुरके : भावना दुखावल्या असतील हे मी मान्य केलेले आहे. संत तुकाराम महाराजांच्या संदर्भात दहा कोटी जनतेच्या भावना दुखवल्या गेल्या आहेत.

यानंतरश्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदय प्रा.वसंत पुरके यांच्याकडून आमच्या काही अपेक्षा आहे. तुकाराम महाराजांबद्दल जो अवमानकारक उल्लेख करण्यात आला त्याबद्दल जनतेच्या भावना दुखावल्या आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु या शासनाच्या, माननीय मंत्री महोदयांच्या भावना दुखावल्या आहेत काय हे त्यांनी सांगावे. "21 फेब्रुवारी 2006 रोजी झालेल्या मराठी विषयाच्या इयत्ता 12वीच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न क्रमांक 10च्या उता-यात संत तुकाराम महाराजांबद्दल समाजाच्या भावना दुखावणारा जो मजकूर छापला गेला, त्यामुळे मंडळ व शासन दिलगीर आहे." असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. परंतु तुम्हाला काय वाटते ते सांगा.

प्रा. वसंत पुरके : संत तुकाराम महाराजांचे साहित्य हे अत्यंत संवेदनशील आहे. "खेळ मांडियेला वाळवंटी ठायी , नाचती वैष्णव भाई रे. निर्मळ चित्ते झाली नवनिते, पाषाणा पाझर फुटती रे" पाषाणालाही पाझर फोडण्याचे सामर्थ्य तुकाराम महाराजांच्या शब्दामध्ये आहे. शब्दांमध्ये किती विलक्षण शक्ती आहे ती केवळ तुकाराम महाराजांनाच समजलेली आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : म्हणून तुम्ही अशा प्रकारचा उतारा प्रश्नपत्रिकेमध्ये छापला काय?

प्रा. वसंत पुरके : "विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अंमगळ".. सभापती महोदय, मला संरक्षण हवे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : याबाबतीत मंडळाचे अधिकारी जबाबदार आहेत. ज्यावेळी प्रेसमध्ये प्रश्नपत्रिका जाते त्यावेळी गोपनीयता कोठे राहाते ? याबाबतीत मंडळाचे संचालक जबाबदार आहेत.

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. माननीय सदस्यांना अभिप्रेत आहे तेच उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे अशा प्रकारचा आग्रह माननीय सदस्यांनी धरणे इष्ट नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनाला वेगळे अधिकार आहेत. तुकाराम महाराजांचे 10वे वंशज कै. रामकृष्ण मोरे हे या सदनाचे सदस्य होते. संत तुकाराम महाराजांच्या नावे एक टपाल तिकीट काढावे अशा प्रकारचा ठरावा या सदनामध्ये आणलेला होता. त्या ठरावावर सव्वातास चर्चा झाली. त्यावेळी प्रा. ढोबळे यांनी उत्कृष्ट भाषण केले होते आणि त्यांच्या भाषणाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते..)

मी उत्स्फूर्तपणे दादही दिली होती. माझे म्हणणे एवढेच आहे की, संत तुकाराम महाराजांबद्दल जो अवमानकारक मजकूर छापण्यात आला त्याबाबतीत सरकारची भूमिका काय आहे ते सांगावे.

प्रा. वसंत पुरके : मी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या प्रश्नाला उत्तर देतो. रंजले गांजलेले, दलित, उपेक्षित, दुर्लक्षित, एक्स्प्लॉयटेड या लोकांपैकी मी एक आहे.

...नंतर श्री. कानडे...

o

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ...

संत तुकारामांचा झालेला अवमान ही अत्यंत अक्षम्य अशी बाब आहे. शासनाचा घटक म्हणून मी माफी मागतो. या घटनेमुळे माझे मन किती दुखावले गेले आहे याची मला जाणीव आहे. "जेथे जातो तेथे तू माझा सांगाती" असे तुकारामांनी म्हटले आहे. परंतु आपला दृष्टिकोन व्यापक ठेवला पाहिजे. मी या प्रकरणी पुन्हा एकदा माफी मागतो. विरोधी पक्षनेत्यांनी एक मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. ॲक्टचे व्हायोलेशन होणार नाही आणि गोपनीयता राखली जाईल यादृष्टीने मी तीन सदस्यांची समिती गठीत करणार आहे. अशा घटना पुन्हा घडणार नाहीत. यामध्ये तांत्रिक बाबी तपासून पाहणे आवश्यक आहे. परंतु भविष्यामध्ये निश्चितपणाने याची दखल घेतली जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. माननीय सदस्य श्री. रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो माझ्या दृष्टीने संपलेला आहे. लेखी निवेदनामध्ये आणि आता मंत्रीमहोदयांनी याबाबत स्पष्टपणाने सांगितले आहे. शिक्षणमंत्री हे संत वाड:मयाचे विद्यार्थी होते आणि शिक्षक देखील होते. शासनाच्या वतीने त्यांनी दिलगीरी व्यक्त केली आहे. विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याचे पॉइंटेड उत्तर येणे आवश्यक आहे. माहितीमध्ये फरक असू शकतो. ज्यांनी पेपर सेट केला त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, पेपर तयार केले जातात ते संचालक पहात असतात किंवा तपासतात. सिस्टीमप्रमाणे जर त्यांची जबाबदारी असेल तर त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. कारण सिस्टीम ही सेट आहे. चूक कोणाची झाली हे जर लक्षात येत नसेल तर हा सिस्टीममधील दोष आहे. संचालक सुध्दा या प्रकरणाला जबाबदार आहेत काय याचे स्पेसिफिक उत्तर येणे आवश्यक आहे. कारण संचालक जबाबदार असतील तर त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. या व्यवस्थेमध्ये सगळे पेपर संचालकांपर्यंत जात असतील असे मला वाटत नाही. परंतु त्यांची जबाबदारी असेल तर कारवाई झाली पाहिजे. म्हणून निश्चितपणाने आणि पॉइंटेड असे वस्तुस्थितीवर आधारित उत्तर दिले गेले पाहिजे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, प्रश्नपत्रिकांच्या सिस्टीममध्ये असलेले दोष दूर करणे गरजेचे आहे. या प्रकरणाला डायरेक्ट संचालक जबाबदार नाहीत. अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत तसेच ॲक्टचे व्हायोलेशन होऊ नये आणि गोपनीयतेचा भंग होऊ नये यासाठी शासन समिती गठीत करणार आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी अतिशय पॉइंटेड प्रश्न विचारणार आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचे निलंबन केलेले आहे. परंतु त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे आवश्यक होते तो केला आहे काय ? कुठल्या तरी गाईडमधील हा पॅरा उचलून प्रश्नपत्रिका तयार केली आहे तेव्हा गाईडचे जे कोणी प्रकाशक असतील त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. प्रकाशक कोण आहेत याचा यामध्ये उल्लेख नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय सदस्य म्हणतात तशी परिस्थिती आहे. पुस्तकाचा उतारा सुलभ मराठी निबंधमाला नवनीत प्रकाशन मधून प्रकाशित केलेला आहे.

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, उतारा सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी होता. परंतु पेपर सेट करणाऱ्या महाशयांनी तो 12 वी च्या विद्यार्थ्यांसाठी घेतला. अधिकाऱ्यांकडे हे जात नाही. पेपर सेटरची नेमणूक करताना सुध्दा फिक्सींग होते. हे फिक्सींग बोर्डाचे अधिकारी आणि मेंबर करतात.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे .....

बोर्डाचे सदस्य आणि अधिकारी यांच्यामध्ये इंग्रजी, गणित, फिजीक्स, केमेस्ट्री आणि बॉयलॉजीसारखे पेपर सेटिंगसाठी लाखोचे व्यवहार होतात, कदाचित हा मराठीचा पेपर असल्यामुळे कमी व्यवहार झ ाला असेल.....

उपसभापती : एका गंभीर विषयासंबंधीची चर्चा सदनात चालू असतांना, संत तुकाराम महाराजांबाबतची चर्चा सुरु असतांना आपली चर्चा भलतीकडेच जात असल्याचे जाणवत आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी याचे भान ठेवावे व अशा प्रकारे विनाकारण वेगळया मुद्दयावर चर्चा होऊ नये याची काळजी घ्यावी.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, हा उतारा बाहेरुन घ्यावयाचा होता पण ज्या पुस्तकातून तो घेतलेला होता ते पुस्तक तरी अधिकृत होते काय ? त्याला शासनाची मान्यता होती काय ? आणि असल्यास त्याचे लेखक कोण ? जर त्या पुस्तकाला शासनाची मान्यता नसेल तर संबंधित लेखकावर कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्यानुसार माझ्या हातामध्येच ते पुस्तक असून त्यातून तो उतारा घेतलेला आहे. त्या पुस्तकाचे नांव "सुलभ मराठी निबंधमाला" असे असून सदर पुस्तकाचे लेखक श्री. देसाई हे आहेत. नवनीत प्रकाशन केंद्र आणि त्याचे प्रकाशक म्हणून श्री. धनलाल ब्रदर्स हे आहेत. या संबंधित लेखक व प्रकाशकांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ? की फक्त शिक्षकांनाच फासावर चढविण्याचे व निलंबित करण्याचे काम करणार आहे?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, तिनही सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मी उत्तर देतो. याप्रकरणी संबंधितांवर 295 व 34 या कलमांनुसार गुन्हे रजिस्टर्ड झालेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी शिक्षण खात्यातील काही महत्वाच्या बाबी सांगितल्या त्यासंदर्भात मी देखील लक्ष ठेवून आहेच. सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे ज्या पुस्तकातून हा उतारा छापण्यात आला आहे त्याला शासनाने मान्यता दिलेलीच नाही पण तरी देखील कायदयाच्या चौकटीत बसत असेल तर हे पुस्तक कोणी छापले व त्याला मान्यता आहे की नाही हे तपासून संबंधित प्रकाशक व लेखकाविरुध्द कारवाई करण्यात येईल. शासन कोणालाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत नाही तर जी कारवाई करणे अपेक्षित आहे ती करण्यात येईल. तसेच सातवीला गाईडलाईन्स देण्यासाठी असलेल्या गाईडमधील रद्दीत सापडले आणि ते घेऊन प्राध्यापक त्यातून उतारा घेतात ही गंभीर बाब आहे, यासाठी देखील संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये भाषांतराचा एक प्रश्न जो ठेवण्यात आलेला आहे त्याला फक्त दोन ते तीनच मार्क्स मिळतात. म्हणून आमची विनंती आहे की, या प्रश्नाला देखील "OR" "किंवा" असा ऑपशन ठेवण्यात यावा.

डॉ. वसंत पवार : महोदय, बाहेरुन उतारा घेतल्यामुळे हा जो प्रकार झालेला आहे त्याचे रिपिटेशन पुन्हा होणार नाही याची हमी शासनाने द्यावी अशी आमची विनंती आहे.

उपसभापती : याचे रिपिटेशन पुन्हा होणार नाही याची शासनाने गंभीर दखल घ्यावी अशी शासनाला सूचना करतो व ही लक्षवेधी संपवितो. आता नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु होईल.

श्री. विलास अवचट : महोदय, मला विशेष उल्लेख मांडावयाचा आहे.

उपसभापती : आज नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा असल्यामुळे आपण विशेष उल्लेख घेत नाही.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नवी मुंबई,घणसोली येथे दिनांक 16 मार्च 2006 रोजी झालेली दंगल.

मु.शी.: नवी मुंबई,घणसोली येथे दिनांक 16 मार्च 2006 रोजी झालेली दंगल या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, अरविंद सावंत, विनोद तावडे, मधु चव्हाण, श्रीमती कांता नलावडे, श्री.प्रकाश शेंडगे, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री.अनंत तरे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उपसभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो;

"घणसोली (नवी मुंबई) येथे घणसोलीचे ग्रामस्थ आणि लगतच्या सिम्प्लेक्स संकुलातील माथाडी कामगार यांच्यात गुरूवार, दिनांक 16 मार्च 2006 रोजी झालेली दंगल रोखण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन जण ठार झालेले आहेत आणि ग्रामस्थांच्या हल्ल्यात एका कामगार संघटनेच्या नेत्याच्या अंगरक्षकाला प्राण गमवावे लागले आहेत, दंगल आणि गोळीबारात सुमारे 70 व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्या असून तेथील काहींची प्रकृती अतिशय चिंताजनक आहे, पोलीस गोळीबारात जगदीश पाटील आणि संतोष गुप्ता या दोघाही जणांना छातीत गोळया लागलेल्या आहेत आणि त्यामुळे पोलिसांनी अतिशय चुकीच्या पध्दतीने गोळीबार केलेला आहे हे स्पष्ट झालेले आहे, पोलीस माथाडयांची बाजू घेऊन पक्षपाती भूमिका घेत असल्याची तेथील गावकऱ्यात पोलिसांबद्दल प्रतिमा निर्माण झालेली आहे, पोलिसांच्या या वर्तनाबाबत जनभावना अतिशय प्रक्षुब्ध आहेत व ही दंगल भविष्यात पुन्हा केव्हाही पेटण्याची शक्यता आहे, या प्रकरणी हस्तक्षेप करून तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यता विचारात घेण्यात यावी."

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, दिनांक 16 मार्च 2006 रोजी म्हणजे धुळवडीच्या दिवशी सदर घटना घडली आहे. नवी मुंबईची स्थापना झाल्यानंतर या महानगरामध्ये पहिल्यांदाच अशाप्रकारची घटना घडली आहे. खरे म्हणजे धुळवडीच्या दिवसापासून हा संघर्ष सुरू झाला. रंगपंचमीच्या दिवशी एका मुलीची छेडछाड काढल्यामुळे दंगळ उसळलेली आहे. ग्रामस्थ आणि तेथे राहणारे लोक यांच्यामध्ये संघर्षाला सुरूवात झाली. रंगपंचमीच्या दिवशी मुलीवर रंग उधळून, तिची छेडछाड काढल्यासंबंधीचा प्रकार पोलिसांनी आटोक्यात आणला असता तर पुढचा अनर्थ घडला नसता. हे जे प्रकरण आहे, ते रंगपंचमी पुरते मर्यादित नाही. वर्षानुवर्षे तेथे राहणारे स्थानिक ग्रामस्थ आणि आता तेथे विस्थापित झालेले लोक यांच्यामध्ये सतत संघर्ष होत असतो. हे संघर्ष वेगवेगळया प्रकारातून होत असतात. तेथील ग्रामस्थांवर वेळोवेळी अन्याय होत होता. त्यामुळे हळूहळू असंतोष वाढत गेला व असंतोषाचे पर्यावसन दंगलीमध्ये झाले. एका मुलीची रंगपंचमीच्या दिवशी छेडछाड काढल्यामुळे रात्री अडीच वाजता संघर्ष झाला. त्यावेळी तरूणांचा एक जमाव घणसोली गावामध्ये शिरला व दंगलीला सुरूवात झाली. मध्यरात्री हा प्रकार थांबला. परंतु, दिवस उजाडल्या बरोबर दोन्ही बाजूकडील सुमारे दीड हजार लोक समोरा-समोर आल्यामुळे तणाव वाढला. तरी सुध्दा पोलीस कुमक मागविण्यात आली नव्हती. 30-40 पोलीस जमावाला शांत करण्याचा प्रयत्न करीत होते. रबाळे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.समशेर शेख पठाण हे घटनास्थळी पोहचल्यानंतर सकाळी 11.00 वाजता गोळीबार झाला. पोलिसांनी गोळीबार केल्यामुळे सकाळी 11.30 वाजता जनता भडकली व दोन्ही बाजूंनी पुन्हा एकमेकांवर दगडफेक करण्यास, वाहनांना आगी लावण्यास सुरूवात केली. दुपारी 12.00 वाजेपर्यंत हा प्रकार थांबला नाही म्हणून पोलिसांनी पुन्हा गोळीबार केला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

श्री.पांडुरंग फुंडकर....

आता परिस्थिती हाताबाहेर गेलेली आहे. पोलिसांकडून हा संघर्ष आटोक्यात येणार नाही म्हणून आदल्या दिवशी दुपारी सुरु झालेले नाटय दुसऱ्या दिवशी आटोक्यात आणण्यासाठी दीड वाजता धडक कृती दलाला पाचारण केले जाते आणि मग दंगल शमविण्याचा प्रयत्न केला जातो. मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे की, घटना घडल्यानंतर 17-18 तास उलटून गेल्यानंतर या प्रकरणी पोलिसांनी कारवाई करावयास सुरुवात केली. रंग पंचमीच्या निमित्ताने ही घटना घडली आहे. परंतु रंग महोत्सव हा काही घणसोली गावापुरताच नसून, महाराष्ट्रभर नव्हे देशभर रंग पंचमीच्या माध्यमातून रंग खेळला जातो. यातून अनेक प्रकारचे संघर्ष उद्भवत असतात. रंग पंचमी महोत्सवात पोलीस शांतता कमिटयांच्या माध्यमातून बैठका घेऊन वातावरण शांत करण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु या ठिकाणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले आहे. माझी अशी माहिती आहे की, हे प्रकरण घडण्यास रंग पंचमीचे कारण कारणीभूत नसून, वर्षानुवर्षे दोन गटांमध्ये आपापसात धुमसत असलेला असंतोष होता. हा असंतोष वाढत गेल्यामुळेच ही घटना घडली आहे. परंतु पोलिसांनी याकडे लक्ष दिले नाही. पोलिसांनी दोन गटांपैकी केवळ एकाच गटाची बाजू घेतली, परिणामी दुसऱ्या गटावर अन्याय-अत्याचार झाला. त्याचे पर्यावसान दंगलीमध्ये झाले. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. राज्यात हा गोळीबार पहिलाच गोळीबार आहे असे नाही. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी 15 दिवसांमध्ये महाराष्ट्रात तब्बल चार ठिकाणी गोळीबार झालेला आहे. पहिला गोळीबार अमरावती जिल्हयात पाणी प्रश्नावरुन झाला. शेतकरी पाणी मागण्यासाठी गेल्यामुळे पोलिसांकडून त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. त्यानंतर पाणी प्रश्नावरुनच बीड जिल्हयात गोळीबार करण्यात आला. त्यानंतर पुणे आणि काल पुन्हा नवी मुंबईतील घणसोली या गावामध्ये गोळीबार झाला आहे. कोठे पाणी प्रश्नावरुन शेतकऱ्यांवर गोळया झाडल्या जात आहेत तर, कोठे रंग पंचमीच्या महोत्सवातून उद्भवलेल्या वादातून गोळया झाडल्या जात आहेत. हे राज्य केवळ गोळीबारांवरच चालत असेल तर याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. घणसोली येथील प्रकरण हे काही साधे प्रकरण नाही. त्यामुळे या प्रकरणाच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. त्या गावामध्ये माणसांची मने फाटली आहेत, ते एकमेकांपासून दुरावलेले आहेत. त्यामुळे त्यांना तसेच सोडून दिले तर त्यातून काहीएक निष्पन्न होणार नाही.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

विधानसभा सभागृहामध्ये असे वक्तव्य केले गेले की, अशाच प्रकारची स्थिती घणसोली मध्ये राहिली तर त्या लोकांना स्थलांतरीत करुन, मुंबईत यावे लागेल, या भूमिकेपर्यंत तेथील लोक आलेले आहेत. मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करणार आहे की, या सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे.

राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात राज्याचे गृहमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब कितीही पाठ थोपटत असले तरी राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती आज भयावह झालेली आहे. आज मुंबईमध्ये बँकांवर दरोडे पडत आहेत. हा दरोडा लक्षावधी नव्हे तर करोडो रुपयांचा पडतो आहे. या दरोडेखोरांवर शासनाचा कसल्याही प्रकारचा धाक राहिलेला नाही. त्यामुळेच हे दरोडे आज राज्यामध्ये दिवसा-ढवळया पडत आहेत.

सभापती महोदय, दिनांक 2 फेब्रुवारी, 2006 रोजी गुन्हयांची आकडेवारी प्रसिध्द झाली ती माझ्याकडे आहे. त्या आकडेवारीनुसार जानेवारी 2005 ते नोव्हेंबर 2005 या 11 महिन्यांच्या कालावधीत महिलांवरील अत्याचाराच्या 8 हजार घटना आपल्या राज्यात घडलेल्या आहेत. आज राज्यामध्ये महिला सुरक्षित नाहीत. हुंडाबळीच्या 219 घटना घडलेल्या आहेत आणि त्यातील केवळ 86 घटनांचीच नोंद करण्यात आली आहे. सर्वात लाजीरवाणी गोष्ट कोणती घडली असेल तर ती म्हणजे छत्रपती शाहू महाराजांच्या कोल्हापूर जिल्हयात 11 महिन्यात सर्वाधिक म्हणजे तब्बल 20 घटना हुंडाबळीच्या घडलेल्या आहेत.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

माननीय मुख्यमंत्र्यांच्या लातूर जिल्ह्यामध्ये देखील हुंडाबळीच्या 20 गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. सभापती महोदय, महिलांवर अत्याचार होत नाहीत तर अन्याय, अत्याचाराची परिसीमा होत आहे. महिलांवरील बलात्काराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. सभापती महोदय, एका पाठोपाठ एक मोठमोठे अधिकारी गुन्हेगारांबरोबर साटेलोटे ठेवत असून बेहिशेबी संपत्ती असल्याच्या कारणावरुन तुरुंगात जात आहेत. सभापती महोदय, याच पोलिसांकडून सर्वसामान्य माणूस भरडला जात आहे. जनतेचा जीव वाचविणारे पोलिसच त्यांचा जीव घेण्यात धन्यता मानत आहेत. अमरावतीमध्ये चारगड प्रकल्पाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. चारगड परिसरातील 15-16 गावांतील जनतेला पाणी मिळावे म्हणून माननीय जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे. त्यासंबंधी विधानसभेमध्ये देखील प्रश्न आला होता. तेथील स्थानिक आमदारांनी हा प्रश्न उपस्थित केला, त्यावेळी माननीय जलसंपदा मंत्र्यांनी विधानसभेमध्ये असे उत्तर दिले की, चारगड प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना पाणी सोडण्यासंबंधी सरकारने मान्यता दिलेली आहे. डिसेंबर मध्ये अधिवेशन झाले, डिसेंबर गेला, जानेवारी गेला व फेब्रुवारीपर्यंत वाट पाहिली. मग फेब्रुवारीमध्ये तेथील जनतेने मागणी केली, पदयात्रा काढली. 17-18 कि.मी.ची पदयात्रा काढून त्या परिसरातील 10-15 हजार महिला, पुरुष, तरुण व बालविद्यार्थी चारगड प्रकल्पावर गेली. त्यानंतर प्रकल्पाच्या भिंतीवर सभा सुरु झाली. त्यावेळी तेथील आमदार, खासदार यांनी जलसंपदा विभागाच्या सचिवांशी संपर्क साधून आंदोलन सुरु असून यातून मार्ग काढण्याबाबत सांगितले. त्यावेळी जलसंपदा विभागाच्या सचिवांनी सांगितले की, या संदर्भात अमरावतीला 8 दिवसांत एक बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावू, आपण आंदोलन संपवावे. मग आंदोलनाचा समारोप सुरु झाला. त्यावेळी 15-20 तरुण कार्यकर्ते झाडाचा आडोसा घेऊन उभे राहिले होते. समारोपाचे शेवटचे भाषण सुरु झाले, त्यावेळी त्या जिल्ह्याचे एस.पी. त्या ठिकाणी गाडी घेऊन पोहोचले. अशा ठिकाणी कोणताही पोलीस अधिकारी सिव्हील ड्रेसमध्ये जात नाही. परंतु ते त्या ठिकाणी सिव्हील ड्रेसमध्ये गेले. ते गाडीतून उतरले आणि त्यांनी सर्व्हिस रिव्हॉल्व्हर काढून पहिली गोळी हवेत झाडली. त्यानंतर दुसरी गोळी समोर उभा असलेल्या प्रफुल्ल राऊत, वय वर्षे 21 या मुलाच्या छातीत मारली. तो मुलगा त्या आंदोलनात नव्हता. तो फक्त पाहत होता की, वर काय चालले आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, त्याला धारातीर्थी पाडले. सभापती महोदय, काय उलटे चक्र आहे ते आपणच पहा ? या सरकारची नितिमत्ता कुठे गेली आहे, हे मला समजत नाही. सभापती महोदय, आंदोलन प्रोव्होक झाले तर पहिल्यांदा लाठीचार्ज केला जातो, त्यानंतर अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात येतात आणि त्यानंतरही परिस्थिती नियंत्रणात आली नाही तर गोळीबार केला जातो. आंदोलनाचा समारोप चालू होता, त्यावेळी तेथील एस.पी.ने पहिल्यांदा तेथे गोळीबार सुरु केला. धरणाच्या भिंतीवर उभे असलेले उपअभियंता दर्जाचे अधिकारी सांगत होते की, गोळीबार, लाठीचार्ज करु नका, आता आंदोलनाचा समारोप होत आहे. परंतु तरीही लाठीचार्ज झाला. सभापती महोदय, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या पण कोणत्या फोडल्या ? एक्सपायरी डेट झाली होती अशा अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून लोकांना पांगविण्याचा प्रयत्न केला. गोळीबार झाल्याची आमच्याकडे कॅसेट आहे. आपणच सांगा की, कोणत्या कायद्यात कमरेच्या खाली मारा किंवा कमरेच्या वर गोळी मारा असे सांगितले आहे. मग एस.पींनी का गोळीबार केला ? आंदोलनाचा समारोप होत असताना देखील एस.पी. त्या ठिकाणी का पोहोचले ? पोलीस खातेच दहशत पसरविण्याचा प्रयत्न करणार असेल तर जनतेला न्याय कोण देणार ?

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

बलात्कार होत आहेत, दरोडे पडत आहेत, यामध्ये पोलिसांचा सहभाग आहे. आता या राज्याची अशी परिस्थिती आहे की, या राज्याचे गृहमंत्री आरोपीच्या पिंचऱ्यात उभे आहेत. असे असतांना आम्ही न्याय कोणाला मागावयाचा ? गृहमंत्र्याभावती संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे. सभापती महोदय, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे, औद्योगिक राजधानी आहे. नवी मुंबईची स्थापना झाल्यापासून एवढया मोठया दंगलीची ही पहिली घटना घडलेली आहे. यासंदर्भातील माहिती गृह विभागाच्या सी.आय.डी.कडे नव्हती काय ? रंगपंचमीचे निमित्त करुन एका बाजूला हजारो माणसे व दुसऱ्या बाजूला हजारो माणसे जमतात व पोलिसांना त्याचा पत्ताही लागत नाही, हे बरोबर आहे काय ? या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. या प्रकरणामध्ये जे जे दोषी असतील मग ते कोणत्याही राजकीय पक्षांचे पुढारी असोत, नेते असोत, मी येथे कोणाचीही बाजू घेऊन बोलत नाही. परंतु या दंगलीची नि:पक्षपातीपणे चौकशी झाली पाहिजे. मी कोणत्याही गटाचे येथे समर्थन करणार नाही, कोणालाही पाठीशी घालणार नाही. परंतु येथे पोलिसांकडून एका गटाला पाठिशी घालण्याचा प्रकार झालेला असल्यामुळे एका गटावर अन्याय झाला, त्याची दखल पोलिसांनी न घेतल्यामुळे ही दंगल झालेली आहे. यामुळे तेथील जनतेमध्ये मोठया प्रमाणात असंतोष पसरलेला आहे. म्हणून माझी या निमित्ताने मागणी आहे की, या संपूर्ण दंगलीची न्यायालयीन चौकशी शासनाने करावी, एवढी बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात विरोधी पक्ष नेत्यांनी जी अडीच तासांची चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये रंगपंचमी च्या निमित्ताने दंगल घडलेली आहे. ही दंगल काल-परवा घडलेली आहे. परंतु नवी मुंबईमधील दोन राजकीय पुढाऱ्यांमधील ही भांडणे आहेत. नवी मुंबई शहरावर वर्चस्व कोणाचे माथाडी कामगारांचे का नवी मुंबईतील मूळ गावकऱ्यांचे या वादावरुन ही दंगल मुख्यत: घडलेली आहे. या वादाचा हा परिपाक दंगलीमध्ये झालेला आहे. ही दंगल गेल्या कित्येक दिवसांपासून धुमसत होती. नवी मुंबईमध्ये महानगरपालिकेच्या जागांचे वाटप झ ाले त्यावेळेपासून हा वाद सुरु झालेला आहे. विधानसभेच्या मतदार संघाच्या डिमार्ककेशनमुळे या मतदार संघावर कोणाचा ताबा राहील यावरुन येथे संघर्ष चालू आहेत. हा काल परवाचा वाद नसून याला होळीचे व रंगपंचमीचे निमित्त झालेले आहे. यासंदर्भात पोलिसांना काही माहिती नव्हती अशातला काही भाग नाही. हजारोंच्या संख्येने लोक रस्त्यावर येतात, व ते पोलिसांना कळत नाही ? याचाच अर्थ पोलिस सुध्दा यामध्ये अंतर्भूत आहेत. एवढया मोठया प्रमाणात दंगल होते व त्या दंगलीची चाहूल पोलिसांना लागत नाही. दंगल होते त्यावेळी जे लोक वॉन्टेड असतात त्यांचे पोलिसांकडून रात्रीच कोम्बिंग ऑपरेशन करण्यात येते. त्यांना ताब्यात घेतले जाते, राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना रातोरात उचलले जाते. परंतु येथे असे झालेले नाही. याचाच अर्थ असा होतो की, या भांडणास राजकीय गटाचे पाठबळ होते. हे दोन्ही गट एकाच पक्षांचे आहेत. नवी मुंबईमध्ये झालेल्या या राजकीय दंगलीमध्ये माथाडी कामगारांचा काहीही संबंध नसतांना त्यामध्ये या लोकाना सहभागी करुन घेण्यात आलेले आहे. नवी मुंबईमध्ये मोठया प्रमाणात गुन्हेगारी वाढत चाललेली आहे. नवी मुंबई हे शहर आता गुन्हेगारांचा अड्डा झालेले आहे.

यानंतर श्री. सांगळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ....

या विभागामध्ये वेगवेगळया प्रकारचे लोक राहतात, अतिरेकी स्वरुपाचे लोक राहतात. या लोकांना वेगवेगळया प्रकारे संरक्षण मिळत आहे. नव्या मुंबईमध्ये काल झालेल्या दंगलीकडे साधी दंगल म्हणून बघता कामा नये, त्याच्या मूळाशी जाण्याची गरज आहे. या ठिकाणी नेमण्यात आलेल्या अधिका-यांचे वर्तन अतिशय अरेरावीचे आहे. तसेच काल झालेली दंगल शांत करण्यासाठी पोलीस दल पूर्णपणे अपयशी ठरले. या अधिका-यांना एवढा माज आला आहे की, ते स्वत:ला सगळयांपेक्षा वेगळे समजायला लागले आहे. आमच्या नावाने नवी मुंबईतील लोक घाबरतात, आमच्या नावामुळे गुन्हेगारी जगतावर वचक आहे. अशा प्रकारचा समज करुन कमी फोर्स असताना सुध्दा स्वत:च्या ताकदीवर गोळीबार करुन दंगलीवर नियंत्रण आणण्याचा कालचा घडलेला प्रकार हे पोलीस दलाचे अरेरावीचे वर्तन आहे असेच म्हणावे लागेल. या सर्व अधिका-यांनी कोणकोणते धंदे केलेले आहेत याची माहिती कायदा व सुव्यवस्थेचा विषय चर्चेला येईल त्यावेळी मिळू शकेल. दंगल थांबविण्यासाठी या अधिका-यांनी साध्या सोप्या पध्दतीचा वापर केला नाही. परंतु पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे दंगल थांबवता आली नसल्याचे सांगण्यात येत आहे. दंगल थांबविण्यासाठी कोणत्या ठिकाणाहून पोलीस दल मागवले याबाबतचा पोलिसांकडून खुलासा आलेला नाही. परंतु त्यावेळी कोणत्याही ठिकाणावरील पोलीस दल त्या ठिकाणी मदत करु शकले नाही ही वस्तुस्थिती आहे. इतर ठिकाणी काही दंगल झाल्यास त्या ठिकाणी सर्व ठिकाणाहून पोलीस जमतात व रातोरात ताबडतोब बैठका घेऊन कार्यवाही करुन परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यात येते व दंगल होणार नाही याबाबतची काळजी घेतली जाते. या ठिकाणी अशी काळजी न घेतल्यामुळे दुस-या दिवशी फार मोठया प्रमाणात दंगल झाली. कालच्या दंगलीमध्ये जे खून पडलेले आहेत, ते एकमेकांना मारण्यापेक्षा पोलिसांनी घडवलेले खून आहेत असा माझा आरोप आहे. या ठिकाणी दोन्ही गटातील म्होरक्यांना अटक करुन त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली असती तर ही घटना घडलीच नसती. परंतु अशी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. कित्येक दिवसांपासूनची त्यांची पार्श्वभूमी बघता त्यांच्यावर दाखल असलेल्या केसेस पाहून त्यांच्या आतापर्यंत कोणत्या प्रकारची कारवाई केली याबाबतचा खुलासा होणे गरजेचे आहे. दोन्ही गटांकडून राजकीय दबाव येत असल्यामुळे या दंगलीमध्ये निरपराध लोक बळी पडलेले आहेत. या प्रकरणी एकमेकांवर गुन्हे दाखल असताना सुध्दा त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ....

नाही. मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो की, काल झालेल्या दंगलीबाबत न्यायालयीन चौकशी करण्यात येऊन या दंगलीस राजकीय पुढारी जबाबदार असतील तर त्यांच्यावर सुध्दा कडक कारवाई होणे गरजेचे आहे. एवढे बोलून माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी उपस्थित केलेल्या चर्चेला पाठिंबा देऊन माझे दोन शब्द संपवतो.

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : माननीय सभापती महोदय, या सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर यांनी प्रथमत: नियम 289 खाली मागणी केलेल्या विषयावर नियम 97 खाली जी चर्चा उपस्थित केली आहे त्यामध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, नवी मुंबईतील घणसोली येथे जो हिंसक प्रकार घडला आहे त्यासंबंधातील चर्चा येथे नियम 97 खाली उपस्थित करण्यात आली आहे. गेले दोन दिवस त्या भागामध्ये अत्यंत भयानक अशी परिस्थिती निर्माण झाली होती, दंगल निर्माण झालेली होती. सभापती महोदय, जे माथाडी कामगार बेघर होते त्यांना कोठेही घरे नव्हती आणि त्यामुळे श्रम करायचे आणि रस्त्यावर कोठे तरी झोपायचे अशी त्यांची परिस्थिती होती त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री असलेल्या श्री.वसंतदादा पाटील आणि श्री. शरद पवार यांनी या माथाडी कामगारांना स्वत:चे घर मिळावे म्हणून नवी मुंबईमध्ये भूखंड देण्यात आला आणि तेथे त्यांनी आपली घरे उभी केली. सिंप्लेक्स कॉम्प्लेक्सच्या बाजूला या माथाडी कामगारांची वसाहत आहे आणि त्याच्या बाजूला जे घणसोली गाव आहे तेथील स्थानिक लोक, शेतकरी रहात आहेत. सभापती महोदय, माझे मित्र ॲडव्होकेट श्री.परब यांनी आताच या ठिकाणी या संदर्भात आपली भूमिका मांडताना सांगितले की, तेथे काही राजकीय प्रश्न आहेत. जरूर तेथे राजकीय प्रश्न आहेत. परंतु त्या प्रश्नांचे एवढ्या मोठ्या प्रमाणात भांडवल होईल असे कोणालाही वाटले नव्हते. मध्यंतरी तेथे नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुका झाल्या. तेव्हा तेथील लोक कोणाच्या बाजूला आहेत हेही समजून आले. त्या महापालिकेमध्ये आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बहुमत आहे. त्यामुळे त्या भागामध्ये दर दिवशी असे काही निरनिराळे प्रकार होत आहेत हे आपण वर्तमानपत्रातून वाचतो आहोत. अन्य पक्षांना तेथे यश मिळू शकले नाही त्यामुळे त्यांच्यामध्ये नाराजी जरूर आहे, असंतोषाचे वातावरण आहे हे आपण पाहिले आहे आणि ही वस्तुस्थिती तेथे नाकारता येणार नाही. परंतु काल त्या ठिकाणी जी दंगल झाली तिचा आणि या एकंदर परिस्थितीचा दूरान्वयानेही संबंध आहे असे मी तरी मानत नाही. या सभागृहामध्ये माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनी या घणसोली भागामध्ये जी दंगल काल झाली त्याबाबत माहिती दिली आणि त्या संपूर्ण प्रकाराची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे. त्यापेक्षा अन्य काही पर्याय राज्य सरकारकडे आहे किंवा काय हेही सरकारने तपासून पहावे असे मला वाटते. परंतु आज तेथे जी काही परिस्थिती निर्माण झालेली आहे, जी काही दंगल झाली आहे तिचे पडसाद आणि परिणाम आपणास

..... यूयू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुलकर्णी ....

त्या परिसरामध्ये पहावयास मिळतात. या ठिकाणी आपण न्यायालयीन चौकशीची मागणी जरूर केली आहे पण ती करीत असताना तेथे जी वस्तुस्थिती आहे तीही तपासली गेली पाहिजे असे मला वाटते. पोलिसांच्या बाबतीत आपण म्हटले की, तेथे त्यावेळी आवश्यक तेवढे पोलीस बळ नव्हते. त्यामुळे 2-3 लोकांचे बळी गेले आहेत. माथाडींचे नेते श्री.नरेंद्र पाटील यांच्या अंगरक्षकाचाही त्यात बळी गेला आहे. इतकेच नव्हे तर 13-14 पोलीस अधिकारी-कर्मचारी देखील त्यामध्ये जखमी झालेले आहेत. 2-3 पोलीस अधिकारी तर संपूर्णत: रक्तबंबाळ झाले होते आणि ते आज निरनिराळ्या रूग्णालयांतून उपचार घेत आहेत. सभापती महोदय, ही जी काही परिस्थिती तेथे निर्माण झाली त्याला केवळ पोलीसच जबाबदार आहेत असे अनुमान काढले तर त्याच्याशी मी तरी सहमत होऊ शकत नाही. पोलिसांना काम करीत असताना कित्येकदा ऑन द स्पॉट निर्णय घ्यावे लागतात, त्यामध्ये कठोर निर्णय देखील घ्यावे लागतात. अशा वेळी पोलिसांवर कारवाई करा अशी मागणी कोणी करणार असेल तर योग्य नाही. कारण पोलिसांनी कोठलीही कारवाई केली नाही तर 'पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली' असे म्हटले जाते. अशा प्रकारे दोन्ही बाजूंनी ढोलकी बडविण्याचे काम होत असेल तर तेही बरोबर नाही.

(यानंतर श्री. सरफरे ..... व्हीव्ही 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंदी

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

हेच प्रकार सामान्यपणे ज्या ज्यावेळी दंगली होतात त्यावेळी आपण पहात असतो. माननीय उपमुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत त्यांना माझी विनंती आहे की, हे प्रकरण जास्त चिघळता कामा नये. माथाडी कामगारांनी हरताळ पुकारला आहे, त्यांनी सर्व कामे बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे, सर्व बाजारपेठा बंद आहेत. हे लोण कुठवर पोहोचणार आहे? माथाडी कामगारांचा संप झाला तर उद्या नव्या मुंबईचे संपूर्ण जनजीवन बंद पडेल. लोकांना भाजीपाला, दूध व अन्य वस्तू मिळू शकणार नाहीत. आणि म्हणून शासनाने यामध्ये जातीने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. व ही धुमश्चक्री अधिक वाढणार नाही, त्या लोकांमध्ये सामंजस्याचे वातावरण निर्माण होईल यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहेत. माथाडी कामगारांनी केलेले संपाचे आवाहन लक्षात घेऊन त्यामुळे जनजीवन विस्कळीत होणार नाही याची शासनाने खबरदारी घ्यावी.

सभापती महोदय, त्या ठिकाणी गावातील व गावाबाहेरील लोकांकडून कलह निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामागे काही राजकीय पार्श्वभूमी आहे. कल्याण, नवी मुंबई, डोबिवली, भाईंदर याठिकाणी चाललेले राजकारण ज्यावेळी आपण डोळसपणे पहातो त्यावेळी त्याठिकाणी असलेला मूळ जमीन मालक हा आगरी समाजातील शेतकरी आहे. नवी मुंबईमध्ये या लोकांची मोठया प्रमाणात शेत जमीन होती ती सिडकोने अल्प किंमतीमध्ये विकत घेतली. त्याचप्रमाणे भाईंदर, कल्याण, डोंबिवली या भागातील भूमिपुत्रांना हाकलून त्या ठिकाणी बाहेरच्या लोकांचे पुनर्वसन करण्याचा शासनाकडून प्रयत्न होणार असेल तर त्यामधून रोष आणि राग उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. ही गोष्ट सुध्दा आपण लक्षात ठेवली पाहिजे. अशा परिस्थितीत उद्या महानगरपालिका किंवा नगरपालिकांच्या निवडणुका होतील त्यावेळी भूमिपुत्रांना अधिक प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. अशाप्रकारची भूमिका माझ्या पक्षामध्ये सुध्दा मी सातत्याने मांडीत आलो आहे. दुर्दैवाने नव्या मुंबईमध्ये बाहेरुन मोठया संख्येने आलेली मंडळी आणि भूमिपुत्र यांच्यामध्ये असंतोष निर्माण होणे ही या दंगलीमागील पार्श्वभूमी आहे. आणि त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांच्या मनामध्ये बाहेरुन आलेल्या लोकांबद्दल असलेली असूया आणि त्यांच्या मनामध्ये खदखदणारे दु:ख या निमित्ताने व्यक्त होत असते. म्हणून माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, शासनाने या संदर्भात लवकरच सर्व संबंधित मंडळींना चर्चेसाठी बोलावून हा प्रश्न मिटवावा. सभापती महोदय, भूमिपुत्र कोण? सरकारने ज्यांच्याकडील जमिनी अल्प किंमतीमध्ये, मोफत घेतल्या आहेत तो भूमिपुत्र. अशी व्याख्या करीत असतांना त्या भूमिपुत्राला न्याय मिळाला पाहिजे. आणि ज्यावेळी असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

प्रश्न निर्माण होतात त्यावेळी ते अत्यंत सावधपणे सोडविले पाहिजेत. त्याकरीता माननीय उपमुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर ही बैठक बोलावावी अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, या घटनेमध्ये जरुर राजकारण झाले आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे काही राजकीय मंडळींनी त्या ठिकाणी जास्तीत जास्त लोकांना उत्तेजित करण्याची भूमिका घेतली याची माझ्याकडे माहिती आहे. ती मी सभागृहापुढे ठेवीत नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार...)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु...

कालच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमये झालेला विरोधकांचा पराभव आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया,एका गंभीर विषयावर चर्चा चाललेली आहे. ॲड. गुरुनाथ कुलकर्णी हे व्यवस्थित विषय मांडतात याबद्दल दुमत नाही. परंतु माननीय गृहमंत्री सभागृहात आल्यानंतर त्यांच्या भाषणाची दिशा एकदम बदलली. त्यांनी सांगितले की, मी सिंधुदुर्गचा आहे. परंतु ते महाराष्ट्राचे भूमिपुत्र आहेत. त्यांनी नवीन विषय निर्माण करु नयेत. त्यांचे भाषण मी मघापासून बारकाईने ऐकत आहे. माथाडी कामगारांच्या काही मागण्या असल्याचे आम्हाला वर्तमानपत्रातून वाचावयास मिळाले. त्याचबरोबर स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळालेल्या नाहीत, अशीही माहिती मिळालेली आहे. त्यांची व्यथा ते मांडू शकत नाहीत. त्यांची व्यथा सन्माननीय सदस्यांनाही माहीत आहे आणि व्यथा मलाही माहीत आहे. मूळ राजकारण वेगळे आहे. त्याकरिता इकडून तिकडून ओढून ताणून वेगळा विषय मांडला जात आहे. खरी भूमिपुत्राची व्यथा आहे. सन्माननीय सदस्यांना जे काही सांगावयाचे आहे, ते त्यांनी स्पष्ट सांगावे, म्हणजे त्यास उत्तर देणे आम्हालाही शक्य होईल.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी यांनी आपले भाषणास पुढे सुरु ठेवावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : या मागे राजकारण आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये दोन तृतीयांश बहुमतांनी एखादा पक्ष सत्तेवर येत नसेल तर त्या ठिकाणी विरोध होतो. त्यांनी तसा प्रयत्न केला, परंतु त्यामध्ये त्यांना यश आलेले नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. याचे देखील पडसाद दंगल घडवून आणण्यामध्ये उमटू शकतात. याच्या मागे कोण आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

तालिका सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये अडथळा आणू नये. आपण ज्यावेळेस या विषयावर बोलाल, तेव्हा त्यांच्या मुद्याला आपण उत्तर द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य दंगलीच्या संदर्भात बोलत असतांना वेगळा विषय मांडत आहेत.

तालिका सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांना त्यांचे विचार मांडू द्यावेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी भाषण करत असतांना त्यांनी काही गोष्टी सांगितल्या. त्या संदर्भात सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु....

साहेबांनी त्यांना स्पष्ट करण्यास सांगितले. खरे तर त्या विषयावर ते बोलणार नव्हते परंतु सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना त्यांना बोलण्यास भाग पाडले.

श्री.दिवाकर रावते : मारामारी कशावरुन झाली, हे आम्हालासुध्दा माहीत आहे. □ह विभागाकडे जी काही माहिती आहे ती त्यांनी सांगावी.

श्री.□ु□थ □ल□□ : मी माझी भूमि□ स्पष्ट □लेली आहे. त्या ठि□□ राज□र□ घडलेले □ही असे मी म्ह□□र □ही. याचे महत्वाचे □र□ म्ह□जे महा□□रपालि□ची □घड□□ इ□ाली, त्यामध्ये विरोधी प□ला यश येईल असे अपे□□ होते, परंतु त्यां□ यश मिळू श□लेले □ही. या स्पर्धेतू□ही घट□ घडलेली आहे. त्या ठि□□ □ही मंडळी उपस्थित होती.

(सभापतीस्था□ मा□□य उपसभापती)

माझी □ह मंत्री महोदयां□ वि□ी राहील □, घ□सोली भा□तील जे प्रमु□ लो□ प्रति□ी आहेत त्यांची बैठ□ घ्यावी आ□ त्या ठि□□ वातावर□ बिघड□र □ही, या दृष्टीने □हीतरी मा□ काढण्याचा प्रयत□□रावा,एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

अशुधारित प्रत / प्रारुपीकरणाची नाही

श्री.मधु□र चव्हा□ (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, स□मा□□य सदस्य श्री.□□□थ □ल□□ यां□ या विषयाला वे□ळी दिशा दे□याचा प्रयत□ □ला असे स□मा□□य सदस्य श्री.रावते साहेबां□ सां□□ले ते बरोबर आहे. त्या ठि□□च्या महा□□र पालि□च्या □□वडु□मध्ये भाजप आ□ शिवसे□ यां□ □□वडू□ लढविली. त्या ठि□□ स्था□□ लो□ आ□ बाहेरचे लो□ यांच्यामध्ये वाद □ही. स्था□□ लो□च्याबाबतीतील आमची भूमि□ □□श्चितच वे□ळी आहे. त्या ठि□□चे काही लो□ हे वसाहती सोडू□ चाललेले आहेत. राज□र□ आ□ले जात आहे. आज □ची मुंबईमध्ये बंद पु□रलेला आहे. 15 हजार लो□ फिरु□ दु□□ बंद □र□यास भा□ पाडत आहेत. आज आपल्याला वस्तुस्थिती मा□य □ली पाहिजे □, □ही लो□□ □□राळा वाद □□मा□ □लेला आहे. भूमिपुत्र हे स□ळे आहेत. परंतु तेथील स्था□□ लो□च्या जमि□ या मातीमोल भावा□ शास□□ घेतलेल्या आहेत....

या□तर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

आज तेथील 29 गावातील लोकांना असे वाटते की, आम्हाला नव्या मुंबईत काही स्थान नाही. बाजार समितीसाठी जी हजारो हेक्टर जमीन घेतली गेली ती जमीन बाजार समितीला किंवा तेथील लोकांना देण्याऐवजी मॉल्स आणि इतर लोकांना सिडकोने विकलेली आहे. त्या ठिकाणी तीन मतदारसंघ झालेले आहेत. श्री. शशिकांत शिंदे यांना असे वाटते की, त्या ठिकाणी एक मतदारसंघ मला मिळाला पाहिजे. श्री. गणेश नाईक यांना असे वाटते की, पूर्ण नव्या मुंबईमध्ये माझे वर्चस्व राहावयास पाहिजे. यामध्ये आपण राजकारणाची धुळवड करावयास नको. हिंदु-मुसलमानांमध्ये किंवा दोन धर्माच्या लोकांमध्ये दंगल होते तशा पध्दतीचे दृश्य त्या ठिकाणी निर्माण झालेले आहे. लोक हातामध्ये तलवारी आणि लाठ्याकाठ्या घेऊन येतात. आमचे नगरसेवक श्री. भरत जाधव यांचा एस.एम.एस.आला की, कोणाला तरी पाठवा. माननीय गृहमंत्री याबाबत सांगतील. आपण सगळ्यांनी मिळून त्या ठिकाणी शांतता प्रस्थापित केली पाहिजे. आपण नाटकी शांतता समित्या स्थापन करावयास नको. आपल्याबद्दल पूर्ण आदर ठेऊन सांगतो की, त्या ठिकाणी हा वाद दोन महिन्यांपूर्वीपासून चाललेला आहे. अशा प्रकारे काही निमित्त होईल हे आपल्या सी.आय.डी. खात्याला कळले नाही काय ? गणपती उत्सवातील मिरवणुका, होळी किंवा इतर जे धार्मिक सण असतात त्यावेळी दुर्दैवाने कोठले तरी वैमनस्य किंवा कोणते तरी भांडण उकरून काढण्याची संधी समाजकंटक किंवा ज्यांची मने कुजलेली आहेत, समाजामध्ये रक्तपात झाला तरी ज्यांना काही वाटत नाही, दोन माणसे मेली किंवा कुटुंब उद्ध्वस्त झाले तरी ज्यांना काही वाटत नाही, जे राजकारणाची पोळी प्रेतावर भाजून घेतात त्याचे त्यांना काही वाटत नाही, अशा लोकांनी केलेल्या या दंगली आहेत. मी एका पुढाऱ्याचे आता नाव घेत नाही. तो पुढारी असे म्हणतो की, आम्ही त्या ठिकाणी माथाडी कामगारांना मारहाण सहन करणार नाही. दुसरा पुढारी सांगतो की, आम्ही भूमीपुत्रांना मारहाण सहन करणार नाही. दोघेही मराठी आहेत. ते एकाच पक्षाचे आहेत आणि ते तुमच्याच पक्षाचे आहेत. सभापती महोदय, मला असे वाटते की, ज्यावेळी दंगल होते त्यावेळी दगड मारणाऱ्यांचे हात कधी छाटले जात नाहीत. जो बाजूने शांतपणे जाणारा असतो तो मयत होतो. ज्यावेळी दंगल होते त्यावेळी जो दंगल माजवणारा असतो तो बंगल्यात राहात असतो

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. मधुकर चव्हाण .....

आणि इतरांची घरे उद्ध्वस्त होतात. निरपराध माणसे मरत असतात हे कोणत्याही दंगलीतील सत्य आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी भांडणच असेल तर ती आपल्या पक्षातील लोकांची भांडणे आहेत. त्या ठिकाणी जी दंगल झालेली आहे त्या दंगलीने उग्र रुप धारण केलेले आहे. पंधरा ते वीस हजार लोक नव्या मुंबईमध्ये आलेले आहेत. त्या ठिकाणी माथाडी कामगार राहतात हे सत्य आहे. ते माथाडी कामगार असे म्हणतात की, यामध्ये आमचा काय दोष आहे ? या ठिकाणी वसाहती झाल्या म्हणून आम्ही राहावयास आलो आणि खरोखरच त्यांचा काही दोष नाही. काही लोकांना असे वाटते की, आमची मिठागरे गेली, आमचे भूखंड गेले. त्या ठिकाणी राजकारणामध्ये जास्तीत जास्त जरी कोणी गैरफायदा घेतला असेल तर तो राष्ट्रवादी काँग्रेसने घेतलेला आहे. दुसऱ्या कोणत्याही नगरसेवकाला बोलू देत नाहीत. त्या महानगरपालिकेमध्ये ठराव मांडू देत नाहीत. त्या ठिकाणी दुसऱ्या पक्षाला कोणताही निधी देत नाही. सत्तेचा माज चढल्यासारखी नव्या मुंबईची महापालिका तेथील राष्ट्रवादी काँग्रेसचे लोक चालवित आहेत. त्यातून निर्माण झालेल्या असंतोषाचा दुर्दैवाने अशा तऱ्हेचा ज्वालामुखी होतो. आणि आपण सगळे या ज्वालामुखीच्या तोंडावर उभे राहणार आहोत काय ? मला माननीय गृहमंत्र्यांना विनंती करावयाची आहे. आपण सगळ्यांनी तेथील दंगल थांबविली पाहिजे. कारण त्या ठिकाणी आपलीच माणसे मरतील. मराठी माणसे मरतील. व्देष हा स्लो पॉयझनिंगसारखा असतो. तो व्देष माणूस कोठे तरी हृदयाच्या कोपऱ्या जपून ठेवत असतो आणि ज्यावेळी संधी मिळेल त्यावेळी तो व्देष बाहेर काढून रक्तपात करीत असतो. कारण एकदा व्देष निर्माण झाला की माणसाचा विवेक संपतो. विवेक संपला की, माणसे मरतात, लहान मुले मरतात. परीक्षेच्या वेळी लोक मुलाबाळांना घेऊन जात असल्याचे दृश्य वर्तमानपत्रात आले आहे ते आपण बघा. सामना दैनिकाने वर्तमानपत्रात दृश्य दिले आहे. दंगल झाल्यानंतर लोक निर्वासितांसारखे चाललेले आहेत. ते असे उत्तर देतात की, आम्ही आमच्या कुटुंबियांना आधी सुरक्षित स्थळी नेतो मग यांच्याकडे बघण्यास आम्ही समर्थ आहोत. हे सगळे आपण थांबविले पाहिजे असे मला वाटते. हा रक्तपात थांबविला पाहिजे. आपापसातील वैमनस्य थांबविले पाहिजे. सकाळी तेथील लोकांनी पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. पोलीस अधिकाऱ्यांनी संध्याकाळपर्यंत काय केले ? रात्री सगळे लोक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. मधुकर चव्हाण ...

जमले. तक्रार केल्यानंतर जवळजवळ पंधरा ते सोळा तासानंतर हे झाले. पोलिसांना माहीत असावयास पाहिजे की, दुर्दैवाने लोक या दिवशी नशापाणी करुन होळी साजरी करीत असतात. काही वेळा आम्ही हिंदू सुध्दा असे असतो की, दुसऱ्या दिवशी दारु पिऊन आमच्या धर्माचीच विटंबना करीत असतो. दारु पिणे म्हणजे शिमगा साजरा करणे. दारु पिऊन गणपतीच्या मिरवणुकीमध्ये जाणे म्हणजे गणपतीची मिरवणूक साजरी करणे असे लोकांना वाटते. म्हणून मला असे वाटते की, आपण आपापसात भांडण करुन मरणार अणि त्याची मजा त्या ठिकाणी दुसरे लोक बघतील. बरे आपापसात मरत आहेत असे ते म्हणतील. म्हणून मला असे वाटते की, त्या ठिकाणी अतिशय कठोरपणे दंगल शमविली पाहिजे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी कारण नसतांना गोळीबार केला असेल आणि ज्यांनी योग्य वेळेला कारवाई केली नसेल त्यांच्या कारवाई झाली पाहिजे. सस्पेंशन वगैरे फार होतात, सस्पेंड झाल्यानंतर पाच सहा महिन्याने चौकशी होते आणि या ठिकाणी मंत्रालयामध्ये चकरा मारुन लोक चांगल्या ठिकाणी आपल्या नियुक्त्या करुन घेतात.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण असे म्हणाले की, लोक दारु पिऊन गणपतीची मिरवणूक काढतात..

श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय सदस्यांनी गैरसमज करुन घेऊ नये.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...)

(काही माननीय सदस्य मध्येच बोलत असतात.)

आमचे आपापसातील काही वाद नाहीत. मी बोलतो ते बरोबर आहे. मी असे म्हणलो की, काही लोक होळीच्या दिवशी अशा गोष्टी त्याठिकाणी करतात, हे बरोबर नाही. मला असे वाटते की, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, हा आपल्या पक्षातील वाद आहे. आपल्या दोन नेत्यांमधला वाद आहे. आपल्या महानगरपालिकेतील वाद आहे. त्याचे खापर आमच्या कुणावर फोडू नका. "सामना" दैनिकामध्ये अतिशय विदारक दृष्ये आलेली आहेत. मला असे वाटते की, त्या ठिकाणची दंगल शमली पाहिजे. परस्परांमध्ये गैरसमज असतील तर ते दूर करण्यासाठी सगळयांनी प्रयत्न करायला पाहिजेत. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणतात ते बरोबर आहे. तेथील माथाडी कामगार हे उपरे नाहीत. तेथील माथाडी कामगार निर्दोष आहेत. सगळे बाजार तिकडे गेल्यामुळे ते त्याठिकाणी जागा घेऊन आपल्या कुटुंबीयांसोबत राहात आहेत. सगळे बाजार तिकडे गेल्यामुळे ते कुठे राहाणार ? ते तिथेच रहाणार. पण परस्परांमधील द्वेष आपण संपवला पाहिजे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये होळी सणाच्या निमित्ताने जो असंतोष निर्माण झाला त्याची पार्श्वभूमी काय होती हे माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितलेले आहे. त्याठिकाणी आमच्या आगरी समाजाचा जो खरा भूमिपूत्र आहे त्याच्यावर प्रामुख्याने गेली 25-30 वर्षे अन्याय होत आहे. त्या परिसरामध्ये ज्या नव्याने वसाहती झालेल्या आहेत त्याबाबतीत शासनाने गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. हा असंतोष घणसोलीपुरता मर्यादित न राहाता तो संपूर्ण नवी मुंबई, उरण आणि पनवेल परिसरामध्ये पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याठिकाणच्या स्थानिक माणसाची जमीन गेली. स्थानिक माणसाची जमीन मातीमोल किंमतीने घेतली गेली आणि त्या माणसाला त्याठिकाणी आज न्याय मिळत नाही. धुळवडीचे केवळ निमित्त झाले. हा असंतोष कोणत्या एका मुलीला गुलाल किंवा रंग लावला म्हणून निर्माण झालेला नाही. त्याठिकाणचे मग माथाडी लोक असोत, बाहेरचे युपीचे लोक असोत किंवा बिहारचे लोक असोत, हे लोक या नवी मुंबईच्या परिसरामध्ये संघटित होऊन स्थानिक लोकांना असंटित करण्याचे काम करीत आहेत. सभापती महोदय, आज जे.एन.पी.टी.मध्ये काय परिस्थिती आहे ? तेथील आमचे जे स्थानिक प्रकल्पग्रस्त आहेत त्यांना प्रकल्पग्रस्ताचे ओरिजिनल सर्टिफिकेट घेण्यासाठी तीन-तीन दिवस अलिबागच्या जिल्हाधिकारी कचेरीवर रांगा लावाव्या लागत आहेत. त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून साधे सर्टिफिकेट मिळू शकत नाही. अशी भयानक परिस्थिती त्याठिकाणी निर्माण झालेली आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी शासनाला सांगू इच्छितो की, हा असंतोष पुढे मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. आज नवी मुंबई, उरण परिसरामध्ये सर्व स्थानिक लोक पक्ष विसरुन एकत्र आलेले आहेत. स्थानिक लोकांना न्याय मिळाला पाहिजे अशी भूमिका त्या लोकांनी घेतलेली आहे. याठिकाणी बाहेरचे लोक येत आहेत. तुम्ही मुंबई शहर नवीन करायला मागत आहात. त्यास आमचा विरोधी नाही. पण त्यांना ज्या सुविधा दिलेल्या आहेत त्या सुविधा स्थानिक लोकांना देखील मिळाल्या पाहिजेत. ज्या सुविधा माथाडींना आहेत त्या सुविधा घणसोलीतील स्थानिक लोकांना नाहीत. घणसोलीमध्ये मी अनेक वेळा गेलो आहे. कोणत्याही ठिकाणी नवीन वसाहत होताना त्याठिकाणी लोकांना मिळणा-या सोयी सुविधांमध्ये विषमता राहाणार नाही, हे पाहाण्याची जबाबदारी शासनाची आहे. ही विषमता आज दूर होताना दिसत नाही. सभापती महोदय, उरण तालुक्यामध्ये सोनारी, जसका इत्यादी 12 गावांमध्ये ड्रेनेजचे पाणी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

जाण्यासाठी जागा नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी तेथे जाऊन तेथील परिस्थिती एकदा पहावी अशी मी त्यांना विनंती करतो. आजूबाजूला गाव आहे. त्याठिकाणी गावठाण वाढू शकत नाही. त्याठिकाणी ड्रेनेजचे, टॉयलेटचे पाणी जायला मार्ग नाही. स्थानिक माणसांचा खरा असंतोष तेथे आहे. हिन्दुस्थानातील सर्व गुंड आमच्या नवी मुंबईमध्ये येऊन राहात आहेत. सभापती महोदय, दर सहा महिन्यातून एक तरी दरोडा आमच्या बँकेच्या नव्या मुंबईतील सर्व शाखांवर पडतो. अजून एकाही दरोड्याचा तपास लागलेला नाही. इतकी भयानक परिस्थिती त्याठिकाणी निर्माण झालेली आहे. त्याठिकाणी आज पक्ष आहेत की नाहीत हे मला माहीत नाही. स्थानिकांना न्याय मिळाला पाहिजे असे याठिकाणी सांगण्यात आले. परंतु आम्ही स्थानिक जरी निवडणुकीसाठी उभे राहिलो तरी मतदार हे बाहेरचे असल्यामुळे आम्हाला कोण मत देणार ? मी त्याठिकाणी निवडणुकीसाठी उभा राहिलो आणि त्याठिकाणी बाहेरचे चतुर्वेदी आणि कृपाशंकर आले तर मला कोण मत देणार ? मला जरी निवडणुकीचे तिकीट मिळाले तरी त्याचा काही फायदा होणार नाही.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ...

त्याच्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. कारण घटनेप्रमाणे हिंदुस्थानामध्ये कोणीही कुठेही उभा राहू शकतो. परंतु या निमित्ताने शासनाने या दंगलीमागील मूळ कारण शोधले पाहिजे अशी माझी मागणी आहे. या भागामध्ये असंतोष का आहे याचे कारण शोधले पाहिजे. येथील परिस्थिती पाहिली तर स्थानिक गरीब माणूस आहे त्याच्या मुलांना शाळा नाही. आमची मुले रिलायन्सच्या शाळेत किंवा डी.वाय.पाटील महाविद्यालयात जाऊ शकतात. परंतु गरीब माणसांच्या मुलांना शिक्षणाची सोय नाही. अशी भयानक अवस्था या परिसरामध्ये आहे. या भागामध्ये जो असंतोष निर्माण झाला आहे तो सर्व पक्षाच्या नेत्यांनी एकत्र बसून सोडविला पाहिजे. मी या गोळीबाराबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करणार आहे की, पोलीस निरीक्षक श्री.पठाण यांनी जो गोळीबार केला त्याची चौकशी करावी. दंगल शमविण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला,अश्रुधुराचा वापर केला आणि नंतर गोळीबार केला. परंतु गोळीबार केला तो छातीवर गोळया घालून गोळीबार केला. छातीला गोळी लागली आहे म्हणजे गोळीबार करणाऱ्यांचा उद्देश चांगला नाही. दंगल शमविण्यासाठी कमरेच्या खाली गोळीबार केला पाहिजे असे नियम आहेत. अनेक आंदोलनामध्ये आम्ही असे प्रकार पाहिलेले आहेत. या परिसरातील स्थानिक आणि बाहेरचे असा वाद मिटविला नाही तर या भागामध्ये मो असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे. खालच्या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा होत असताना काही माननीय सदस्यांची भाषणे मी ऐकली आहेत. माथाडी कामगारांचे नेते यांनी भाषण करताना सांगितले की नवीन मुंबईमध्ये धंदा बंद करा. ही मागणी योग्य आहे असे मला वाटत नाही. म्हणून जे काही मतभेद असतील आणि असंतोष असेल तो दूर केला पाहिजे. या परिसरातील वातावरण निर्मळ कसे होईल यादृष्टीने शासनाने सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेऊन दंगलीचे मूळ कारण शोधण्याचे काम केले पाहिजे. शासनाचे सीआयडी खाते काय करीत होते ? या भागामध्ये वातावरण कसे आहे याचा रिपोर्ट वेळोवेळी त्यांनी शासनाला का केला नाही ? रिपोर्ट केला नसेल तर संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे. अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी शासनाने घेतली पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो आणि माझे भाषण संपवितो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, नवी मुंबई परिसरातील घणसोली गावामध्ये ही दुर्देवी घटना घडली ती संपूर्ण महाराष्ट्राला भूषणावह नाही. अतिशय दु:खाने सांगावेसे वाटते की, घटना घडत असताना मला अनेकांचे फोन आले आणि फार मोठी दंगल उसळली आहे याची मला जाणीव झाली. नवी मुंबई शहराचा इतिहास अनेक सन्माननीय सदस्यांनी यावेळी सांगितला. नवी मुंबई ज्यावेळी निर्माण झाली त्यावेळी अनेक जाती-धर्माचे लोक या शहरामध्ये आले आणि गेली 30-40 वर्षे उरण,पनवेल,अलिबाग,कळंबोली आणि नवी मुंबई या भागामध्ये माथाडी कामगार कामानिमित्त रहायला आले आहेत. गेली 30-40 वर्षे माथाडी कामगार आणि इतर सर्व जातीधर्माचे लोक येथे रहात आहेत.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सौ. मंदा म्हात्रे .....

असे सर्व लोक राहत असतांना नेमकी कालच अशी कोणती घटना घडली की, इतकी मोठी दंगल येथे उसळली हेच मला समजत नाही. आपले नेते माननीय श्री. आर.आर. पाटील हे निप:क्षपातीपाणे या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करतील यात शंका नाही. कारण त्यांनी या राज्यामध्ये अतिशय डोळसपणे अनेक चांगले निर्णय घेतलेले आहेत त्यामुळे या घटनेची देखील ते खोलात जाऊन चौकशी करतील. कालच्या घटनेचे निमित्त केवळ एका मुलीच्या अंगावर होळीचा रंग टाकला आणि त्यातून दोन्ही गटांमध्ये मारामारी झाली, पोलीस त्या ठिकाणी गेले व त्यांनी समजाविले. पोलिसांना माहिती होते की, या दोन्ही समाजात छोटया मोठया व लहान लहान मुलांमध्ये वाद होत असतात पण त्याचे पर्यावसान एवढया मोठया दंगलीमध्ये होईल अशी कोणालाही शंका नव्हती. पहिल्या दिवशी पोलिसांनी समजावल्यानंतर रात्रीतून काय झाले माहिती नाही पण दुसऱ्या दिवशी मोठया प्रमाणात दंगल उसळली. वास्तविक या गावांमध्ये मयत झाली तर 50 लोक सुध्दा उपलब्ध होत नाहीत परंतु दंगलीसाठी एवढया मोठया प्रमाणात जमाव दोन्ही बाजूकडून कोठून आला याचीही चौकशी झाली पाहिजे. कारण गावात कुठल्याही कार्यक्रमाला लोक सापडत नाहीत, नातेवाईकांना बोलवावे लागते पण अचानक असे होण्याचे कारण काय हे समजत नाही. दूरदर्शन वाहिन्यांवर मी हे चित्र पाहिले. मी त्या ठिकाणी काल सायंकाळी गेलो व तेथील जखमींची विचारपूस केली, पोलिसांकडे सुध्दा चौकशी केली. प्रेतयात्रेला मी गेले नव्हते परंतु माझ या मोबाईलवर मेसेज मात्र मिळाला की आपण प्रेतयात्रेला आलात व जे भाषण केले ते एकदम चांगले होते. अशा प्रकारे मोबाईल देखील अशा प्रकारचे गैरसमज पसरण्यासाठी एक कारण असू शकते. मोबाईलमुळे बातमी वाऱ्यासारखी पसरते. या ठिकाणी नरेंद्र पाटील यांच्यावर जो हल्ला झाला त्यासंबंधीची चित्रफित जर मिळाली तर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी ती जरुर पहावी. कारण नरेंद्र पाटलांवर हल्ला झाला आणि जर त्या ठिकाणी बॉडीगार्ड नसता तर काय परिस्थिती झाली असती याची कल्पनाच करवत नाही. माथाडी आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये अजून मोठया प्रमाणात उद्रेक झाला असता. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, मोबाईलमुळे जे गैरसमज होतात त्यातून संपूर्ण रायगड जिल्हा, नवी मुंबई, ठाणे या ठिकाणी ही दंगल पसरण्यासाठी पाच मिनिटे सुध्दा लागली नसती. नरेंद्र पाटील यांच्यावर हल्ला झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सौ. मंदा म्हात्रे .....

त्यामध्ये त्यांचा बॉडीगार्ड मृत झाला, तेथूनच एक पाटील नांवाचा मुलगा चालला होता त्याच्या छातीत गोळी लागली, एक मिश्रा नांवाचा केळीवाला उभा होता त्याला सुध्दा गोळी लागली. अशा प्रकारे निष्पाप लोक यामध्ये बळी गेले आणि खरी दंगल करणारे जे होते ते निघून गेले. खरे तर दंगल करणाऱ्यांचे हात कधीच कापत नसतात, दगड मारणाऱ्यांचे हात कधीच कापले जात नाहीत. म्हणून यामध्ये जे निष्पाप लोक बळी गेले त्यांच्या कुटुंबियांना मदत मिळाली पाहिजे, जखमींना देखील मदत मिळाली पाहिजे आणि दोन्ही समाजांमध्ये सामंजस्य घडवून आणले पाहिजे अशी माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी विनंती करते. कारण ग्रामस्थांकडून कधीही आम्हाला जाणवले नाही की, माथाडी आले म्हणून आम्हाला काम मिळत नाही, आमच्यावर अन्याय होत आहे अशा प्रकारे गांववाला आणि बाहेरवाला असा भेद त्यांनी केल्याचे मला आठवत नाही. भलेही ते सिडकोबद्दल तक्रारी करतात, महापालिकेच्या संदर्भात बोलतात पण कुठल्याही समाजाबद्दल बोलल्याचे मला तरी माहिती नाही. मग ही दंगल का झाली याची सखोल चौकशी झालीच पाहिजे. कदाचित दोन्ही समाजांमध्ये भांडणे लावून देण्यासाठी कोणीतरी ही भूमिका घेत असावे म्हणून या समाजातील नेत्यांना तसेच राजकीय नेत्यांना एकत्रित घेऊन हा गैरसमज दूर करावा व माननीय उप सभापती महोदयांनी देखील यामध्ये लक्ष घालावे व यातून लवकरात लवकर मार्ग काढावा, अशी मी विनंती करते. नाही तर प्रत्येक नेता उठेल आणि आपापल्या बाजूने भाषण करेल व त्यामुळे समाजा-समाजामध्ये वितुष्ट निर्माण होईल, असे होऊ नये म्हणून माननीय उप मुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी लक्ष घालावे अशी पुन्हा विनंती करते व माझे भाषण पूर्ण करते.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, एका अतिशय गंभीर, प्रचंड वेदना देणाऱ्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होत आहे. वेदना अशासाठी होत आहेत की, आता भूमिपुत्र या शब्दाचा शब्दच्छल सुरू झालेला आहे. वेदना अशासाठी होत आहेत की, दंगलीमधील दोन्ही बाजूकडील समाज हा मराठी होता. घणसोली गावामध्ये मी सन 1977-78 मध्ये क्रिकेट खेळायला जात होतो. डोक्यावर एका विशिष्ट पध्दतीने रुमाल बांधून तेथे क्रिकेट खेळ खेळला जात असे. तेव्हा पासून मी या गावामध्ये सतत जात आहे. वाशी, कोपरखैराणे, घणसोली ही पूर्वी छोटी-छोटी गावे होती. परंतु, ज्यावेळी नवी मुंबईची स्थापना झाली, तेव्हा या गावातील स्थानिक लोकांची जमीन संपादित करण्यात आली. आता येथे आपले विचार मांडताना सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक इशारा दिला आहे. तो गंभीर आहे. त्याचा वेगळया पध्दतीने विचार माननीय गृहमंत्र्यांनी केला पाहिजे. ते सहजपणाने बोलून गेले की, या दंगलीचे लोण पसरत आहे. हे सत्य आहे. तेथील स्थानिक लोकांचा राग हा सिडको किंवा नवी मुंबई महापालिकेवर आहे. पण त्यांनी वडाचे तेल वांग्यावर काढले आहे. स्थानिक लोकांनी राग कोणावर काढायचा ? आज तेथील स्थानिक लोकांना त्यांच्या जमिनीच्या किंमती देखील मिळालेल्या नाहीत. आजही मला श्री.दि.बा.पाटील यांचे आंदोलन आठवते. श्री.दि.बा.पाटील यांच्या आंदोलनामुळे शेवटी काही शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळाला. आजही घणसोली गावात एखाद्याचे निधन झाले तरी त्याच्या अंत्ययात्रेसाठी 50 माणसेसुध्दा दिसत नाही ही बाब सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी निदर्शनास आणली आहे, ती अगदी बरोबर आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, दंगलीची बातमी ही वाऱ्यासारखी पसरते. त्याची सत्य-असत्यता पडताळून पाहण्याची सद्सदविवेकबुद्धी माणसाला राहत नाही. म्हणून ज्यावेळी एखादी छोटी घटना घडते त्यावेळी त्यावेळी मग स्वत:च्या मनामध्ये खदखदत असलेला राग शेवटी या ना त्या कारणाने बाहेर येतो. या खुदखदणाऱ्या असंतोषाला कधी खतपाणी घातले जात हे कळतच नाही. कोपरखैराणे, घणसोली, पनवेल, उरण येथे एका विशिष्ट समाजाचा वर्ग राहतो. या समाजावर अन्याय झाल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी इशारा दिलेला आहे. तो शासनाने गांभीर्याने घ्यावा. तो समाज प्रेमळ आहे. पण ज्यावेळी हा समाज भडकतो, त्यावेळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

त्याला कोणीही आवरू शकत नाही, किंबहुना त्याला आवरता येत नाही. या समाजाचे प्रेम मी अनुभवले आहे. घणसोली येथे असंतोष खदखदत असताना पोलीस काय करीत होते ? पोलिसांचा गुप्तचर विभाग काय करीत होता ? आगरी समाज ठाणे-पनवेल-रायगड परिसरामध्ये आहे. या समाजाला सहज सोडून चालणार नाही. दोन्ही समाजातील तरूणांना एकत्र आणून या प्रकरणी तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे. हा प्रकार वरच्यावर सोडून देता कामा नये. याचे कारण वर राख दिसत असली तरी आतमध्ये निखारा हा धुमसत असतो. तो निखारा पुन्हा पेटून उठला तर आवरता येणार नाही. येथे माथाडी कामगारांनी काही अतिक्रमण केलेले नाही. पण ज्या बाहेरच्या लोकांनी अतिक्रमण केले आहे, त्यांना 225 चौरस फुटाची जागा देण्यात आलेली आहे. अशाने भूमिपुत्रांवर अन्याय होतो. बाहेरून अतिक्रमण केलेली माणसे आज भूमिपुत्रांच्या डोक्यावर बसत आहे. याचे कारण आपणच त्यांना मताच्या जोगव्यासाठी डोक्यावर बसवत आहोत.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

नवी मुंबईतील तुर्भे या ठिकाणी अखंड झोपडपट्टी वसलेली आहे. त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर लोकसंख्या वाढलेली आहे. माझ्या मते हे केवळ निवडणुकींसाठी चाललेले असते. मी या चर्चेच्या निमित्ताने एवढेच सांगेन की, या घटनेचे केवळ मूळ शोधून चालणार नाही, तर त्यावर उपाय देखील करणे अत्यावश्यक आहे. आज त्या ठिकाणी दोन्ही समाजाला एकत्रित आणण्याची आवश्यकता आहे. मराठी माणसाचे रक्त मराठी माणसांकडूनच सांडते यापेक्षा दुसरी वेदना कोणती असू शकते ? घणसोली येथे घडलेल्या घटनेबाबत माहिती घेऊन, दुसरीकडे अशी घटना घडू नये यासाठी सतर्कता राखणे आवश्यक आहे. घणसोली गावामध्ये दंगल होण्याच्या अगोदरच्या दिवशी दोन्ही गटांच्या बैठका झाल्या. या बैठकींतून जे काही ठरले असेल ते मिटविण्याचा कोणी प्रयत्न केला काय ? तसे आदेश दिलेत काय ? संदेश दिला काय ? बैठकीमध्ये ठरल्यानुसार अंगावर आल्यानंतर शिंगावर घेतले गेले. वास्तविक पाहता हा ठराव अतिशय वेदनामय असा ठराव आहे. शासनाने या संपूर्ण प्रकरणी तातडीने कारवाई करावी असे मला वाटते. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी सुचविल्यानुसार जर मिडियाकडे या घटनेची सी.डी. असेल तर ती त्यांच्याकडून घ्यावी आणि या घटनेमागे ज्यांचे कोणाचे हात असतील ते हात रोखले पाहिजे. शेवटी पुन्हा एकदा दोन्ही समाजातील असंतोष तातडीने मिटविण्यासाठी योग्य प्रकारची कार्यवाही करण्यात यावी एवढीच विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, घणसोली गावामध्ये रंगपंचमीच्या दिवशी जी मारामारी झाली, त्या मारामारीचे पर्यावसान दुसऱ्याच दिवशी म्हणजे 16 मार्च रोजी दंगलीमध्ये झाले. काल जेव्हा सभागृह सुरु झाले तेव्हा औचित्त्याच्या मुद्याद्वारे ही गंभीर बाब शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा मी प्रयत्न केला आणि तेव्हाही गोळीबार सुरुच होता. परंतु दुसऱ्या एका मुद्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा सोलापूर येथे घडलेल्या घटनेबाबत सभागृहात शाब्दीक गोळीबार सुरु होता. सोलापूर जिल्हयात दलित महिलेला विवस्त्र करुन, तिची नग्न धिंड काढण्यात आली. परंतु ही बाब मला माहीत नव्हती. मी आपल्या माध्यमातून सदनाला सांगू इच्छितो की, सभागृहात येण्यापूर्वी जर ही बाब मला माहीत असती तर शासनाला नंगे करण्यासाठी या कवाडेने कधीही मागे-पुढे पाहिले नसते.

घणसोली येथे जी काही घटना घडली ती खरोखरच दुर्दैवी म्हणावी लागेल. शासनाच्या विषम भावनेमुळे, वर्तणुकीमुळे ही घटना घडली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जी भूमिका मांडली त्या भूमिकेशी मी सहमत आहे. घणसोली येथील वसाहतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना सर्वप्रकारच्या सुखसोयी मिळतात आणि मुळच्या ग्रामीण रहिवाशांकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयी सवलती दिल्या जात नाहीत, म्हणून त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण होत आहे. शासनाच्या चुकीमुळे एकाच समाजामध्ये अशा प्रकारचा असंतोष निर्माण होणे ही अतिशय चिंतनीय बाब आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी उल्लेख केला की, आपापसातील भांडणात माणूस मरतो आहे आणि बाकीचे लोक मजा पाहत आहेत. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, समाजामध्ये भांडण होत असले तरी, लोकशाहीत ज्यांच्या अंतकरणामध्ये माणुसकी आहे त्यांना ते वाईट वाटणारे आहे. मरणारा माणूस, लढणारा माणूस हा मरता कामा नये, लढता कामा नये. त्याला मरण्यापासून, लढण्यापासून कसे वाचविले पाहिजे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे आणि तो लोकशाहीचा प्राण आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

अमुक माणूस, तमुक माणूस या गोष्टी आता लांबच्या झालेल्या आहेत. यू.पी. चे लोक, बिहारी लोक या गोष्टींना आता काही एक अर्थ राहिलेला नाही. आपण माणुसकीची भाषा करता, संत तुकाराम महाराजांचे तत्वज्ञान सांगता आणि या ठिकाणी अशाप्रकारच्या गोष्टी घडत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, देवदेवता यांच्याविषयी काही अनुद्गार काढले तर आपण पेटून उठतो. माणुसकीचा गहिवर आपल्या सर्वांच्या मनात असतो. आपल्याला संतांची, थोर पुरुषांची शिकवण लाभलेली आहे. धर्माच्या, भाषेच्या, जातीच्या, समाजाच्या, माथाडींच्या, ग्रामस्थांच्या नावाखाली भांडणे लावण्याचे पध्दतशीर प्रयत्न सुरु आहेत. सभापती महोदय, या पाठीमागे कोणाचे कारस्थान आहे, हे शोधण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासनाने केला आहे का ? हा प्रयत्न महाराष्ट्र शासनाने, तसेच महाराष्ट्राच्या माननीय गृहमंत्र्यांनी केला पाहिजे. सभापती महोदय, अलिकडे आंदोलनाचे उत्तर लाठ्या, अश्रुधुरांऐवजी बंदुकीच्या गोळीने देण्याचे प्रकार सुरु आहेत. खऱ्या अर्थाने ही चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य आहे, असे आपण म्हणतो. जपानमध्ये, अमेरिकेमध्ये तसेच इतर राष्ट्रांमध्ये जेव्हा अशाप्रकारचे आंदोलन होते, तेथे न जुमानणारे आंदोलन होते, तेव्हा तेथे पाण्याचा मारा केला जातो, प्लास्टिकच्या, रबराच्या बंदुकीच्या गोळ्यांचा वापर केला जातो आणि आपल्या प्रगत राज्यामध्ये " थ्री नॉट थ्री " च्या गोळ्यांचा वापर करुन, माणसांचे मुडदे पाडण्याचा प्रयत्न केला जातो. अमरावतीमध्ये गोळीबार झाला, बीडमध्ये गोळीबार झाला. तसेच माण तालुक्यातही गोळीबार झाला. आपल्या नाकाखाली काल पोलिसांच्या गोळीबारात 3 लोक मृत्यूमुखी पडले व एकूण 70 लोक जखमी झाले. त्यात आणखी किती मरण पावले, हे मला आता सांगता येत नाही. 15 तारखेला जेव्हा अशा प्रकारची मारामारी झाली, तेव्हा ते वातावरण डिफ्युज करण्याचा प्रयत्न तेथील संबंधित नेते तर सोडाच, पण जे जबाबदार पोलीस स्टेशन आहे, त्यांनी केला का ? तेथील अधिकाऱ्यांनी काय केले, हा खरा प्रश्न आहे. सभापती महोदय, दंगल रोखण्याचा प्रयत्न त्या ठिकाणी झाला नाही. येथे बंदुकीच्या गोळ्या चालवुन पोलीस खात्याकडून मर्दानकी दाखविण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. पठाण यांनी हा गोळीबार करावयास सांगितला. सभापती महोदय, यामध्ये कोणता राजकीय स्वार्थ आहे, ते मला काही माहित नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

या प्रकरणामध्ये कोण कारस्थान करीत आहे, हे शोधण्याचे काम सरकारचे आहे. कोणाच्या कारस्थानामुळे येथील लोक बळी गेले, हे शासनाने शोधावयाचे आहे. अशी कारस्थाने उध्वस्त करण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. मी या सर्व गोष्टींकडे या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, ही दंगल संघटीतपणे झालेली आहे. या ठिकाणी अनेकांनी सांगितले की, मुंबईच्या पोलीस खात्याची वेगवेगळी गुन्हेगारी शोध यंत्रणा आहे. मग त्या यंत्रणेचा काय उपयोग आहे ? त्या कशाकरिता आहेत ? यावेळी त्याचा वापर का करण्यात आला नाही ? मला आश्चर्य या गोष्टीचे वाटते की, जेथे गोळीबार करायचा तेथे बंदुक पाठीमागे ठेवली जाते. सोलापूरच्या एका दलित महिलेला विवस्त्र करुन तिची गावातून तीन तास धिंड काढली. तेव्हा महाराष्ट्राचे पोलीस खाते बंदूक का चालवू शकले नाही ? महाराष्ट्रात दलित महिलेला विवस्त्र करण्यासारखा एवढा मोठा भयानक प्रसंग घडला, त्यावेळी अशा आरोपींवर गोळी झाडण्याची मर्दुमकी या पोलीस खात्याने का दाखविली नाही ? जेथे बंदूक चालवावयची तेथे चालवली जात नाही आणि जेथे गरज नाही तेथे बंदूक चालविली जाते. शूट ॲट साईटचा आदेश दिला जातो. सभापती महोदय, मुडदे पाडून दहशत निर्माण करण्याचा अशाप्रकारे जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

प्रा. जोगेंद्र कवाडे....

सभापती महोदय, गोळीबार कशासाठी करावयाचा ? लाठीमार कशासाठी करावयाचा ? अश्रुधूर कशासाठी करावयाचा ? यांचे उत्तर असे आहे की, दंगल घडू नये म्हणून जमाव पांगविण्यासाठी हया बाबींचा उपयोग करावयाचा असतो. परंतु या दंगलीमध्ये जमाव पांगविण्यासाठी गोळीबार करण्यात आलेला नाही तर ठार करण्यासाठी जाणूनबुजून येथे गोळीबाराचा वापर करण्यात आलेला आहे. काही लोकांना ठार करुन दहशत निर्माण करण्यासाठी येथे गोळीबार करण्यात आलेला आहे. यातून पोलिसांचे अंतरंग कसे आहे ते दिसून येत आहे या राज्याची स्टेट टेररिझम थेअरी कशी आहे हे दिसून येते. पोलिसांचा स्टेट टेररिझम यातून दिसून येत आहे. या अंतरंगातून लोकांवर दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. या प्रश्नांमध्ये अनेक बाबी गुंतलेल्या आहेत. या प्रकरणामध्ये आमचे सरकारने विशेषत: आमच्या गृहमंत्री महोदयांनी या राज्यामध्ये चांगल्या प्रकारचे निर्णय घेण्याची जी पंरपरा निर्माण केलेली आहे मी त्यांच्याकडून एवढी अपेक्षा निश्चित करेन की, या प्रकरणाची नि:पक्षपातीपणे चौकशी व्हावी, गोळीबार करण्याची गरज होती काय ? यासंदर्भातील चौकशी झाली पाहिजे. जे कोणी या दंगलीस जबाबदार असतील त्यांना हुडकुन काढून मग ते कोणत्याही पक्षाचे असोत, कोणतेही नेते असोत त्यांना परत असे करण्याची संधी मिळणार नाही याची दक्षता त्यांनी घ्यावी. तसेच या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी अशी मी मागणी करुन माझे दोन शब्द संपवितो.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, घणसोली येथे जी दंगल झाली त्यासंदर्भात येथे चर्चा उपस्थित झालेली आहे. सभागृहाच्या माध्यमातून या चर्चेमधून विविध मुद्दे महाराष्ट्राच्या नजरेस आलेले आहेत. राष्ट्रवादी पक्षाने काय केले, किंवा कोणी काय केले, यावर चर्चा न करता जे मेले ते का गेले, ही घटना का घडली, काय झाले यावर चर्चा केली असती तर अधिक संयुक्तिक झाले असते असे मला वाटते. आज जगामध्ये अशा अनेक घटना घडत आहेत, यामध्ये मुख्यत्वे करुन आर्थिक संबंध असतात, आर्थिक नाकेबंदी असते, आपण मागील पाच हजार वर्षापूर्वीचा जगाचा इतिहास पाहिला तर युध्द होण्याची कारणे काय होती ? त्यात प्रामुख्याने जमिनीच्या तुकडयावरुन वाद, आर्थिक नाकेबंदी झाली, तर काही वाद हे धार्मिक कारणावरुन झालेले आहेत. मला वाटते पुरोगामी महाराष्ट्रामध्ये एवढी मोठी दंगल यापूर्वी कधीही झालेली नव्हती. कारण मोकळे मैदान त्यामध्ये 10-15 पोलिस व एका बाजूला 2-3 हजार लोक व दुसऱ्या बाजूला 2-3 हजार लोक असे असतांना सन्माननीय प्रा. कवाडे साहेब पोलीस काय करणार ? पोलीस सुध्दा शेवटी माणूस आहे ना ? आपण स्टेट टेररिझम थेअरीचा उल्लेख केला. परंतु एवढया मोठया मॉब सायकॉलॉजीसमोर पोलीस काय करु शकणार ? मॉब सायकॉलॉजीचा विचार करीत असतांना सामाजिक कारणांमुळे हा लढा झालेला आहे. सामाजिक करणाकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली या परिसरामध्ये कोळी, ठाकूर, भंडारी व कुणबी यांची संख्या जास्त आहे, खऱ्या अर्थाने हा पठारी प्रदेश आहे त्यांच्या जमिनी मुंबईमध्ये वाटल्या गेलेल्या आहेत मुंबईमध्ये ते सुप्रिम झालेले आहेत.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड ....

घणसोली गाव आणि माथाडी कामगारांच्या सिंप्लेक्स वसाहतीमध्ये फार जास्त अंतर नाही. ज्या प्रकारे गावठाण आहे, त्याच प्रकारची सिंप्लेक्स वसाहत आहे. दोन गरीब समूहाची माणसे भांडतात ही वाईट वाटण्याजोगी परिस्थिती आहे. या सर्वांकडे सुक्ष्म नजरेने बघितल्यास असे लक्षात येईल की, ऑल इंडिया आसाम स्टुडंट युनियनच्या विद्यार्थ्यांनी सुरु केलेले आंदोलन अशाच प्रकारच्या एका ठिणगीतून सुरु झाले होते. अशाच प्रकारचा वाद आसाम राज्यात स्थित असलेल्या गोहाटीपासून 56 कि.मी. वर असलेल्या एका छोटया गावामध्ये सुरु झाला होता व त्यानंतर तेथे कोणत्या प्रकारची परिस्थिती निर्माण झाली हे माननीय गृह मंत्र्यांनी तपासून पहावे. याच दृष्टीकोनातून आपण सर्वांनी या संपूर्ण प्रकरणाकडे पाहण्याची आवश्यकता आहे. थोडया वेळापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी असे सांगितले की, अशाच प्रकारे दंगलीचे लोण ऊरण तसेच पनवेलपर्यंत पोहचेल अशी परिस्थिती आहे. ही गावठाणे थोडीशी उपेक्षित राहिलेली आहेत, लोकांकडे पैसा येत गेला, आपली मुले गाडया-घोडयांमध्ये रमली, शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. गव्हाणपाडा नावाच्या एका गावठाणामध्ये एका शेतक-याच्या शेतामध्ये त्यांचे देऊळ आहे. सन 1970 सालानंतर त्या शेतक-याने जमीन विकल्यानंतर, त्या ठिकाणी सहकारी गृहनिर्माण सोसायटया निर्माण झाल्या आहेत. 100 वर्षांपासून गावाकडून देवळाकडे जाणारा रस्ता ही त्या गावक-यांची वहिवाट आहे. सोसायटीतील एका महाभागाने या जमिनीवर सोसायटी झालेली असल्यामुळे या जमिनीवर आमचा हक्क असल्यामुळे ही वहिवाट बंद करण्यात यावी, अशाप्रकारचे ऑबजेक्शन घेतले. गव्हाणपाडा गावठाणात माझे स्वत:चे बालपण गेलेले असल्यामुळे परवाच मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन परिस्थिती पाहिली असता, गावाकडून देवळाकडे जाणारा रस्ता बंद केल्यास गावक-यांना 3 कि.मी. चा फेरफटका मारुन देवळात जावे लागेल अशी परिस्थिती होती. याबाबत मी सोसायटीतील काही लोकांना विनंती केली की, आपल्या इमारती त्यांच्याच जमिनीवर आपण उभ्या राहिलेल्या आहेत, आपण हा वाद का वाढवता ? परंतु सोसायटीमध्ये राहणारी माणसे मंत्रालयात काम करणारी असल्याने ताकदवर असल्यामुळे त्यांनी हा मुद्दा खूप प्रतिष्ठेचा केला व सर्व गोष्टींचा वापर करुन त्या ठिकाणी एक भिंत उभी केली. त्या गावातील 200 ते 250 महिलांनी रात्रीच्या वेळी ही भिंत तोडून टाकली. त्यावेळी गावक-यांची वहिवाट बंद करता येत नाही, हा साधा सामाजिक नियम पोलिसांनी लावला असता तर ही परिस्थिती टाळता आली असती. शेवटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड ....

कुठल्याही फिलॉसॉफीचा मूळ गाभा यामध्येच आहे. शेवटी ज्यावेळी युध्दसदृश परिस्थिती निर्माण होते, जे काही भेदभाव होतात त्यामागे मुख्यत: अर्थकारण असते. माझी जमीन विकल्यानंतर त्या जमिनीवर 20 वर्षांनी जर एखादा बंगला उभा राहिला तर त्या व्यक्तीच्या मनात कायमची खंत राहते, ही माझी जमीन होती, मी तेथेच राहिलो, तरी सुध्दा मी अजूनही रिक्षा चालवतो व तो गाडीतून फिरत आहे, हा माणसाचा स्थायी स्वभाव आहे. तो आपण बदलू शकत नाही. यातून पुढे जे काही घडते ते अगदी विचित्र व भयंकर असते. याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे हे मी या ठिकाणी प्रामाणिकपणे सांगू इच्छितो. एक काळ असा होता की, नवी मुंबईतील माणूस असो किंवा ठाण्यातील माणूस असो, त्यांना ठाणे-बेलापूर पट्टीचा आधार होता, ठाण्याच्या एमआयडीसीचा आधार होता. मी या ठिकाणी अर्थकारणाबाबत बोलत असून मुख्यत: ठाण्यातील बंद पडलेले उद्योग हे सुध्दा या मागील कारण असू शकेल याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी माथाडी कामगार गाव सोडून का आलेत ? कोणाला आपले गाव सोडून या ठिकाणी येण्याची हौस आहे काय ? पाठीवर 100-200 किलोच्या गोण्या उचलायच्या, संध्याकाळी नव्या मुंबईला कधी घरी पोहचणार व कुटुंबासमवेत कधी राहणार ? परंतु परिस्थिती माणसाला वाकवते. गावामध्ये स्वत:ची एखादी एकर कोरडवाहू जमीन असेल तर काय करणार ? त्यामुळे माथाडी कामगार या ठिकाणी येऊन मेहनत करतो व आपल्या घरकुलाचे स्वप्न पाहतो. परंतु अशा प्रकारचे स्वप्न प्रत्येक माणूसच पहात असतो. अशाप्रकारे स्वप्न पाहून तो नव्या मुंबईला आला व स्थायिक झाला. उद्योगधंद्याच्या निमित्ताने मुंबईमध्ये आलेली ही मूळची मराठी माणसे परिस्थितीमुळे या ठिकाणी आली आहेत, असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. जर मला कोणी नाशिकला तुझ्या गावी तुला 20 एकर शेती देतो असे सांगितल्यास मी तेथे आनंदाने जाईन. 100 वर्षांपूर्वी माझ या आजोबांनी एका एकराच्या कोरडवाहू शेतीमध्ये कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा ? म्हणून मुंबई सेंट्रलला हमाली करण्यासाठी आले. तशाच प्रकारे ही मराठी माणसे मुंबईत आली आहेत. परंतु जेव्हा अर्थकारण बदलते, सामाजिक संदर्भ बदलायला लागतात, तेव्हा अशी परिस्थिती निर्माण होते. आज कुठे आहे कॅफी कंपनी, कुठे आहे ए.सी.सी. कंपनी, कुठे आहे कॅडबरीज कंपनी, कुठे आहे जे.के. कंपनी ?

(यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

सगळे कारखाने बंद पडत चालले आहे. मग पुढची पिढी जाणार कोठे ? मग जी वैफल्यग्रस्ततेची भावना निर्माण होते त्यातूनही हे प्रकार होऊ शकतात. तेव्हा त्याकडे सूक्ष्मपणे पाहण्याची गरज आहे. त्यामध्ये कृपा करून कोणी राजकीय रंग घालण्याचा प्रयत्न करू नये असे मला वाटते. आज हा प्रकार घणसोली पुरता मर्यादित रहावा अशी प्रार्थना आपण परमेश्वराजवळ करू या. परंतु हा प्रकार वाढत गेला तर उद्या पुरोगामी महाराष्ट्राचा एवढा मोठा पराभव नजिकच्या काळामध्ये झालेला असेल की ज्याची आपण कधी कल्पनाही केली नसेल. या प्रकारामध्ये पोलीस दलाचे फेल्यूअर मोठ्या प्रमाणात आहे असे माझेही मत आहे. कारण समोरच्या बाजूला दगड-विटा, लाठ्या-काठ्या आणि इतर सर्व हत्यारे घेऊन लोक तयार होते. एका रात्रीमध्ये काही ही एवढी तयारी होत नाही. कारण साधा 100 जणांचा जमाव जमविण्यासाठी देखील फोनाफोनी करूनही तीन तास लागतात. म्हणूनच मी म्हणतो की, या सगळ्या गोष्टींकडे आपण अगदी सूक्ष्म नजरेने पाहणे आवश्यक आहे. यामध्ये कोण कोणाचा काय लागतो वगैरे सर्व विचार बाजूला ठेवावेत. गेली 40 वर्षे नव्या मुंबईचे ज्या एकीने राजकारण नव्हे तर समाजकारण झाले त्या नव्या मुंबईच्या जडण घडणीमध्ये माथाडींचा तेवढाच वाटा आहे. मुंबईच्या जडणघडणीमध्ये देखील माथाडींचा खूप मोठा वाटा आहे. आज त्यांचे एकत्रित येणे हे धोकादायक वाटत असले तरी ते घडणारच होते. 40 वर्षापूर्वी आलेली ही माणसे .. मी आपल्याला सांगू इच्छितो की, तुम्ही एकदा संधी मिळाली तर तेथे जाऊन पहा. त्यांचे नेते कै. आण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथीचा जो कार्यक्रम तेथे केला जातो तो अगदी दिवाळीसारखा ते साजरा करतात. एवढी भक्ती त्या माणसाच्या चरणी ते अर्पण करतात त्यावरून आपल्याला कळते की, हे माथाडी किती एक आहेत ते. आगरी आणि माथाडी हे दोघेही श्रम करणारेच आहेत आणि असे हे दोघे जेव्हा एकमेकांना अशा प्रकारे भिडतात ती गोष्ट केव्हाही आपल्या राज्याच्या, आपल्या समाजाच्या हितावह नाही. त्यावर वेळीच उपाय योजना आपण करायला पाहिजे. अन्यथा हे वितुष्ट महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये पोहोचले नाही तरी मुंबईला यातून धोका निर्माण होईल आणि पर्यायाने महाराष्ट्रालाही ते धोकादायक आहे., ते ओळखून महाराष्ट्राने पावले उचलावीत. यातून जे काही सामाजिक वगैरे संदर्भ निर्माण होतील ते ओळखून सरकारने पावले उचलावीत आणि महाराष्ट्राला या गर्तेतून बाहेर काढावे एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

**** .....3जी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अत्यंत दुर्दैवी असा हा प्रकार आहे. या ठिकाणी अत्यंत खेदाने सांगावेसे वाटते की, काल घणसोलीला जी दंगल उसळली त्यामध्ये सत्तारूढ पक्षाचेच लोकप्रतिनिधी होते. शासनाने यामध्ये वेळीच हस्तक्षेप केला असता तर ही दंगल पुढे वाढू शकली नसती आणि जी काही प्राणहानी झाली आहे ती देखील टळली असती. सभापती महोदय, काल या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांनी या संदर्भात औचित्त्याचा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळीही तेथे दंगल सुरूच होती. दुपारच्या वेळी एका महिलेला, मुलीला रंग लावण्यावरून ही दंगल उसळली आणि रात्री ती अधिक मोठ्या प्रमाणत वाढली. मध्यंतरीच्या 4-5 तासामध्ये पोलिसांनी या घटनेकडे पाहिजे तितक्या गांभीर्याने पाहिले नाही. तेथे स्थानिक आणि माथाडी असा वाद होणे केव्हाही बरोबर नाही. आपल्या देशाची भाषावार प्रांतरचना झालेली आहे. महाराष्ट्रात राहणारा तो मराठी आणि गुजरात मध्ये राहणारा तो गुजराथी असे आपण मानतो. महाराष्ट्र हा मराठ्यांचा महाराष्ट्र असे आपण म्हणतो. त्यामुळे स्थानिक हा महत्त्वाचा असतोच. स्थानिकांना न्याय देण्यासाठी गेली 40 वर्षे शिवसेनेने काम केलेले आहे. आपल्याला अरब आणि त्याचा उंट ही गोष्ट माहीत असेलच. अरब तंबू मध्ये रहात असतो आणि त्याचा उंट तंबूच्या बाहेर. एक दिवस अरबाला उंटाची दया येते म्हणून तो उंटाला आपल्या तंबूमध्ये जागा देतो. हळूहळू उंट त्या तंबूमध्ये आपला पसारा इतका पसरवितो की, शेवटी अरबाला त्या तंबूमध्ये जागाच रहात नाही आणि त्याला बाहेर रहावे लागते. त्यामुळे तेथे स्थानिकांची अशीच परिस्थिती आहे जी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितली. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... 3एच 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अनंत तरे...

आज शासनाने काय केले आहे? शासनाने 1972 सालापासून आगरी व कोळी बांधवाच्या जमिनी घेतल्या. त्यांचा आज सुध्दा साडे बारा टक्क्याचा प्रश्न प्रलंबित आहे. मागील वेळी त्या ठिकाणी आगरी-कोळी बांधवाचा महोत्सव झाला. त्याकरीता घेण्यात आलेल्या मैदानाचे भाडे 1 लाख 12 हजार रुपये त्यांना भरावे लागले. त्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्यावर टोलेजंग इमारती, कमर्शिअल कॉम्प्लेक्स उभे राहिले. परंतु त्यांच्या सांस्कृतिक कामासाठी घ्याव्या लागणाऱ्या मैदानाच्या भाडयामध्ये सूट मिळत नाही. आज दिघी पासून ते बेलापूर पट्टीपर्यंतच्या गावठाणांमध्ये घर बांधण्यासाठी महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये तरतूद नाही. महानगरपालिकेचे अधिकारी, शासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी गावठाणाची जमीन आहे असे सांगतात. तेव्हा गावठाणाच्या जमिनीचे काय करायचे याचे ज्ञान त्या लोकांना नाही. हे काम करावयाचे असेल तर ते कायद्याने होणार नाही परंतु "काय द्या"ने होते. अशा परिस्थितीत दिघीपासून बेलापूर पट्टीपर्यंत गावठाणांमध्ये घर बांधण्यासाठी त्यांना परवानगी मिळत नाही.

सभापती महोदय, सिंप्लेक्स संकुलाच्या बाजूला जी दंगल झाली, मुळात हे संकुल त्या ठिकाणी खेळाच्या मैदानासाठी राखून ठेवण्यात आलेल्या जमिनीवर बांधण्यात आले आहे. त्या ठिकाणी बाहेरच्या लोकांनी येऊ नये असा हेतू आमच्या मनामध्ये नाही. परंतु स्थानिक माणसांना सुध्दा आपण जगू दिले पाहिजे. आज तेथील स्थानिक माणसांना त्या ठिकाणी सुरु असलेल्या उद्योगधंद्यामध्ये नोकरी मिळत नाही, त्यांना धंदा करण्यासाठी वाव मिळत नाही. त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये तीन-तीन दिवस खेटे मारावे लागतात. दाखला मिळण्यासाठी त्यांच्याकडून 5-5 हजार रुपये घेतले जातात. मागील वेळेस एका तहसिलदाराला प्रकल्पग्रस्ताकडून लाच घेतांना पकडले त्यासंबंधीचा तारांकित प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला होता. अशावेळी स्थानिक माणसांनी किती सहन करायचे? देशाची एकता व अखंडता राखण्यासाठी स्थानिक माणसांना आपण महत्व दिले पाहिजे. आपल्याला माननीय श्री. कृपाशंकरसिंह हे मुख्यमंत्री झाले तर चालतील काय? उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातील व्यक्ती मुख्यमंत्री झाली तर चालेल काय? आम्हाला या ठिकाणी माननीय श्री. जोगेंद्र कवाडे चालतील, माननीय श्री. सिध्दाराम म्हेत्रे चालतील. या ठिकाणी भाषावार प्रांतरचना झाली असल्यामुळे कोणताही माणूस कुठेही जावू शकतो. परंतु त्या माणसाला काही महत्व आहे की नाही? त्या ठिकाणी असलेली संपूर्ण शेतजमीन ही औद्योगिक पट्टयासाठी देण्यात आली आहे. 1972

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

सालापासून सिडकोने तेथील स्थानिक माणसांचा कोणत्याही प्रकारे विकास केला नाही. त्यांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात येईल असे सांगितले जाते. परंतु त्यांच्या अटी व शर्तीमध्ये स्थानिक माणूस बसू शकत नाही. त्याकरीता त्यांचे असलेले निकष शिथिल करण्याबाबत वारंवार प्रयत्न करुनही निकष शिथिल करण्यात आले नाहीत. त्यामुळे त्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे त्याठिकाणी भावनेचा उद्रेक झालेला आहे. हे सभागृह चालू असतांना औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन सभागृहाला ही माहिती देण्यात आल्यानंतर माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्या ठिकाणी जाण्याची आवश्यकता होती. सभापती महोदय, अमरावती, भिवंडी व माण येथे गोळीबार करण्यात आला त्यावेळी पोलीस त्याठिकाणी आक्रमक झाले होते. श्री. अमर जाधव हे अलिबागला डी.वाय.एस.पी. होते. ते आज नवी मुंबई येथे उपायुक्त आहेत. युती सरकारच्या काळात पेणमध्ये या माणसाने केलेल्या गोळीबारामध्ये दोन माणसे मृत्यूमुखी पडली होती. हे श्री. अमर जाधव भिवंडीमध्ये असतांना त्या ठिकाणी गणेशोत्सवाच्या काळात दंगल उद्‌भवली होती. त्यामुळे श्री. अमर जाधव यांचा इतिहास आपणास माहीत आहे. त्या ठिकाणी गोळीबार करण्यापूर्वी मोठया प्रमाणात अश्रूधूर सोडला असता, पाण्याचा फवारा मारला असता तर जमाव पांगला असता व आपल्याला शांतता प्रस्थापित करता आली असती. परंतु महाराष्ट्रात कुठेही मोर्चा आल्यानंतर पोलीस घटनास्थळी तात्काळ धावून जातात. याठिकाणी दोन्ही बाजूला जमाव जमला असतांना पोलीसांची संख्या अत्यंत कमी होती, हे पोलीस कुठे होते? ज्यावेळी जमाव जमतो त्यावेळी रॅपिड ॲक्शन फोर्सला पाचारण करण्यात येते, ते कुठे होते? तुमचे पोलीस आयुक्त काय करीत होते? त्याठिकाणी पाच-सहा तास दोन्ही विभागातील नेते मंडळी होती, त्यांनी एकत्र बसून ही दंगल शांत करण्याचा प्रयत्न केला काय?

(यानंतर श्री. किल्लेदार.....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अ□म तरे (पुढे चालू...

सभापती महोदय, त्या ठि□ठी शास□□ □यायाची भूमि□ घे□याची □रज आहे असे मला वाटते. आज पोलीस □त्यामध्ये हस्त□प वाढलेला आहे, तो □मी □र□याची □रज आहे. आज आमदारां□ फो□ □ला □, ठी□ आहे, तसे □र□यात येईल असे सां□□ पोलिसां□ आदेश दिले जातात. पोलिसां□ त्यांचे □म □र□यापासू□ वंचित ठेवले जाते, हे बरोबर □ही. हा जो प्र□र घडलेला आहे, त्यामध्ये माझ्या प□चे सर□र आहे,म□ मला □य हो□र आहे ? या भाव□तू□ दं□ल घडवि□यात आलेली आहे. या दंगलीमध्ये वित्त आ□ मु□ष्य हा□ झालेली आहे. दंगल घडतांना जातीने □ही लो□ठी ती पाहिलेली आहे. पोलिसां□ वेळीच हस्त□प □ला असता तर पुढे □ळीबार □रावा ला□ला □सता. स□मा□□य सदस्य श्री.जयंत पाटील यां□ त्या भा□मध्ये आ□री आ□ □ळी समाजाचे लो□ रहातात, त्यांच्यावर अ□याय होत आहे,असे सां□□ले. माथाडी □म□र आ□ स्था□□ लो□ यांच्यामध्ये दं□ल झाली. ती दं□ल ए□ दिवसामध्ये झालेली □ही तर यापूर्वी □ही □ष्टी घडलेल्या आहेत. स□मा□□य सदस्य ॲड.अ□म परब यां□ सां□□ल्याप्रमा□ यापुढे दं□ल होऊ □ये म्हू□ □:प□पातीप□□ या दंगलीची न्यायालयीन चौ□शी □र□याची आवश्यकता आहे. अशाप्र□रच्या दं□ली घडत असतां□ पोलिसां□ विविध प्र□रचे इन्स्ट्रक्शन्स दिलेल्या आहेत. पोलिसां□ □:प□पातीप□□ □रवाई □ली असती तर अशाप्र□रच्या दं□ल उसळली □सती. लो□ठी बदडू□ □ढा, मारा अशाप्र□रचे आदेश □ठी दिले, त्याची चौ□शी झाली पाहिजे. त्या ठि□ठी स्था□□ लो□चा झो□ आहे, याचा □धीच विचार □ला □लेला □ही. बाहेरचे पर□ □ठी तरी येतात, त्यामुळे स्था□□ लो□वर अ□याय हातो. यातू□ दं□लीसार□ उद्रे□ झालेला आहे. आता दे□ील □:प□पातीप□□ चौ□शी हो□यासाठी शास□□ □यायालयी□ चौ□शीचे आदेश द्यावेत. त्यामध्ये जे □ठी दोषी असतील त्याच्यावर जरुर □रवाई □रावी. अशाप्र□रची दं□ल पुढे होऊ □ये, तसेच स्था□□ लो□वर अ□याय होऊ □ये, याची शास□□ □ळजी घ्यावी, अशाप्र□रची वि□ती □रतो आ□ माझे बोल□ संपवितो.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशन संबंधी</u>

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आजचे अशासकीय कामकाज चर्चेला घेतले जाणार आहे काय ?

तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत) : याबाबत अशासकीय कामकाज होणार नाही.

श्री.अजित तरे : आजचे अशासकीय कामकाज केव्हा घेण्यात येणार आहे ?

तालिका सभापती : ते पुढच्या आठवड्यामध्ये होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

पृ.शी. : नवी मुंबई, घणसोली येथे दिनांक 16 मार्च 2006 रोजी झालेली दंगल.

मु.शी: "नवी मुंबई, घणसोली येथे दिनांक 16 मार्च 2006 रोजी झालेली दंगल", या विषयावर सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार,नितीन गडकरी, दिवाकर रावते, अरविंद सावंत,विनोद तावडे, मधु चव्हाण, श्रीमती कांता नलावडे, श्री.प्रकाश शेंडगे, डॉ. नीलम गोऱ्हे,श्री.अनंत तरे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा (पुढे सुरु.....

श्रीमती □ता □लावडे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, होळीसार□या रं□च्या स□मध्ये आपल्या शत्रुलाही रं□ लावू□ मित्रत्वाची भाव□ □र्मा□ □रतो. परंतु □ी मुंबईमधील घ□सोली या □वामध्ये होळीच्या रं□च्या दिवशी दैवदुर्विलासा□ दं□ल उसळली. ए□ मुलीला रं□ लावला, तिची छेडछाड □ली म्ह□ू□ □मस्थ आ□ माथाडी □म□र यांच्यामध्ये दं□ल झाली. मला असे वाटते □, हे सां□□यासाठी म्हणून □र□ दिले आहे. प्रसं□ □हा तरी दो□ही समाजामध्ये छोट्या-मोठ्या □ष्टींवरु□ वाद होत होते. मुलीला रं□ लाव□ तिची छेडछाड □र□ हे □□मित्त झालेले आहे. आताही त्या ठि□□ □ीर परिस्थिती आहे. आताच □ी मुंबईतील पोलीस □मिश□रांचा फो□ आला होता □, आजुबाजूच्या स□ळया □वांमधील लो□ जमा झालेले आहेत. □ी मुंबई बंद □लेली आहे. □□लाही रस्त्यावर येऊ दिले जात □ही. आसपासच्या □वातील लो□ जमलेले आहेत. अजू□ही त्यामधू□ □ीर अशाप्र□रची घट□ होऊ श□ते. □रे म्ह□जे पोलिसां□ यावर □यंत्र□ □र□यामध्ये अपयश आलेले आहे.

या□र श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

या ठिकाणी आपल्याला खरोखरच असे वाटत असेल की, निरपराध लोकांचा बळी जाऊ नये, आपापसात असे वाद निर्माण होऊ नयेत, त्या ठिकाणी अशांतता निर्माण होऊ नये तर ज्याला आपण समन्वय म्हणतो तो समन्वय त्या ठिकाणी घडवून आणला पाहिजे. सत्तारुढ पक्षाच्या दोन गटांचे दोन नेते त्या ठिकाणी आहेत आणि त्यामुळे सत्तारुढ पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी किंवा मंत्रिमहोदयांनी त्या दोन नेत्यांना जर समोर बसवून दोघांनाही सांगितले आणि जर समन्वय साधला तर ही दंगल किंवा जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे ती आटोक्यात येऊ शकते. पोलीस यामध्ये कितपत पुरे पडतील याबद्दल शंका वाटते. त्यांनी गोळीबार का केला ? त्यांनी अश्रुधूर का सोडला नाही ? त्यांनी लाठीचार्ज का केला नाही ? हे प्रश्न शासन त्यांना विचारील. आताची गंभीर परिस्थिती हाताळण्यासाठी दोन नेत्यांना समोर बसवून समन्वय साधून दोन्ही नेत्यांना आपापल्या समुहातील लोकांना शांत करण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. घणसोलीच्या दंगलीच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी यासंबंधी भरपूर चर्चा केलेली आहे. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. आपल्याच लोकांच्या सरणावर राजकीय पोळी भाजण्याचे कृत्य त्या ठिकाणी राजकीय पुढारी करीत आहेत. त्यांना समज देण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावेसे वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गेल्या एक महिन्यातील हा तिसरा गोळीबार आहे. या ठिकाणी जे मुद्दे मांडावयाचे राहिलेले आहेत तेवढे नवीन मुद्दे मी मांडणार आहे. पहिला प्रश्न असा उपस्थित करावासा वाटतो की, जसे आपण हा लोकांचा एकमेकातील संघर्ष असल्याचे म्हणतो तसे दुसरीकडे सगळ्या लोकांनी मिळून पोलिसांच्या विरोधात उभे केलेले युध्द आहे असे दिसते. जणू काही हे पोलीस या स्वतंत्र भारतातील आणि महाराष्ट्र राज्यातील आहेत आणि या पोलिसांकडून आपल्याला न्याय मिळू शकेल यासंदर्भातील कोणताही विश्वास कोणत्याही लोकांच्या मनामध्ये राहिलेला नाही. लोक कायदा हातामध्ये घेतात असे आपण म्हणतो. लोक उत्स्फुर्तपणे कायदा हातामध्ये घेतात असे नाही तर अनेक ठिकाणी लोक स्वत:ची व्यूहरचना ठरवून कायदा हातामध्ये घेतात. मागे पुणे जिल्ह्यामध्ये माण येथे गोळीबार झाला. त्या ठिकाणी लोकांनी ठरविले होते की, पोलीस दिसला की, त्याला गोफणीतून दगड मारावयाचे आणि त्यासाठी ते गोफण घेऊन बसले होते. श्री. व्ही.पी.सिंग सारख्या झेड सिक्युरिटी असलेल्या लोकांना ते लोक सोडण्यास तयार नव्हते. या ठिकाणी दोन्हीकडील लोकांना असे वाटत असेल की, आमचे पोलीस न्यायाची बाजू घेणार नाहीत. पोलीस कोठे तरी दबावामुळे किंवा अन्य काही कारणामुळे त्यांना पाहिजे त्या पध्दतीने लोकांना चिरडणार असा जो संदेश अशा घटनांमधून सगळीकडे जातो त्यातून पुढच्या काळामध्ये आंदोलने जास्तीत जास्त हिंसक बनत जातील असा धोका निर्माण झालेला आहे. ही बाब महत्वाची आहे. या घटनेमध्ये एका मुलीवरुन दंगल सुरु झाली असे जे समोर येत आहे ही अतिशय खेदाची, दुर्दैवाची आणि संतापजनक बाब आहे. एका मुलीवर अशा पध्दतीने मवालीपणाने रंग फासण्याचा प्रकार झाला. त्यामुळे वेगवेगळ्या लोकांमध्ये हितसंबंध उभे राहिले. मी सुरुवातीपासून सर्व भाषणे ऐकत आहे. या ठिकाणी असे सांगितले जाते की, दोन्ही गटांना बरोबर घ्या, दोन्ही लोकांना बरोबर घ्या. म्हणजे सगळी नवी मुंबई या दोन गटांना आपण आंदण दिली आहे आणि त्या ठिकाणी दोन लोकांना दोन टोल नाके देऊन नवी मुंबई वाटून द्या असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? जेवढी सरकारची आणि माननीय गृहमंत्र्यांची जबाबदारी आहे तेवढीच जबाबदारी पालकमंत्र्यांची सुध्दा आहे. ज्या ज्या ठिकाणी लोकांचे पुनर्वसन झाले नाही, लोकांसाठी सांडपाण्याची व्यवस्था झाली नाही त्या त्या ठिकाणी अशा पध्दतीच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

हितसंबंधांवरुन निर्माण झालेले संघर्ष ज्यावेळी दडपले जातात त्याचा कधी तरी स्फोट होत असतो. त्या ठिकाणी श्री. नरेंद्र पाटील यांच्या अंगरक्षकावर हल्ला झाला आणि त्यामध्ये तो मारला गेला. त्यानंतर कोणते आरोपी पकडले गेले आणि ते आरोपी कोण आहेत ? त्या आरोपींना सोडविण्यासाठी जामीन देण्याकरिता कोण आले ? ते आरोपी त्या ठिकाणी कधी जमा झाले ? त्यांच्याकडे शस्त्रे कोठून आली ? दंगल होऊन दोन तीन दिवस झाले तरी संपूर्ण माहिती का आली नाही हा प्रश्न पडतो. स्थानिक पातळीवरील लोकांचे म्हणणे दैनिक लोकमत सारख्या वर्तमानपत्रामध्ये आले. जे दैनिक त्यांच्या भूमिकेबद्दल प्रसिध्द आहे त्यामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, पोलिसांच्या मदतीने 150 लोकांचा जमाव हल्ला करण्यासाठी आला.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे पुढे सुरु...)

कायद्याचे संरक्षक म्हणून पोलीस आपली भूमिका बजावतात असे मी समजत होते. परंतु या घटनेच्या संदर्भात तेथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पठाण यांचा उल्लेख होतो. त्यांच्यावर कोण्ती कारवाई झालेली आहे ? याठिकाणी माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. हजारो लोक तेथे कोठून आले ? त्यांना कोठून मॅसेज देण्यात आला ?तेथील माथाडी कामगार, प्रकल्पग्रस्त, भूमिपूत्र या सगळयांची नाळ मराठी मातीशी आहे. त्या हल्ल्यामध्ये माथाडी कामगारांचा नेता श्री. नरेंद्र पाटील यांचा अंगरक्षक मारला गेला. त्याठिकाणी त्यांचा अंगरक्षक नसता तर श्री. पाटील हे देखील मारले गेले असते. सभापती महोदय, दुसरे श्री. शशिकांत शिंदे हे देखील माथाडी कामगारांचे नेते आहेत. सातारा जिल्ह्यामध्ये त्यांच्या संबंधी अतिशय वाईट रिपोर्ट आहे. मी या सदनामध्ये लक्षवेधी देखील विचारलेली होती. श्री. वसंत मानकुमरे हे सातारा जिल्हयाचे जिल्हा प्रमुख होते. त्यावेळी त्यांच्यावर देखील शस्त्रानिशी हल्ला झाला होता. अशा त-हेने हातामध्ये शस्त्रे घेऊन धाकदपटशा निर्माण करणे ही श्री. शशिकांत शिंदे यांची कार्यपध्दती आहे. सभापती महोदय, केवळ माथाडी कामगारांपुरती ही घटना मर्यादित नाही. मला 1993ची दंगल आठवते. ज्यावेळी माथाडी कामगारांवर हल्ला झाला त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता. भूमिपुत्रांचा प्रश्न देखील याठिकाणी उपस्थित करण्यात आला. भूमिपुत्रांना न्याय देण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. एका बाजूला हा न्याय मिळत नाही आणि त्यामुळे दुस-या बाजूला छोट्या छोट्या घटना घडत राहातात. स्थानिक पातळीवर आपापसात संघर्ष होऊ नये यासाठी लोकांना विश्वासात घेऊन काम केले पाहिजे. भिवंडी पॅटर्न प्रमाणे लोकांना विश्वासात घेऊन काम केले पाहिजे. मला वाटते अनेक पोलीस अधिका-यांना ठराविक पोलीस स्टेशन्स मिळालेली असल्यामुळे असे प्रकार होत आहेत. तेव्हा पोलिसांच्या बदल्या होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, घणसोली येथील दुर्दैवी घटनेमध्ये गोळीबार होऊन त्यामध्ये माणसे दगावलेली आहेत. त्यांच्या कुटुंबीयाचे पुढे काय होणार हा प्रश्न अनुत्तरीत आहे. आपण याठिकाणी केलेल्या चर्चेतून लोकांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत एवढे बोलूने मी माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सदनातील अन्य माननीय सदस्यांनी याठिकाणी घणसोली येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेबद्दल आपले विचार व्यक्त केले. घणसोली येथे अत्यंत दुर्दैवी प्रकार घडला. होळीच्या दिवशी एका मुलीची छेड काढली गेली. गैरसमज असा झाला की, दोन्ही गटातील लोकांना असे वाटले की, आपल्याच गटातील मुलीची छेड दुस-या गटातील कोणी तरी काढली. या भावनेतून त्याठिकाणी वातावरण तापत होते. संध्याकाळी बाचाबाची झाली. पोलीस अधिकारी श्री. सुर्वे हे त्याठिकाणी गेले. त्यांनी कोणत्या महिलेची छेड काढली याबाबत चौकशी केली. त्यावेळी कोणीही तक्रार दिली नाही. त्यांनी दोन्ही गटांना समजून सांगितले की, अजूनही कोणाची काही तक्रार असेल तर ती द्या. पण कोणीही तक्रार दिली नाही. रात्री एक-दीडच्या सुमारास गावातील 15-20 तरुण मिळून माथाडींच्या वस्तीवर गेले आणि तेथील 10-15 गाड्यांचे त्यांनी नुकसान केले. काही गाड्या त्यांनी जाळल्या. हे लोक जर असेच करीत असतील तर त्याचा बदला घ्यावा म्हणून माथाडींच्या वस्तीतील लोक गावात जाऊन त्यांनी 15-20 गाड्या जाळल्या.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दराम म्हेत्रे ...

पोलिसांना माहिती मिळताच ताबडतोबीने घटनास्थळी पोलिसांचा स्टाफ गेला. अर्ध्या तासाने गेला. रात्री 2.00 वा. पोलीस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी विचारले की जी घटना घडली त्याबद्दल काही सांगावयाचे आहे काय किंवा तक्रार द्या. दोन्ही बाजूकडील लोक थांबले होते. पोलिसांनी सांगितले की तक्रार घेऊन आम्ही त्याप्रमाणे कारवाई करतो. दोन्ही बाजूकडील जमावाने सांगितले की येथे काही करु नका आम्हांला तक्रार द्यावयाची नाही. उद्या आमची नेतेमंडळी आल्यानंतर बैठक घेऊ आणि काय ते ठरवू....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दुर्दैवाने सरकार कसे चालते आहे याचे दिग्दर्शन माननीय राज्यमंत्री महोदय करीत आहेत. घटना घडल्यानंतर एफआयआर दाखल करणे आवश्यक होते. 10-15 बसेस जाळल्यानंतर पोलीसच विचारतात की तुम्हांला काही तक्रार करावयाची आहे काय ? म्हणजे सरकार चालविता की मस्करी करता ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आज खालच्या सभागृहामध्ये सुध्दा या विषयावर सविस्तरपणाने चर्चा झाली. गेल्या 2/3 महिन्यांमध्ये राज्यामध्ये ज्या गोळीबाराच्या घटना घडल्या त्याबाबतीत सविस्तरपणाने उत्तर खालच्या सभागृहात दिले गेले आहे. ती माहिती या सदनातील सदस्यांना माहीत असावी असे मला वाटते. ती माहिती या या निमित्ताने या सभागृहात देऊ इच्छितो. तसेच माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सगळया प्रश्नांची उत्तरे मी या निमित्ताने देईन. कुठल्याही सरकारला आपल्या जनतेवर आपल्या लोकांवर गोळया घालण्यामध्ये आनंद असतो असे होत नाही. राज्यातील 3-4 ठिकाणी गोळीबाराच्या ज्या केसेस झाल्या त्या पाहिल्या तर बीड जिल्हयामध्ये साक्षी आणि पिंपरी या दोन गावामध्ये नारायणगड लघुपाटबंधारे तलावातून पाणी सोडण्याबाबतचा प्रश्न होता. एका गावाला कॅनॉलमधून पाणी पाहिजे होते तर दुसऱ्या गावाने बॅकवॉटरवर योजना केली होती. ज्या लाभक्षेत्रातील गावाला पाणी पाहिजे होते त्या गावातील 100-150 लोक पाटबंधारे खात्याकडे पाणी मागण्यासाठी जाणे आवश्यक होते. परंतु स्वत:च पाणी मिळविण्यासाठी या धरणावर गेले. वरच्या गावातील लोकांनी विरोध केला. दुसऱ्या बाजूकडील 400-500 लोकांनी पाणी आम्ही सोडतो म्हणून मोर्चा काढला. लोक फार लवकर संयम सोडतात. ज्या यंत्रणेमार्फत काम करुन घ्यावयाला पाहिजे आणि वरिष्ठांकडे दाद मागितली पाहिजे आणि न्याय मिळवून घेतला पाहिजे यापेक्षा स्वत:च न्याय मिळवून घेण्याचा प्रयत्न करतात. अशा ठिकाणी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दोन्ही बाजूला दोन गावातील लोक आणि मध्ये पोलीस असतात. लाठीचार्ज आणि अश्रूधुराचा वापर केला. नियमाप्रमाणे पाटबंधारे खात्याच्या लोकांना बोलावून पाणी घ्या असे सांगण्याचा प्रयत्न केल्यावर सुध्दा लोक हटत नाहीत म्हणून 3 राऊंड फायरींग झाले कुणीही जखमी झाले नाही. राज्यामध्ये दुसरी घटना ही अमरावती जिल्हयामध्ये सारगड डॅमच्या बाबतीत घडली. 20.2.2006 रोजी डॉ. बोंडे आणि खासदार श्री. अनंत गुढे यांनी 5 हजार लोकांचा मोर्चा काढला. त्यांची मागणी होती की सारगड डॅमचे पाणी कॅनॉलमधून नदीत सोडावे. कॅनॉलवरील लोक होते त्यांची मागणी होते की नदीत न सोडता कॅनॉलमधून सोडावे. दोन्ही बाजूंनी मोर्चा घोषित केला गेला. मोठया प्रमाणावर पोलीस तैनात करण्यात आले. जमावाने डॅम फोडण्याचा प्रयत्न केला.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

कॅनालचा दरवाजा उघडून कॅनॉलमधून नदीत पाणी घेतले आणि त्यामुळे डॅमलाच धोका निर्माण करण्याचा प्रसंग निर्माण झाला होता. अशा प्रकारे कायदाच हातामध्ये घेण्याचा त्या ठिकाणी प्रयत्न करण्यात आल्यामुळे पोलिसांनी प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी त्या ठिकाणी 7 पोलीस अधिकारी जखमी झाले, 32 पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले, पाटबंधारे विभागाचे तीन अधिकारी एक कोतवाल आणि दोन तहसील कार्यालयाचे कर्मचारी जखमी झाले. पोलिसांनी त्यावेळी 10 राऊंड फायरिंग केली त्यात एक व्यक्ती मयत झाली आणि 9 राऊंड हवेत फायरिंग केली. त्याचबरोबर पुण्याजवळ हिंजवडी गावात उद्योग विभागाने आय.टी. क्षेत्र आणखी विस्तारित करता यावे म्हणून जिल्हाधिकाऱ्यांना काही जमीन संपादित करुन मागितली होती. त्यासंदर्भात माननीय उद्योग मंत्र्यांनी एक बैठक घेतली आणि त्यानुसार उद्योग विभागाने स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, बंगलोर आय.टी. क्षेत्रात फार पुढे गेले आणि आपल्याकडे त्यासाठी जमीन उपलब्ध करुन दिली नाही तर आपण रोजगारापासून वंचित राहू.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी हरकतीच्या मुद्दयाच्या माध्यमातून असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो तसेच चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून सांगतो की, माननीय मंत्री महोदयांनी आताच सांगितले त्यातला अर्धा भाग बरोबर नाही. चारघड प्रकल्पाच्या ठिकाणी जो मोर्चा आला होता त्याला समोरुन देखील प्रती मोर्चा होता ही गोष्ट चुकीची आहे. कारण त्या ठिकाणी प्रती मोर्चा वगैरे काहीही नव्हता. हा मोर्चा संपल्यानंतर जे घडले ते एस.पी. आल्यानंतर घडलेले आहे. त्या ठिकाणचा मॉब हिंसक वगैरे झालेला नव्हता, कॅनॉलची एक वीट सुध्दा पडली नाही, मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन आलो आहे. मातीचा बंधाऱ्याबाबत प्रयत्न केला होता व त्याबाबतची कॅसेट देखील आहे. त्या सी.डी. मधून कोणत्याही प्रकारे जमाव हिंसक झाला नसल्याचे दिसून येईल. पण गोळीबार झाल्यानंतर जनतेने दगडफेक केली त्यामध्ये पोलीस जखमी झाले असतील.

श्री. आर.आर.पाटील : हा मोर्चा शांततेत चालू होता, सभांमधून भाषणे देखील शांततेत चालू होती, नेत्यांची भाषणे धरणावर आणि खाली देखील शांतपणे चालू होती आणि खाली कॅनॉल फोडण्याचे काम सुध्दा शांततेत चालू होते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी आताच सांगितले की, 9 गोळया हवेत झाडल्या आणि एक गोळी लागली आणि माणूस मेला. पोलिसांच्या मॅन्युअलप्रमाणे गोळीबाराच्या शास्त्रामध्ये सर्वप्रथम गोळीबार कुठे करावा, त्यातून जमाव नियंत्रणात आला नाही तर कुठे गोळीबार करावा आणि त्यापेक्षाही हाताच्या बाहेर जमाव जात असेल तर कसा गोळीबार करावा यासंबंधी या शास्त्रामध्ये लिहीलेले आहे.....

श्री. आर.आर.पाटील : मी तेच सांगितले की, पोलिसांनी 10 राऊंड फायरिंग केली, एक माणूस मयत झाला म्हणजे 9 राऊंड हवेत फायरिंग झाली.

ॲड. अनिल परब : याचाच अर्थ असा होतो की, 10 पैकी 9 गोळया झाडल्या आणि एका गोळीने माणूस मेलेला आहे. म्हणजेच ती एक गोळी सरळ माणसावरच झाडण्यात आली आणि त्यामध्ये तो मेला हे माननीय मंत्री महोदयांनी मान्य करावे व तसा खुलासा उत्तरात करावा.

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी बीडचे उदाहरण दिले त्या ठिकाणी अगोदर लाठीमार, नंतर अश्रुधूर आणि नंतर गोळीबार केला. परंतु चारघडला मात्र ही परिस्थिती उलट झालेली आहे. या ठिकाणी प्रथम गोळीबार करण्यात आला त्यानंतर लाठीचार्ज आणि नंतर दगडफेक असा प्रकार झालेला आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराद्वारे याबाबत कुठली कारवाई करण्यात येईल हे स्पष्ट करावे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भात ॲडिशनल डी.जी.श्री.दयाळ यांना मी पाठविले होते. त्यांच्याकडून संपूर्ण घटनेची माहिती घेतली आहे. पोलिसांनी जादा बळाचा वापर केलेला नाही. आवश्यक तेवढया बळाचा वापर पोलिसांनी केला आहे. माझ्या जवळ जे पुरावे आहेत, ते मी सन्माननीय सदस्यांना देण्यास तयार आहेत. सन्माननीय सदस्यांकडे जे पुरावे आहेत, ते त्यांनी माझ्याकडे द्यावेत, त्याची देखील मी चौकशी करण्यास तयार आहे.

तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत) : मंत्रिमहोदय, आपण आता माहिती दिली की, 10 राऊंड झाडल्या आहेत, त्यातील 9 राऊंड हवेत झाडल्या आहेत. एक मयत झाला. यात जो एक जण मृत्यू पावला आहे, त्याला थेट गोळी लागली आहे काय ? यावेळी पोलीस मॅन्युअलप्रमाणे पध्दती अनुसरली आहे काय ? असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री.आर.आर.पाटील : यासंबंधीचा चौकशी अहवाल आलेला आहे. पोलीस मॅन्युअलप्रमाणे पध्दती अनुसरली आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये रंगपंचमीच्या दिवशी रंग लावले जातात तेथे पोलीस बंदोबस्त ठेवला जात नाही. दिनांक 15 मार्च 2006 रोजी सायंकाळी 6.00 वाजता मुलीची छेडछाड केल्याची एक घटना माथाडी कॉम्प्लेक्स,नवी मुंबई येथे घडली, असे बोलले जाते. त्यासंबंधीचा तपास पुढे होणे बाकी आहे. ती मुलगी कोण हे अजून स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी दोन्ही बाजूकडून गैरसमज करून घेण्यात आला आहे. घणसोली गावातील ग्रामस्थांना वाटले की, आपल्या मुलीची छेडछाड माथाडी वसाहती जवळ काढण्यात आली. माथाडींनी गैरसमज करून घेतला की, आपल्या हद्दीत येऊन मुलीची छेडछाड काढण्यात आली. अशा प्रकारे दोन्ही बाजूंकडून गैरसमज पसरत गेला. या घटनेतील मुलगी प्रत्यक्षात अजून पुढे आलेली नाही. दुर्दैवाने रात्री 1.00 ते 1.30 च्या दरम्याने माथाडी वसाहतीमध्ये घणसोली गावातील काही तरूण आले आणि त्यांनी 7-8 वाहनांची मोडतोड केली. त्यानंतर माथाडी वसाहतीतील 20-25 तरुणांच्या गट घणसोली गावामध्ये गेला. त्यावेळी पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर पोलीस तेथे गेले. तो पर्यंत 20-25 माथाडी तरूण फरार झाले होते. ज्यांच्या वाहनांची मोडतोड करण्यात आली त्यांना तक्रार नोंदविण्यास सांगितले. पण दोन्ही बाजूकडून कोणीही तक्रार नोंदविण्यास पुढे आले नाही. मग रात्रौ 2.30 वाजता दोन्ही बाजूच्या नेत्यांना बोलावून भांडण मिटविण्याचा प्रयत्न,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.आर.आर.पाटील...

वाटाघाटी करण्याचा प्रयत्न पोलिसांतर्फे करण्यात आला. त्याच वेळी पोलिसांनी 12 ते 15 अधिकारी, 30 पोलीस कर्मचारी आणि वरिष्ठ पोलिसांचा जादा स्टाफ मागवून घेतला. सकाळी 8.00 वाजता हा अतिरिक्त स्टाफ हजर होता. माथाडी वसाहत उद्घाटनाच्या समारंभाला मी हजर होतो. अतिशय छोटया जागेत म्हणजे 225 चौरस फुटाच्या तीन ते चार हजार सदनिका माथाडींसाठी बांधण्यात आल्या आहेत. या छोटया घरात खूप मोठया संख्येने लोक राहत आहेत. सायंकाळी भांडण झाले होते, ते रात्री मिटले होते. परंतु, श्री.नरेंद्र पाटील हे बैठकीला गेले आहेत असे कळल्या बरोबर 1000-1200 लोकांचा जमाव जमला. बैठकीच्या ठिकाणी स्पीकरसुध्दा लावला होता. एवढेच नव्हे तर पोलिसांच्या साक्षीने ही बैठक सुरू होती. त्यातही लोकांना शांत राहण्याचे आवाहन करण्यात येते होते. यात काही तरी मार्ग काढू असे बैठकीत सांगण्यात येत होते.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

परंतु, घणसोली गावामध्ये असा संदेश गेला की, माथाडी वसाहतीमध्ये हजारो माणसे जमलेली आहेत. रात्री जशी मोटारसायकली तोडायला आली तशीच आता जाब विचारण्यासाठी ती आपल्याकडे येतील आणि आपल्याला मारहाण करतील या भितीपोटी घणसोली गावातील मंडळीही जमा झाली आणि त्या ठिकाणीही जवळजवळ 2200 ते 2500 लोकांचा जमाव घणसोलीच्या बाजूला जमा झाला. सुरुवातीच्या काळात जाब विचारला तर आपण प्रत्युत्तर देऊ या भूमिकेवर असणारा जमाव, नंतर मात्र आताच आपण मोटारसायकल तोडीचा जाब विचारु या भूमिकेवर आला. त्यासाठी आगरी तरुण हे सुध्दा पुढे आले आणि त्यानी नंतर पुढे पुढे येण्यास सुरुवात केली. त्यावेळी 30-40 पोलीस कर्मचारी, 10-12 पोलीस अधिकारी एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला 2200 ते 2500 लोकांचा जमाव होता. त्यामुळे समोरुन जमाव येत आहे म्हणून आपणही तयारीत असावे या भूमिकेत असलेले दुसऱ्या बाजूला माथाडी कामगार होते. घणसोलीकडून आलेल्या जमावाने प्रथम वसाहतीचे बांधकाम करण्यासाठी जे गवंडी वसाहतीच्या बाजूला राहत होते त्यांच्या झोपडया पेटविल्या, नंतर घर बांधकामासाठी जे लाकडी साहित्य आणले होते ते साहित्य पेटविण्यात आले. दोन्ही बाजूंकडून मोठा जमाव होता. त्यातच क्वॉटर्समध्ये राहणारी दोन अडीच हजार माणसे सुध्दा आत होती. या जमावाला समोर येऊ देणे निश्चितच अडचणीचे होते. म्हणून पोलिसांनी टोकाचे प्रयत्न केले. दोन्ही बाजूच्या लोकांनी परत जावे म्हणून प्रयत्न केला. दोन्ही बाजूंनी पोलिसांवर दगडफेक होत होती. जखमी झाल्यानंतरही दगड झेलत लोकांना शांतता राखण्याचे आवाहन पोलिसांकडून केले जात होते. परंतु तरीही जमाव ऐकत नव्हता. या दगडफेकीमध्ये एक पोलीस आयुक्त, दोन सहाय्यक आयुक्त, तीन पोलीस निरिक्षक, अंदाजे 40 पोलीस कर्मचारी आणि दोन्ही बाजूंचे 60 नागरिक जखमी झाले. म्हणजे साधारणत: 50 पोलीस कर्मचारी आणि 60 नागरिक या सर्व घटनेमध्ये जखमी झालेले आहेत. अशा स्थितीत वारंवार प्रयत्न करुनही लोक मागे हटत नाहीत, म्हणून प्रथम अश्रुधुराच्या नळकांडया फोडण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला. परंतु वारा उलटया दिशेने वाहत असल्यामुळे त्यांचा पुरेसा उपयोग होत नव्हता. याउलट अश्रुधुराच्या छोटयाछोटया नळकांडया जमावाकडून पोलिसांवरच फेकल्या जात होत्या. जमाव मागे हटण्यास तयार नव्हता. त्यामुळे मॅन्युअलप्रमाणे एकंदर 45 राऊंड फायरींग करण्यात आले. त्यामध्ये दोन व्यक्ती जखमी आणि दोन मृत्युमुखी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

पावल्या. पोलिसांना जर लोकांना मारायचा उद्देश असता तर 45 राऊंडच्या मानाने मृत्यूचा आकडा मोठया प्रमाणावर गेला असता. परंतु पोलिसांचा तसा काणताही उद्देश नव्हता. बहुतांश राऊंड हवेतच झालेले आहेत. हवेत राऊंड करुन उपयोग होत नव्हता आणि जमावाला पांगविण्यासाठी दुसरा कोणताच पर्याय नव्हता. शिवाय दोन्ही जमाव ऐकमेकाला मिळाला असता तर शे-दीडशे माणसे मेली असती किंवा आणखी आगी लागून, अनुचित प्रकार घडला असता. त्यामुळे अशा परिस्थित्ीत पोलिसांसमोर आपले कर्तव्य पार पाडण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय नव्हता. त्यापूर्वी माथाडी नेते श्री.नरेंद पाटील यांची ज्यावेळी बैठक सुरु होती त्या ठिक्ाणी त्यांचा पी.ए.उपस्थित होता. त्या ठिकाणी जमावाने येऊन श्री.नरेंद्र पाटील यांचा अंगरक्षक श्री.ज्ञानेश्वर चंदू बारगुडे डोक्यात चॉपरचे वॉर लागून जागेवरच मयत झाला. यापेक्षा टोकाला परिस्थिती जाऊ शकली असती. त्यामुळे अशा परिस्थितीत पोलिसांना गोळीबार करण्याशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध होता असे वाटत नाही. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी या घटनेबाबत आपले विचार व्यक्त केले. परंतु त्यावेळी मी सदनामध्ये उपस्थित नव्हतो. कारण त्यावेळी मी घणसोली येथील परिस्थितीची माहिती घेत होतो. कालच्या परिस्थितीच्या मानाने आज तेथील परिस्थिती पूर्णत: नियंत्रणात आहे. त्या ठिकाणी चार एसआरपी आणि 1 रॅपीड ॲक्शन फोर्सची तुकडी तैनात करण्यात आली आहे. जर आवश्यकता वाटली तर आणखी पोलीस दल त्या ठिकाणी पाठविले जाईल. पोलीस दलाचा वापर करुन समाजामध्ये शांतता प्रस्थापित होऊ शकते असे माझे कधीच मत नाही. पोलिसांच्या गोळींच्या जोरावर राज्य शांत आणि स्थिर राहू शकते असे मला वाटत नाही.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

शेवटी आपण त्या समाजाला सहमतीवरच एकत्र करु शकतो, त्या ठिकाणी शांतता प्रस्थापित करु शकतो. माझा प्रयत्न हा आहे की, उद्या त्या समाजातील दोन्ही गटांना म्हणजे स्थानिक लोकांना आणि माथाडी लोकांना एकत्र करुन शासनाच्या वतीने एखादी मिटिंग बोलवावी. हा प्रयत्न मी निश्चितपणाने करणार आहे. आज ज्या पध्दतीने सर्व पक्ष रिस्पॉन्स देत आहेत, ती पध्दत पाहिल्यानंतर असे दिसते की, उद्यापर्यंत तेथील परिस्थिती पूर्णपणे तणावमुक्त होईल आणि जीवन पूर्वपदावर येईल आणि हा मला विश्वास आहे. सभापती महोदय, आतापर्यंत घडलेली स्थिती मी आपणास सांगितली. अशा घटनांचा काही लोक फायदा घेत आहेत तर काही समाजकंटक आपला डाव साधण्याचा आणि फायदा उठविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपण सगळ्या कायदेशीर मार्गाचा अवलंब करुच. परंतु या गोळीबाराचा खेद मला स्वत:लाही होत आहे. कोणाला तरी पोलिसांच्या गोळ्यांनी मरावे लागणे हे मी फार चांगले मानत नाही. परंतु शेवटी कोणत्या परिस्थितीमध्ये पोलिसांनी काम केले हेही पाहणे तितकेच आवश्यक आहे. दुर्दैवाने पोलीस दलाची अवस्था पाहिली तर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी एक गोष्ट बरोबर सांगितली आहे की, अग्रेसिव्ह ॲक्शन घेऊन एखादे कृत्य थांबविले नाही तर पोलिसांनी बध्याची भूमिका घेतली म्हणून पोलिसांवर टीका होते आणि ॲग्रेसिव्ह ॲक्शन थांबविण्यासाठी पोलिसांनी आक्रमक भूमिका घेतली तर बळाचा अतिरेक केला अशा पध्दतीची टीका होते. शेवटी या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखायची असेल तर पोलीस दल कोणत्याही परिस्थितीमध्ये नाऊमेद होऊ देता उपयोगाचे नाही. विधानसभेमध्ये देखील चर्चा झाली व गोळीबारासंबंधी थोडीबहुत टीकाही करण्यात आली. पण मी दाखवून दिले की, युतीच्या काळामध्ये सुध्दा गोळीबाराचे 62 प्रकार घडले होते आणि त्यामध्ये 28 लोक मृत्यूमुखी पडले होते. आज आपण सहज बोलताना सांगत आहात की, नवी मुंबई काय लांब होती का ? मग यातून असा प्रश्न निर्माण होतो की, मग माता रमाबाई आंबेडकर नगर नवी मुंबईपेक्षा लांब होते का ? सभापती महोदय, काही वेळेला काही परिस्थिती अचानकपणे निर्माण होते. प्रत्येक गोळीबाराची परवानगी शासनाकडून घेतली जाते असा गैरसमज काढून टाकण्याची आज आवश्यकता आहे. परिस्थिती शांत ठेवण्यासाठी आपण पोलिसांच्या हाती हत्यारे दिली आहेत. ती हत्यारे काही शोभेसाठी दिलेली नाहीत. याचा अर्थ या

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

हत्यारांचा सर्रास वापर करुन आपले लोक मारले पाहिजेत असा नाही. शांततेचा भंग न होण्यासाठी, पुढील अनर्थ टाळण्यासाठी, लोकांच्या जिवितेचे आणि मालमततेचे रक्षण करण्यासाठी पोलीस गोळीबार करत असतात. गोळीबार केल्यानंतर चौकशीचे शुक्ल क्लाष्ट पाठीमागे लागणार आहे, शिक्षाही होणार आहे या गोष्टीची जाणीव असून देखील समाजाच्या भल्यासाठी पोलिसांनी जर काही गोळीबारासारखे कृत्य केले तर आपण ते सुध्दा समजून घेण्याची आवश्यकता आहे. विधानसभेमध्ये काही जणांनी असाही प्रश्न उपस्थित केला की, पर्याप्त पोलीस दल तेथे नव्हते तर जास्तीचे पोलीस आपण का ठेवले नाहीत ? अध्यक्ष महोदय, आजपर्यंत महाराष्ट्रात कुठेही एकमेकांना रंग लावताना आपण पोलीस दल ठेवले किंवा दोन गल्लीतील मुलांची भांडणे झाल्यानंतर तेथे एस.आर.पी. नेऊन त्यांना आडवे उभे केले असे कधीही घडलेले नाही. तरी सुध्दा या घटनेची माहिती असल्यामुळे, पार्श्वभुमी माहित असल्यामुळे त्या ठिकाणी 10-12 अधिकारी व 30-40 पोलीस कर्मचारी उपस्थित आहेत. एकंदरित महाराष्ट्राच्या पोलीस दलाची अवस्था पाहिल्यास आपल्याला असे दिसून येईल की, 1960 सालच्या निकषावर किती पोलीस असावेत हे निश्चित केले आहे. निकष 1960 सालचे आहेत आणि लोकसंख्या 21 व्या शतकाला शोभेशी आहे. त्या ठिकाणी देशभरातील लोक येतात. परंतु तेथे अद्यापही 1960 साच्या निकषानुसार पोलिसांची संख्या ठरविण्यात आली आहे. आज मुंबईमध्ये एका पोलिसाला रोज 14 तास काम करावे लागते आणि नवी मुंबईतील पोलिसाला रोज साडे पंधरा तास काम करावे लागते. बदल्या करुन आम्हाला ग्रामीण भागात टाका असे त्या ठाण्यांतील लोक म्हणत आहेत. पोलीस दल खूप दबावाखाली आणि चिंतेखाली काम करत आहे. त्यांना आणखी नाऊमेद होऊ देणे यात त्यांचे नुकसान किती होईल, राजकीय फायदा किती होईल आणि यापेक्षाही समाजाचा किती मोठे नुकसान होईल, हे देखील पाहिले पाहिजे. त्यांनी या दोन-तीन महिन्यांमध्ये केलेली फायरिंग आणि त्यामध्ये मृत्यूमुखी पडलेली व जखमी झालेली माणसे पाहिली तर पूर्णपणे दक्षता घेतली गेली असल्याचे आपल्याला दिसेल. कमीत कमी जिवितहानी व्हावी, कमीत कमी लोकांना इन्ज्युअर्ड करावे हे पोलिसांनी पाहिले आहे. शेवटी तीही माणसे आहेत.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशोधित प्रत / अशोधित नाही

VVK/ SBT/ MAP/ MHM/ KGS/ प्रथम श्री. कांबळे.. 19:00

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, तेथील स्थानिक लोकांनी पोलीस दलावर आक्षेप घेतलेला नाही. तरी सुध्दा तेथील गोळीबाराची आम्ही तपासणी करीत आहोत.

श्री. अनंत तरे : श्री. अमर जाधव, डीसीपी यांनी यापूर्वी सुध्दा बऱ्याच दंगलीमध्ये गोळीबार केलेला आहे. ते जाणूनबुजून गोळीबार करीत असतात काय ? त्यांना तशी सवय आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : श्री. अमर जाधव, डीसीपी यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी तेथे उपस्थित होते. या ठिकाणी दुसऱ्या दंगलीचा संदर्भ देऊन ते फायरिंग करतात असे म्हणणे योग्य नाही. सदर परिस्थितीमध्ये दंगल आटोक्यात कशी येईल, तसेच तेथे परिस्थिती काय होती, या निमित्ताने त्याकडे बघितले पाहिजे. त्यांना गोळीबार करण्याची सवय आहे असा निष्कर्ष यावरुन कोणीही काढू नये. आतापर्यंत कोठेही फायरिंग न केलेले पोलीस अधिकारी तेथे होते. तेथील परिस्थिती पाहून जर गोळीबार केला नसता तर दोन-तीन हजार घरे, त्यातील महिला, मुले काही झोपडपट्टया या भांडणामध्ये जळून खाक झाल्या असत्या. तेथील लोकांचे काही नवीन सामाजिक प्रश्न आहेत, काही लोकांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत, तेथील आगरी लोक हे गरीब आहेत. माथाडी लोक सुध्दा जगण्यासाठी तेथे कष्ट करीत आहेत. खऱ्या अर्थाने हे दोन गरिबांमधील भांडण आहे. त्या ठिकाणी टॉवर उभे राहत असतांना तेथील स्थानिक लोकांना त्यांच्या लाभापासूच वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे त्यांची प्रगती होत नाही, त्यांचे म्हणणे असे आहे की, आमची प्रगती होती नाही, आमच्या जमिनी रातोरात घेतल्या जातात, यासंदर्भात निराशेची भावना त्यांच्या मनात निश्चितपणाने आहे. त्या ठिकाणी नवीन नवीन कारखाने निर्माण होत आहे, स्थानिक लोकांना तेथे काम मिळत नाही. स्थानिक लोकांना तेथील कंत्राट मिळत नाही. माथाडी कायद्याप्रमाणे आमची रजिस्टर संस्था असतांना आम्हाला तेथे कामावर घेतले जात नाही, अशा अनेक प्रश्नांतून हे लोक पुढे येत आहेत. यासंदर्भात गरज भासल्यास संपूर्ण माथाडी कामगारांची एक बैठक नवी मुंबईमध्ये घेण्यात येईल. तसेच नवी मुंबईमध्ये एक नवीन पोलीस ठाणे लवकरात लवकर उभारण्यात येईल अशी घोषणा या निमित्ताने मी करीत आहे. याबाबत ताबडतोब पाठपुरावा करुन कार्यवाही करण्यात येईल. अशा दंगलीच्या काळामध्ये गोळीबार होऊन जर कोणी मृत्यमुखी पडले तर त्यांच्या नातेवाईकास मदत देण्याची भूमिका आता शासनाने स्वीकारलेली आहे. सदर

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

दंगलीमध्ये मृत्यू पावलेली व्यक्ती ही राजकीय पुढाऱ्याचा अंगरक्षक होती. मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकास शासनातर्फे एक लाख रुपयांची मदत तातडीने देण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच या दंगलीमध्ये जे जखमी झालेले आहेत त्यांच्या औषधोपचाराचा खर्च शासनामार्फत करण्यात येईल. दंगलीमध्ये फार मोठया प्रमाणात ज्यांचे नुकसान झालेले आहेत त्यांना मदत देण्याची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे. या दंगलीच्या संदर्भातील एकंदर संपूर्ण परिस्थिती मी सभागृहासमोर मांडलेली आहे. दोन्ही बाजूंनी चर्चा होत असतांना बहुतेक चर्चा ही राजकारण विरहित झालेली आहे. परंतु अशा घटना यापुढे घडू नयेत यासाठी यासंदर्भातील दक्षता आपण सगळे मिळून घेऊ या. सदर परिसरामध्ये शांतता प्रस्तापित करण्यासाठी आपण सगळे मिळून प्रयत्न करु या. असे मी सर्वांना आवाहन करतो. आपणा सर्वांना धन्यवाद देतो.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री महोदयांनी येथे दिलासादायक भाषण केलेले आहे. परंतु मी माझ्या भाषणामध्ये असा मुद्दा उपस्थित केला होता की नवी मुंबई शहरावर वर्चस्व कोणाचे आहे या बाबत तेथील मूळ वाद आहे, यासंदर्भात त्यांनी खुलासा केलेला नाही. त्याबाबत सुध्दा त्यांनी लक्ष घालावे, किंवा तेथील राजकीय व्यवस्था त्यांना करुन देण्यात यावी, तेथील हा वाद मिटला तर ही भांडणे नाहीशी होतील असे मला वाटते. याबाबत सुध्दा माननीय गृहमंत्री महोदयांनी लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. सांगळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर. पाटील : या दंगलीमागे काही राजकीय हेतू आहे काय ? या सर्व प्रकरणाची डीसीपी लेव्हलवर चौकशी करण्यात येईल. मी या ठिकाणी सदनाला सांगू इच्छितो की, या प्रकरणामध्ये कोणी दोषी आढळून आल्यास त्यास जन्माची अद्दल घडविण्याची शासनाची भूमिका राहील.

उपसभापती : या प्रस्तावावरील चर्चा आता संपली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 18 मार्च, 2006 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक संध्याकाळी 7 वाजून 05 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 18 मार्च, 2006 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही